मकरन्दांतून प्रसिद्ध झालेली कादंबरी.

# मयाची माया.

( मुंबईतील एका सोनेरी टोळीची हकीकत )

लेखक

भगवानदास.

प्रकाशक

नरहर नारायण पटवर्धन,

मकरन्दकार्यालय,

वाई.

शके १८३३

मुद्रक—दामोदर लक्ष्मण लेले, मोदवृत्त प्रेस, वाई.

किंमत आठ आणे.

या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क नरहर नारायण पटवर्धन
यांनीं सन १८६७ च्या २५ व्या अॅक्टाप्रमाणें
स्वाधीन ठेवले आहेत.

# मयाची माया.

## प्रसंग १ ला.

मयासुराची माया ! मुंबईची फॅन्सी फेट् ज्यांनीं पाहिली असेल त्यांना पुराणांतरीं वर्णन केलेल्या मयासुराच्या मायेची कांहींच माया वाटणार नाहीं. या महामायेच्या फेऱ्यांत मी कसा गुरफटला गेलों व त्याच्यांत आमची काय काय त्रेधा उडाली याचीच हकीकत मी या गोष्टीच्या द्वारें वाचकांस देणार आहे.

सुमारें १९०५ सालची गोष्ट. मी खेडेगांवचा मनुष्य. गुजराथेंतला राहणारा. जातीनेंही गुजराथीच. तेव्हां सर्व जगाच्या मायेपेक्षां पैशाची माया जास्त बाळगणारा. असें असूनही ही फॅन्सी फेट् पाहून आलेल्या लोकांचीं वर्णनें वाचून माझ्या मनांत ती पहाण्याची अनावर इच्छा उत्पन्न झाली व ती पाहण्याकरितां मी मुंबईस येऊन दाखल झालों. एकवार पाहून माझ्या मनाला जो मोह उत्पन्न झाला तो केवळ अनावर होता. मीं लागलींच सीझन् टिकीट काढलें. व डोळ्याचें पारणें फिटेपर्यंत ती पहात रहाण्याचा निश्चय केला. रोज सकाळसंध्याकाळ जेवणावांचून सर्व वेळ मी तेथें घालवीत असे. बोलून चालून गांवढळ; परंतु शहरांत आल्यावर अनिवार मोहाला बळी पडून नित्यशः भपकेदार पोषाख करून एखाद्या नवरदेवाप्रमाणें नटण्याची व मिरवण्याची माझी नित्य कवाईत चालत असे. एके दिवशीं संध्याकाळची वेळ होती. ना० गव्हरनर साहेबांची स्वारी फेट् पहावयास यावयाची होती. त्यामुळें रोजच्यापेक्षां जास्तच गर्दी जमली होती. आकाशांत चांदणें निरभ्र पडलें होतें. जानेवारीचा महिना ह्मणजे मुंबईच्या गुलाबी थंडीचे दिवस. समुद्रकिनाऱ्याचा गार वारा; त्यांतूनही पारशी युवतींच्या कपड्यांच्या सुवासांनीं तो दुमदुमून गेलेला. पारिजाताच्या फुलाप्रमाणें उधळलेल्या आकाशांतील चांदण्या आणि फेट्मध्यें चांदण्याप्रमाणेंच चमकणारे विजेचे दिवे

च या स्वर्गीय आणि भूतलगत दीपिकांच्या लखलखाटांत चित्र-विचित्र पोषाखानें अधिकच खुलणाऱ्या अशा मनोहर व तारुण्यानें मुसमुसलेल्या अशा युवतींचा समुदाय–किनरी आवाजानें लटकत मटकत किलबिल् किलबिल् गोष्टी करणाऱ्या अशा त्या मिरवत चाललेल्या तरुणी–पाहून ती मयपुरी नसून कामपुरीच वाटत होती. गुलाबी गाल, झुलती चाल, मंदवाऱ्याची हालचाल आणि त्यांत युवतींच्या वस्त्रांचे हाल हे पाहून मोहवश होणार नाहीं असा हरीचा लाल त्या समाजांत तरी आढळणें अशक्य ! त्यांतलाच मी एक हें कांहीं निराळें सांगावयास नको. सर्व हिंदुस्थानची शोभा म्हणजे मुंबई आणि सर्व मुंबईची शोभा या फेट्मध्यें. असा प्रकार त्यावेळीं झाला होता.

सृष्टीचें वैभव म्हणजे वसंतऋतूमध्यें नियमित काळपर्यंतच विकसावयाचें. परंतु, या मोहमयी सृष्टीचें वैभव म्हणजे काय त्रिकालाबाधित ! या सृष्टींत काळ आणि वेळ, यम आणि नियम यांचें कोणाला स्मरणही नव्हतें. मैत्रिणींच्या स्कंधावर आपले गुलगुलीत हात ठेवून ठिकठिकाणीं घोळक्यानें चाललेल्या विलासवती युवतींच्या चरणपावन झालेल्या व आनंदातिशयांत स्वर्गगती झालेल्या पदरजांनीं दाही दिशा धुंद करून टाकल्या होत्या. व त्यांना आकाशांतील विजेचे दिवे व फेट्मधील चांदण्या यांच्या प्रकाशानें उज्वलता प्राप्त झाल्यामुळें चरणधुलीला व्हायोलेट पावडरची पदवी प्राप्त झाली होती. व शिमग्याच्या धूलिवंदनांत धूलीचा जो गौरव होतो तसाच तिचा या समयींही होत होता. वैभवाचे दिवस हे प्रत्येकाला केव्हांना केव्हांतरी येतातच असें म्हणतात तें खोटें नाहीं. नाहींतर धूलीच्या स्पर्शानें दूषित मानून वस्त्रें धोब्याच्या अंगावर फेकून देणाऱ्या व तिच्या कालिम्याच्या रागानें गाल गुलाबी करणाऱ्या या नटव्यायुवती आज त्याच धुळीला गुलाल, बुक्याप्रमाणें पवित्र कशा मानत्या व मजसारखे वासनालोलुप पुरुष या धूलीनें सर्व कपडे भरोत अशी लालसा कसे धरते. या नयनोत्सवांत मग्न होऊन मी इकडून तिकडे भ्रमण करीत होतो. दुष्काळानें पीडित झालेल्या बुभुक्षिताला ज्याप्रमाणें नुसतें अन्नदर्शनही मोक्षप्रद होतें; त्याप्रमाणेंच या नंदनवनतुल्य देखाव्यानें माझ्या नेत्रांची स्थिती झाली होती. आशाळभुताप्रमाणें नेत्रांचें पारणें फेडण्याकरितां पुन्हा

एकाच ठिकाणीं दहादहा वेळ येऊन पहात रहाण्याचा माझा क्रम चालला होता. अशा स्थितींत किती काळ निघून गेला याचें मला देहभान राहिलें नाहीं. हळु हळु लोकांची गर्दी कमी होऊं लागली. धुळीच्या अभ्रानें व्याप्त झालेल्या त्या फेट्‌मध्यें विद्युल्लतेप्रमाणें चमकणाऱ्या युवतिजनांचा समुदाय तर अगदींच विरळ झाला असें पाहून आतां आपल्या बिऱ्हाडाकडे वळावें असा विचार करून मी परत निघालों. इतक्यांत हजारों डोळ्यांची जिच्यावर टक लागली आहे अशी एक पारशी तरुणी एकटीच फिरत असतांना मला दिसली. आजपर्यंत फेट्‌मध्यें मीं तिला बरेच वेळ पाहिलें होतें व आजही यापूर्वी ती मला दोन तीन वेळ दिसली होती. परंतु गर्दीमध्यें चंद्रिकेप्रमाणें मेघा आड होत असलेली ती निश्चलपणें कधींच पहावयास मिळाली नव्हती. तेव्हां आतांची संधी अनुकूल असल्यामुळें विशेष बारकाईनें निरीक्षण करीत तिच्या बाजूबाजूनें अडखळत अडखळत, पहात पहात असा मीं चाललों होतो. जातां जातां एकेठिकाणीं एक कारंजें होतें. त्याचेपाशीं ती येऊन उभी राहिली. ह्या कारंज्याच्या तळाशीं लहान लहान विजेचे दिवे होते व त्यावर कारंज्याचे तुषार उडत असल्या कारणानें विजेच्या दिव्यांची प्रभा त्या तुषारामध्यें मिश्र झाल्यामुळें इंद्रधनुष्याचा भास होत होता. त्या ठिकाणीं ती उभी राहिलेली पाहून तिच्या समोरच्या बाजूला मीही आशाळभुताप्रमाणें तिजकडे टक लावून पहात उभा राहिलो. ती तरुणीही मजकडे विशेष टक लावून पहात आहे असा मला दोन तीन वेळां भास झाला. तथापि मजसारख्या क्षुद्र मनुष्याकडे पहाण्याचा तिचा उद्देश नसून तिच्या स्वाभाविक चंचल नेत्रांचा तो दोष असेल असें समजून मी आपल्या मनाची समजूत करीत होतो. तिच्या त्या हृदयभेदक कटाक्षांनीं पुन्हा एकवार मजवर आघात केल्यामुळें वेडावून मीं भीत भीतच ती ज्या ठिकाणीं उभी होती तेथें जवळच जाऊन उभे रहाण्याचा उपक्रम केला. त्याबरोबर ती दचकलेल्या हरिणीप्रमाणें उसळून बाणाप्रमाणें तेथून निघाली व आपल्या हातून घडलेल्या प्रमादाबद्दल ओशाळून मीही तिच्या विरुद्ध मार्गानें बाहेर जाण्यास निघालों. पूर्वी मनांत आल्याप्रमाणें तिच्या स्वाभाविक दृष्टिक्षेपाची निराळीच कल्पना करून विकारव-

शतेनें या कुलीन तरुणीचा आपण अतिशय अपमान केला याबद्दल मनांत अगदीं खजिल होऊन मी घराकडे न जातां विचाराच्या नादांत आपोलो बंदराकडे वळलों.

---

## प्रसंग २ रा.

शिणलेल्या मनाला विश्रांति देण्यास व त्याची करमणूक करण्यास आपोलोबंदर ही एक मोठी रमणीय जागा आहे. मी मागें सांगितल्याप्रमाणें विचाराच्या नादांत जो निघालों तो आपोलोबंदरावर येऊन पोहोंचलों. फेट्मधल्या गर्दीनें, धुळीनें, विजेच्या लकलकाटानें आणि चालण्याच्या श्रमानें अगदीं थकून व घामाघूम होऊन गेल्यामुळें या ठिकाणीं क्षणभर एकांतसुख घेऊन व तेथील गार वाऱ्यानें श्रम परिहार करून मग आपल्या बिऱ्हाडीं जावें असा बेत करून मी बसलों. तेथील गार वाऱ्यानें व शीतल चंद्रप्रकाशांत कांहीं काल पाय पसरून स्वस्थ पडल्यावर माझा बराच थकवा नाहींसा झाला व नुकत्याच घडलेल्या त्या पारशी तरुणीच्या प्रसंगाची पुन्हा एकवार आठवण होऊन तिचें चित्र डोळ्यापुढें दिसूं लागलें. मी आपल्या मनाची पुष्कळ समजूत केली, पुष्कळ शंका कुशंका घेतल्या, तथापि तिनें मजकडे फेकलेले नेत्रकटाक्ष केवळ स्वाभाविक नसून त्यांत कांहींतरी हेतु असावा असाच माझ्या मनाचा ग्रह अधिकाधिक होऊं लागला. ती तरुणी चांगल्या कुलीनाची दिसत होती व मी सौंदर्यानें जरी केवळ टाकाऊ नव्हतों—असें माझें मन मला सांगत होतें—तरी परिचय नसल्यामुळें ती कोणच्याही तऱ्हेनें सहेतुक दृष्टीनें मजकडे पाहील असें शक्य नव्हतें असें एकदां वाटे. साधारण चांगलें स्वरूप, ऐन ज्वानीमध्यें प्रकृती निकोप, पेहराव चांगला, गर्भश्रीमंतीचें थोडेंबहुत अंगावर तेज इतकीं साधनें मला अनुकूल असतां तिच्या डोळ्यांना मजकडे पहाण्याचा मोह कां न पडावा असा दुसरा विचार मनांत येई. विकारवश झालेल्या मनुष्याच्या मनांत विचाराचें काहूर कसें उद्भवतें याची कल्पना प्रत्येक मनुष्यमात्रास आहेच. तेव्हां माझ्या मनाची स्थिती या वेळेस काय होती

व समुद्राच्या भरतीच्या लाटांप्रमाणें विचाराच्या लाटा मनामध्यें एक-सारख्या कशा आदळत असतील हें विशेष पाल्हाळानें वर्णन करण्यापेक्षां त्यांची कल्पना करण्याचें, सहृदय वाचक हो! मी तुह्मांवरच सोपवतों.

या विचारचक्रींत भ्रमून इकडून तिकडे व तिकडून इकडे असें माझें मन हेलकावे खात असतां त्या रसिक पारसिक तरुणीची गालांतल्यागालांत हसणारी व आपली कुर्रेबाज दृष्टि मजवर फेकणारी, आकाशांत विराजमान झालेल्या चंद्रम्याप्रमाणें शांत व आनंदमय मूर्ति माझ्या डोळ्यापुढें उभी असतां एकाएकीं माझा किंचित् डोळा लागला. या स्थितींत मी किती वेळ होतों हें मला कांहीं सांगवत नाहीं. परंतु. तितक्यांतच ज्या गोड कल्पनांनीं माझें मन वेडावून गेलें होतें--जी गोड मूर्ति माझ्या डोळ्यापुढें सारखी उभी होती त्या गोड कल्पनांचें गोड स्वप्न मला दिसूं लागलें. जिच्या पायाची पायधूळ अंगावर उडाली असतां मी आपल्याला कृतार्थ समजत होतों, जिच्या नेत्रकिरणांचा वर्षाव मला सुधास्नानाप्रमाणें वाटत होता, जिचा अंगराग नंदनवनांतील परागाप्रमाणें वाटत होता, जिचे गोंडस हात माझे हात स्वर्गास पोंचवीत होते तेच आतां माझ्या गळ्याभोंवती आहेत व तिचा मुखचंद्र आपलें अमृत माझ्या मुखांत ओतीत आहे आणि नेत्रतारा मला तारावयाला तयार असतां मी त्यांना सोडून निघालों ह्मणून मला दोष देत आहेत असें स्वप्न माझ्या दृष्टीस पडलें. हें स्वप्न पाहून मी जागा झालों तोंच काय चमत्कार सांगावा ती त्रैलोक्यसुंदरी स्वप्नांत पाहिल्याप्रमाणेंच माझेजवळ बसलेली आहे असें मला दिसलें. प्रथम मला तें खरें वाटेना. मी बावरून उठलों व अजून मी स्वप्नांतच नाहींना? किंवा ही भूतचेष्टा नाहींना असे विकल्प मनांत येऊन तिजकडे साशंक दृष्टीनें पाहूं लागलों. मी जागा होऊन दचकलेला पाहतांच ती पारशी युवती मजकडे एक स्निग्ध नेत्रकटाक्ष फेकून व आपलें गोंडस हात माझ्या खांद्यावर ठेवून मला ह्मणाली, "पिरोज, ह्या तुझ्या गरीब शिरीन्ला तूं विसरलास काय? किंवा फेटंमध्यें तूं अगदीं मजजवळ येऊन उभा राहिला असतां मी तुजजवळ एक चकार शब्दही बोलले नाहीं म्हणून तुला माझा

राग आला ! बोल, बोल प्यारा फिरोज. प्रेमानें अंध होऊन मीं आपलें सर्वस्व तुझ्या स्वाधीन केलें ! आईबापांची मजवर खप्पा मर्जी झाली. हें सर्व तुला माहीत असतां तूंही जर मजवर रागावलास तर मी कोणासाठीं या जगांत जगावें ! माझे जिवाचे कलीजा, ज्यावेळेस तूं मजपाशीं उभा होतास त्यावेळीं मी तुजजवळ बोललें नाहीं ह्मणून तुला राग यावा हें अगदीं स्वाभाविक आहे. परंतु, माझा भाऊ व माझ्या आईबापांच्या मनांतून मीं ज्याच्याशीं लग्न लावावें, तो हे दोघेहीजण पलीकडल्या बाजूस उभे राहून तुजकडे त्वेषानें पहात होते ही गोष्ट तुझ्या ध्यानांत आली नसावी असें दिसतें. तुला एकीकडे गाठून दोन शब्द तरी बोलावेत ह्मणून मीं दोनचारदां प्रयत्न केला परंतु, ते जवळ असल्यामुळें तो सिद्धीस गेला नाहीं. शेवटीं त्यांची नजर चुकवून मी कारंज्यापाशीं आलें परंतु तेथेंही मला न कळत त्यांनीं माझा पाठलाग केला. माझे सर्व उपाय हरले. ह्मणून निराश होऊन त्यांच्याबरोबर मी परत जाणार; इतक्यांत माझी एक मैत्रीण सुदैवानें मला बाहेर भेटली व तुला आपोलोबंदराकडे वळतांना पाहून तुझी भेट घ्यावी या इराद्यानें मैत्रिणीच्याबरोबर तिच्या घरीं जाण्याचा बहाणा करून मीं येथें तुला गाठलें. तरीदेखील तुझा राग मजवर असावाना ! अथवा तुला तरी दोष देऊन काय उपयोग. मीच दुर्दैवी ह्मणून तुला मजवर विनाकारण रागवावें असें वाटलें ! त्याला तुझा इलाज काय ? ” असें ह्मणून माझ्या खांद्यावर डोकें ठेवून ती ओकसाबोकशीं रडूं लागली. हें गौडबंगाल काय आहे याचा मला कांहींच उलगडा होईना. अजूनही मी स्वप्नांत तर नाहींना— छे पण स्वप्न कसलें ! तिचा कोमल बाहुपाश माझ्या गळ्याभोंवतीं असतां, माझ्या खांद्यावर डोकें ठेवून ती ओकसाबोकशी रडत असतां स्वप्न म्हणून तरी कसें समजावें ! तिनें आपलें मुख माझ्या मुखाजवळ आणिलें तेव्हां तिच्या तोंडाला मदिरेची घाण येत होती. तेव्हां त्याचे धुंदींत मला आपला प्रियकर समजून तिच्या हातून हा प्रमाद घडला असेल असें मला वाटलें. परंतु विचार करण्याचा तो काळच नव्हता. एकंदर गोष्टी इतक्या विलक्षण तऱ्हेच्या घडत होत्या कीं अचंब्यामुळें, मनाच्या

उच्छृंखलपणामुळें, सर्वथैव वासनाधीन झाल्यामुळें काय करावें व काय चाललें आहे याची मला शुद्धिच नव्हती. एकवार आपण कोण आहोंत हें हिला सांगून हिच्या मोहपाशांतून आपण मुक्त व्हावें अशी विवेकबुद्धि जागृत होई तोंच असलें स्त्रीरत्न अयाचित् व अकल्पित् गळां पडत असतां त्याचा आव्हेर करणें हा केवळ नामर्दपणा आहे असा दुसरा विचार मनांत येई. या परस्पर विरोधी विचारांच्या कात्रींत माझें धैर्य, माझी विवेकबुद्धि पुरी कातरली जाऊन मी शुद्ध बावरून गेलों होतों. हे सर्व विचार डोक्यांत येऊन माझी ही स्थिती व्हावयाला दहा पांच सेकंदही लागले नसतील. परंतु तितकावेळही मी स्वस्थ बसलेला तिला खपलें नाहीं. " अरे निर्दया, मी तुझी इतकी विनवणी करीत असतां—मी किती परवश आहे हें तुला सांगत असतां व तुला तें माहित असतां—तूं अद्या-पही आपला राग सोडीत नाहींस ना ! मजसंबंधीं तुझ्या मनांत कांहीं विकल्प तर आला नाहींना ! तुझ्या शिरीनूवरचें तुझें प्रेम कमी तर झालें नाहींना ! किंवा आपल्या उभयतांच्या प्रणयामध्यें हजार विघ्नें पाहून तुझें मन उद्विग्न झालें नाहींना ! "

तिच्या इतक्या विनवण्या ऐकून माझी सदसद्विवेकबुद्धि केव्हांच पळून गेली होती. व तिच्या मनोदयाप्रमाणें मी वाटेल तसा वागावयाला व वाटेल ती बतावणी करावयाला तयार झालों होतों. परंतु आपण जर बोलूं लागलों तर तिच्या प्रियकराच्या व माझ्या आवाजांतील भिन्नत्व कळून आपल्या सर्व मनोरथावर विरजण पडेल अशी मला नवीनच भीति उत्पन्न झाली. तथापि काय होईल तें होवो, असा विचार करून अगदीं पार्शी तऱ्हेवर बोलण्याचा मीं उपक्रम केला. मी गुजराथी असल्यामुळें त्यांची भाषा मला पूर्ण अवगत होतीच. मी तिच्या गालाला हात लावून ह्मणालों, "प्यारी शिरीन्, तुझ्यासारख्या परीसाठीं एखादा राजा असला तर तो आपलें राज्यही सोडण्यास तयार होईल. असें असतां मी तुझा आव्हेर करीन हें घडेल तरी कसें ! परंतु आज माझें मन अगदीं उदास झालें आहे. तेव्हां माझ्यानें कांहीं बोलवत नाहीं. " इतकेंच मोघम बोलून आपला आवाज ही ओळखते कीं काय, अशा भीतीनें ती पुढें काय बोलते तें ऐकण्याकरितां साशंक मुद्रेनें मी तिजकडे पहात राहिलों. त्यावर ती तरुणी एकवार माझ्या

केंसांवर हात फिरवीत मला चुंबन देऊन ह्मणाली, " फिरोज्, या तुझ्या चारच शब्दांनीं मला किती समाधान झालें आहे ह्मणून सांगूं. माझ्या मनांत जें संशयाचें काहूर उठलें होतें तें एकदम नाहींसें झालें. तुझ्या प्रेमाची मी भुकेली आहें. जगांत दुसरी कोणतीही गोष्ट मला अधिक प्रिय नाहीं. तुजकरितां मी वाटेल तें साहस करीन. वाटेल तीं संकटें सोशीन. परंतु तूं असा स्वस्थ बसलास ह्मणजे मात्र माझा सर्व धीर खचतो आणि माझ्या सर्व आशा विरघळून जातात. तुझें मन अस्वस्थ होणें हें अगदीं स्वाभाविक आहे. आपल्या कमनशीबानें तुला कोणाचा आधार नाहीं. दुर्दैवानें परीक्षेंतही दोन तीन वेळां प्रयत्न करून तुला यश आलें नाहीं. माझ्या आईबापांची आपल्या लग्नाला संमती नाहीं. असल्या स्थितींत मनुष्य कितीही धीराचा असला तरी तो उदास होईल. तथापि तूं धीर सोडून चालणार नाहीं. माझ्या सर्व आशा, सारी उमेद तुजवरच अवलंबून असणार आणि तूंच जर असा धीर सोडूं लागलास तर मीं कोणाच्या तोंडाकडे पहावें ! तें असो. मीं बरोबर शराब आणली आहे ही अगोदर थोडी घे ह्मणजे तुझी उदासीनता नाहींशी होईल. " असें ह्मणून तिनें जवळच्या बॅगमधून एक बाटली काढून तींतील शराब ग्लासांत ओतून मला दिली. त्यापुढें माझा धर्म, माझी लाज यांचा पाडाव होऊन आजपर्यंत कधींही स्पर्श न केलेल्या त्या पेल्याचा मीं मुकाट्यानें घोट घेतला. थोड्याच वेळानें आणखी एक घोट दिल्यावर माझ्या अंगांत अपरिचित तरतरी व जोम येत आहे असें मला वाटलें. तिनें आपला आवाज ओळखला नाहीं हें पाहून मला बोलण्यास अधिक हुशारी आली. हा माझ्या अंतःस्थितींत बदल झालेला माझ्या चेहऱ्यावरून तिनें तावडतोब ताडला तेव्हां धक्यावर असलेल्या जॉली बोटींत बसून जलक्रीडा करण्याची तिनें आपली इच्छा प्रदर्शित केली. आजूबाजूला असलेल्या मंडळींच्या योगानें माझ्या मनाला जो संकोच वाटत होता तो नाहींसा करण्यास ही चांगलीच युक्ति होती. त्या कारणानें तिच्या ह्मणण्यास अगदीं कांकूं न करितां मीं एकदम रुकार दिला. व आह्मीं दोघेही लागलींच एक जॉली बोट ठरवून जलपर्यटणास निघालों.

रात्रीचा समय, समुद्रावरील मंद मंद वारा, चंद्नाप्रमाणें शीतल असा

चंद्रप्रकाश, समोरील मुंबापुरीच्या एका अत्यंत मनोहर भागाचा देखावा, सागराचा एकांत, जवळ स्वर्गांगनातुल्य अशी कल्पनेंतही प्राप्त न होणारी मोहक तरुणी आणि सर्व चिंतेचा लय करणारी, विवेकाचा नाश करणारी व मनावर पूर्ण स्वामित्व चालविणारी अशी जी भगवती मदिरा तिच्या वश झालेला देह. ह्या सर्व गोष्टी ह्मणजे मदनाचें साम्राज्य सर्वथैव चालवण्यास अगदीं अनुकूल अशा स्थितींत त्या कोमलांगीसह त्या अनंत सागरांत नौकाक्रीडा करण्याचा हा माझ्या जन्मांत पहिलाच प्रसंग होता. त्या कारणानें मी काय करीत आहे, कोठें चाललों आहे, याचा परिणाम काय होईल इत्यादि गोष्टींचा विचारही मनांत न येतां मी निःशंकपणें बसलों होतों. आमची नांव समुद्रांत बऱ्याच अंतरावर गेल्यावर मी कामातुर होऊन नवीन फुललेल्या गुलाब पुष्पावर झेंपावणाऱ्या भुंग्याप्रमाणें बेहोष झाल्यानें तिच्या अधरबिंबप्राशनाचा यथेच्छ उपभोग घेण्याविषयीं मी अत्यंत उत्कंठित झालों होतों. फेटमध्यें हिंडत असतां विजेप्रमाणें तेथें अशी चमकणारी ही तरुणी कित्येक वेळा माझ्या नजरेस पडे त्यावेळीं तिची सहजगत्या दृष्टी मजकडे वळलेली पाहून माझें मन आनंदानें उड्या मारूं लागे. पदराचा नुसता वायु लागला तर माझ्या शरीरांत नवीन प्राणवायू शिरल्याप्रमाणें माझें चैतन्य द्विगुणित होई. तिची ती वेलींना आणि लतांनाही नृत्य शिकवणारी चाल पाहून हिच्या चरणीं लोटांगण घ्यावें अशी इच्छा उत्पन्न करी. तिचें पंचम सुरांतलें भाषण माझे पंचप्राण व्याकुळ करी. परंतु ही तरुणी अशारीतीनें मला प्राप्त होईल हें माझ्या स्वप्नींही नव्हतें. ज्याप्रमाणें नित्यशः शहरांतून जातांना अनेक विलासवती युवती पाहून आपल्या विषयलोलुप मनाला क्षणमात्र वेड लागतें व क्षणार्धांत आपण त्यांची आठवण विसरून जातों त्याप्रमाणेंच तिचें तें दर्शन क्षणमात्र चटका लावून स्मृतिशेष होईल असेंच त्यावेळीं माझ्या मनाला वाटलें. पुन्हा कारंज्याजवळ गांठ पडली त्यावेळीं त्यांतील विजेच्या दिव्यांची प्रभा तिच्या मनोहर मुखावर पसरली असतां व तिच्या नेत्रकिरणांनीं माझे प्राण आकर्षून घेतले असतां इंद्राच्या अप्सरेप्रमाणें भासणारी त्यावेळची तिची मूर्ति पाहून तिनें तीन, चार वेळ आपल्याकडे पाहिलें याच्या योगानें स्वतःला कृतकृत्य मान-

णारा मी तिचें थोडक्याच काळांत चुंबनसुख अनुभविण्यास पात्र होईन असें जर एखाद्या ज्योतिषानें भाविष्य वर्तवून मला सांगितलें असतें तर मीं त्याला वेडा ह्मटलें असतें. इतकेंच नव्हे तर अशा कुलीन घराण्यांतल्या थोर स्त्रीविषयीं भलतेच उद्गार काढून तिच्या पश्चात् तिच्या नांवाला कलंक लावल्याबद्दल मी त्याची निर्भर्त्सना करण्यालाही तयार झालों असतों. इतकी असंभाव्य गोष्ट घडून आलेली पाहून मला माझ्या दैवाची व देवाची किती धन्यता वाटली असेल त्याची कल्पनाच केली पाहिजे !

मी आनंदांत चूर होऊन अगदीं खुललों आहे असें पाहून त्या सुंदरीनें आपला कोमल हात माझ्या खांद्यावर ठेवून मला ह्मटलें, " प्रियकरा, मीं तुला मद्य जी शराब दिली तिच्या योगानें तुझी उद्विग्नता बरीच कमी झाली आहे. तेव्हां ती आणखी एकवार प्राशन करून, मीं बरोबर आणलेले उपहाराचे पदार्थ सेवन कराल तर याहून जास्त हुषारी वाटल्यावांचून रहाणार नाहीं. यावेळीं मी तिचा बंदा गुलामच बनलों होतों. तेव्हां तिची आज्ञा मला शिरसा प्रमाणच होती. तिनें आणलेले सर्व पदार्थ खाल्यावर मला उद्देशून ती पुन्हा ह्मणाली " पिरोज, आतां मात्र तूं रोजच्यासारखा आनंदी दिसूं लागलास. आतां मीं जो मनांत बेत योजला आहे व ज्याकरितां ही एकांताची संधि आणली आहे तो तूं ऐकून घ्यावास अशी माझी विनंती आहे. एल्, एम्, एस्. च्या परीक्षेला तुला तिन्ही वेळेलाही यश आलें नाहीं व परीक्षा पास झाल्याशिवाय आपले हेतु सफळ होणें शक्य नाहीं. तेव्हां तूं विलायतेला जाऊन परीक्षा देऊन यावेस अशी माझी फार इच्छा आहे. आतां विलायतचा प्रवास करून येण्यास तुजजवळ पुरेसा पैसा नाहीं हें मला माहीत आहे. तथापि त्याचीही मीं व्यवस्था केली आहे. " असें ह्मणून तिनें जवळ असलेल्या बॅगमधून एक लहान पेटी काढिली व ती उघडून ती पुढें ह्मणाली, " मीं मोठें साहस करून माझ्या आईच्या ह्या चार हिऱ्याच्या बांगड्या बरोबर आणिल्या आहेत. ह्या व माझ्या हातांत असलेल्या दोन इतक्या मिळून तुझ्या प्रवासाची बेगमी होईल अशी माझी खात्री आहे. तेव्हां या घेऊन माझ्या घरच्या मंडळीस या गोष्टीची

बातमी लागण्यापूर्वींच विलायतेला जाणारी जी पहिली बोट तुला सांपडेल त्या बोटीनें परीक्षा देण्यासाठीं जावेंस अशी माझी विनंति आहे. कारण परीक्षा पास होऊन तूं स्वतंत्र धंदा करूं लागलास ह्मणजे मला माझे आईबापांचे मर्जीविरुद्ध सुद्धा लग्न करण्याला मुळींच अडचण पडणार नाहीं. "

मी ती डंकणें पाहातांच मनांत दचकलों. एकदार माझ्या मनांत संशयही आला. परंतु, तीं हातांत घेऊन पहातांच चंद्रप्रकाशांत त्यांच्या चमकत असलेल्या तेजानें तो क्षणार्धांत नाहींसा झाला. हा वेळपर्यंत चाललेल्या अद्भुत प्रकारांत हा एक नवा चमत्कार पाहून मी अधीकच गोंधळलों व हा कांहीं जादूचा प्रकार आहे कीं काय असें मला वाटूं लागलें. तथापि मी याबेळीं मदिरावश झालों होतों; पण त्या स्थितींतही विशेष गोंधळून न जातां कांहीं तरी बोलून सोंगाची बतावणी उत्तम रीतीनें करीत होतों. तिनें ती पेटी दिल्यावर मी ती तशीच हातांत घेतली. तेव्हां तिनें आपल्या गळ्यांतून वक्षप्रदेशावर रुळत असलेली एक माळ काढून आपली आठवण ह्मणून माझ्या हातांत दिली व माझ्या हातांत असलेली हिऱ्याची आंगठी माझें स्मरण ह्मणून मागून घेतली. माझ्या हातांतील आंगठीचा खडा जरी अतीशय मौल्यवान् होता तरी जिनें आपले सर्व दागिने माझ्या हवालीं केले तिच्या प्रेमापुढें तो मला त्यावेळीं केवळ गारगोटीसारखा भासला व मीं ती आंगठी देण्याबद्दल यत्किंचितूही कुरकुर केली नाहीं ! तिनें सुचवल्याप्रमाणें लवकरच जाण्याची तयारी करतों असें मी तिला सांगितलें; आणि दोन तीन दिवसांनीं एका विशिष्ट ठिकाणीं भेटण्याचें तिनें मला वचन दिलें ! यावेळीं आमची नाव परत येत होती. ती धक्यास लागतांच नावाड्याचे पैसे दिले व प्रेमातिशयानें तिचा सुकुमार हात आपल्या हातांत धरून मी तिच्यासह धक्यावर आलों.

धक्याच्या पाहिऱ्या चढून आह्मी वर आलों तों तेथें दोन तरुण स्त्रिया आमची वाट पहात उभ्या आहेत असें मला दिसून आलें. त्यांच्यापैकीं एक गुजराथी व दुसरी युरोपियन होती. आह्माला पहातांच त्यांनीं आमच्या सुखरूप येण्याबद्दल आपल्याला आनंद होत आहे असें आपल्या स्मित वदनांनीं दर्शविलें. आणि शिरीन्‌चा हात धरून

त्या एका अंगाला गेल्या व तेथें मला ऐकूं न येईल अशा बारीक आवाजानें कायसें बोलत सुमारें पांच सात मिनिटें उभ्या होत्या.

या वेळीं सुमारें दोन वाजून गेले असावेत. बंदरावर आमच्याप्रमाणें हवा खाण्यासाठीं व आपल्या मनाची हौस नानाप्रकारच्या विलासांनीं पुरविण्यासाठीं आलेल्या कामी जनांची गर्दी मोडत चालली होती. तेथें जमलेली बहुतेक मंडळी आतां परत चालली होती त्यामुळें थोड्याच वेळांत जिकडे तिकडे अगदीं शुकशुकाट झाल्यासारखें दिसूं लागलें.

तेथें उभीं असलेलीं निरनिराळ्याप्रकारचीं वाहनें आतां तेथून निघून गेलीं. चंद्रबिंबानें उल्हासित झालेल्या सागराचा तो एकांत आतां आसपासच्या शांततेमुळें अधिकच आल्हादकारक वाटूं लागला. मध्येंच आगगाड्यांच्या शिटांचा आवाज कानीं येई; पण त्यानें उत्पन्न झालेल्या प्रतिध्वनीमुळें आसमंतांत त्यावेळीं सर्वत्र नांदत असणाऱ्या शांततेची कल्पना येऊन सृष्टिदेवीचें तें निरामय स्वरूप कौतुकानें पाहण्यांत दंग होऊन गेलेल्या माझ्या मनाला परमावधीचा आनंद होत होता.

इतका वेळ माझ्या मनावर झालेला मदिरेचा अंमल कांहींसा कमी झाल्यासारखें मला आतां वाटूं लागलें होतें; व माझ्या पासून बऱ्याच अंतरावर उभ्या असलेल्या स्त्रिया काय बोलत आहेत हें जाणण्याची जिज्ञासा माझ्या मनांत एकाएकीं उद्भवली. पण त्या तिघी तरुणी आपापसांत बराच वेळ कांहीं तरी कानगोष्टी करीत होत्या; व त्यांचें बोलणें मला ऐकूं येण्यासारखें नव्हतें. तरी “ परवापासून मीं तुला किती तरी वेळां सांगून पाहिलें; पण तूं कांहीं ऐकलें नाहींस. अशीं कामें घाईनें होत नसतात. आतां थोडक्यांतच कांहीं भलता सलता प्रसंग आला नाहीं ह्मणजे मिळविली. ” असे त्यापैकीं ऐकीनें उच्चारलेले शब्द माझ्या कानीं आले ! व लागलीच माझ्या मनांत एकाएकीं एक प्रकारची भीति उत्पन्न होऊन, आपण आज केलेलें कृत्य कांहीं ठीक नाहीं; थोडक्यांतच आपल्यावर कांहीं तरी संकट येणार अशी माझ्या भयभीत झालेल्या मनानें मला इशारत दिली. तोंच त्या पैकीं एक तरुणी किंचित् कापऱ्या आवाजानें ह्मणाली “ होऊं नये असें चुकून—झालें खरें; पण याला आतां उपाय काय करावा ? ”

दुसरी किंचित् धीर देऊन म्हणाली " मी मघाशीं सांगितलेली युक्ती आतां केली म्हणजे झालें. माझ्या सांगण्याप्रमाणें तुम्ही जर वागाल तर– "

तिचें हें वाक्य संपण्यापूर्वीच एक अतीशय वेगानें धांवत येणारी घोड्याची गाडी एकदम आमच्या जवळ येऊन धडकली !

त्या वेळची माझी स्थिती लक्षांत आणली म्हणजे माझ्यावर आतां कोणतें संकट येणार हें कोणीही सांगूं शकेल. दुसऱ्याच्या स्त्रीला भुरळ घालून वश करूं पाहणाऱ्या व विषयांध बनून गेल्यामुळें पाहिजे तो अविचार करायला सिद्ध होणाऱ्या नरपशूवर प्रायः कोणतें संकट येणार हें ज्याचें त्याला चांगलें कळत असतें ! माझी आतां थोडक्यांतच काय वाट होणार हें मला स्पष्टपणें समजून आलें होतें. आम्हांवर ओढवणाऱ्या भावी संकटाची कल्पना त्या तिघी तरुणींनाही आलेली असून ती त्यांनीं नुकतीच व्यक्त केली होती; व तें संकट टाळण्याचा कांहीं तरी उपाय त्यांनीं योजिला असावा असें त्यांच्यामध्यें झालेल्या संवादावरून मीं ताडलें होतें. त्यांनीं आपल्या विचाराप्रमाणें कांहीं तरी युक्ती काढून ठेवली होती हें जरी खरें असलें तरी त्यांनीं मनांत आणलेल्या उपायानें माझें संरक्षण होणार नाहीं असें मला वाटूं लागलें. कारण माझ्यावर येऊं पाहणाऱ्या संकटाची त्यांना कांहीं खरी कल्पना येणें शक्य नव्हतें. त्यांना वाटत असलेल्या भीतीचें कारण व माझ्यावर येऊं पाहणारें संकट या दोन्हीं गोष्टी अगदींच निरनिराळ्या होत्या. इतकी अपरात्र झाली तरी आपण आपापल्या घरोंघरीं गेलों नाहीं यामुळें आपले आईबाप, आपल्या घरचीं मोठीं माणसें आपल्याला काय म्हणतील या विचारावांचून घाबरून जाण्याला त्यांना कांहींच कारण नव्हतें. त्या पारशी तरुणीनें पिरोजला–तिच्या प्रियकराला–भेटण्याची घाई करावयाची नव्हती असें तिच्याशीं बोलणाऱ्या तिच्या मैत्रिणीच्या भाषणावरून मी समजलों व या तिच्या हातून झालेल्या चुकीमुळें तिचे आईबाप तिच्यावर रागावतील तेव्हां तिनें त्यांची क्षमा मागणें हाच उपाय त्यांनीं आपल्या मनाशीं ठरवून ठेवला असला पाहिजे असें त्यांचीं एकंदर परिस्थिती ध्यानांत येतांच मीं ताडलें होतें. रात्रीं अपरात्रीं आपल्या तरुण मुलींनीं बाहेर राहणें-- आपल्या बरोबर कोणीही मोठें माणूस नसतांना बाहेर राहणें–

ही गोष्ट कोणत्याही आईबापांना खपणार नाहीं. पण लेकरांनीं त्यांना न कळतां कितीही अपराध केले तरी त्याबद्दल क्षमा करणें हें आईबापांचें कर्तव्य असतें. तेव्हां शिरीन्वर तिच्या आईबापाच्या रोषाचें आलेलें हें आगंतुक संकट ह्मणण्यासारखें भयंकर नव्हतें. पण माझी स्थिती मात्र अत्यंत कठीण झाली होती. आपल्यामुळेंच ह्या अल्लड पारशी तरुणीला आपल्या आईबापांचा रोष करून घ्यावा लागला तरी रात्रीं तिच्या खऱ्या प्रियकराशींच तिची भेट झाली असती तर तिला दुसरें दिवशीं आई-बापांच्या रोषाचें फारसें कांहीं वाटलें नसतें; पण आपणच तिचा प्रियकर पिरोज आहों असें लबाडीनें भासवून तिला विनाकारण फशीं पाडलें असें तिच्या ध्यानांत आलें तर तिला अतोनात त्रास होईल. तिनें आपलें प्रेम तिच्या दृष्टीनें योग्य ह्मणून ठरविलेल्या एका तरुणाला अर्पण केलें असतांना केवळ तिच्या अज्ञानाचा फायदा घेऊन आपण नीचपणानें तिला भुरळ घालीत आहों वगैरे गोष्टींबद्दल त्यावेळीं पश्चात्ताप वाटून मला मनस्वी दुःख झालें; पण त्याचा तादृश उपयोग मात्र झाला नाहीं ! कारण वास्तवीक पाहतां त्या तरुणीप्राप्तीसंबंधानें कोणत्याही प्रकारची आशा मनांत न धरितां त्या तिघींचें लक्ष्य चुकवून ताबडतोब तेथून चालतें व्हावें असें मला पुष्कळ वेळां वाटलें असूनही तशी कृती मात्र माझ्या हातून घडली नाहीं !

परस्त्रीचा अभिलाष धरून पाहिजे तें निंद्य कर्म करायला तयार होणाऱ्या बद्फैली माणसाला, किंवा दारूनें वेळोंवेळीं झिंगून आपल्या सर्वस्वाची माती करूं पाहणाऱ्या माणसाला आपलें आचरण पशुतुल्य आहे हें चांगलें समजत असतांना तें सोडून देण्याला तो मनुष्य सहसा तयार होत नसतो. हाच न्याय थोड्याशा फरकानें मलाही लागू होण्या-सारखा होता. परस्त्रीला वश करणें हा जरी तसल्या घाणेरड्या कर्मांत आपलें आयुष्य वेंचणाऱ्या कांहीं नीच माणसाप्रमाणें मी आपला व्यव-साय बनविला नसला तरी असल्या अमंगल कर्मांच्या भयंकर परिणामाचें चित्र माझ्या डोळ्यापुढें उभें राहिलें असतांनाही त्या तरुणीचा नाद् सोडून देण्याला मी तयार झालों नाहीं ही मोठ्या शरमेची गोष्ट होय ! फेट्रमध्यें मौज पहात असतांना त्या तरुणीचा जर मी अभिलाष धरिला

नसता तर माझ्यावर असा दुर्धर प्रसंग ओढवण्याचें कांहीं कारणही नव्हतें. सारांश, त्यावेळीं मी समजून उमजून करूं नये अशी गोष्ट करायला तयार झालों होतों; व होतां होईल तों त्या तरुणीचा नाद न सोडतां तिला वश करावयाची; पण त्या गोष्टीचे दुष्परिणाम मात्र चुकवि-ण्याची कांहीं तरी अजब युक्ती काढावयाची असा मी आपल्या मनाशीं निश्चय केला !

याप्रमाणें बराच वेळ मी विचार करून पाहिला; पण कोणताही त्रास भोगावा न लागतां शिरीनला वश करण्याची युक्ती कांहीं मला सुचेना. पण नाना प्रकारच्या भीतिप्रद कल्पनांनीं मात्र मनाला अतीशय गांगरून टाकलें. तेथें उभ्या असलेल्या गाडींतून शिरीनचा प्रियकर पिरोज तिच्या शोधासाठीं आला असावा; शिरीनशीं आपण केलेलें कपट त्याला कळतांच तो या भयंकर अपराधाबद्दल आपला सूड घ्यायला कमी कर-णार नाहीं असें ती गाडी दृष्टीस पडतांच मला एकाएकीं वाटलें व कल्प-नेनें बनविलेलें पिरोजचें भयानक स्वरूप मला त्यावेळीं जिकडे तिकडे दिसूं लागलें. भयानें एकाएकीं माझे हातपाय लटूलटू कांपू लागले. आतां आपली कांहीं धडगत दिसत नाहीं असें मला कळून चुकलें. वास्तविक मी जातीचा कांहीं अगदींच भित्रा नव्हतों; व माझा कोणत्याही प्रकारचा अपराध नसतां केवळ यदृच्छेनें माझ्यावर एखादें संकट आलें असतें तर मी यत्किंचितही न डगमगतां त्याला धर्मानें तोंड देण्याला मागें पुढें पाहिलें नसतें व त्यामध्यें मला कदाचित् यशही आलें असतें. पण त्यावेळीं माझें सर्व धैर्य एकाएकीं ती गाडी पाहतांच गळून गेलें ! मनुष्य-प्राणी स्वभावतः कितीही धैर्यवान् असला तरी कोणत्याही बाबतींत त्याचा स्वतःचा कांहीं अपराध असला, सद्सद्विवेक बुद्धीला न जुमानतां त्यानें जर एखादें पापाचरण केलें असलें, दुसऱ्या प्राण्याला त्यानें जर विनाकारण कोणत्याही प्रकारचा त्रास दिला असला तर त्याचें सर्व धैर्य, बल, अवसान लुलें पडावयाचें असा नियम आहे. शिवाय तेवढ्या वेळा-पुरतां जरी त्यानें संकटापासून मोठ्या युक्तीप्रयुक्तीनें, कावेबाजपणानें आपला बचाव केला तरी स्वतः आचरिलेल्या निंद्य कर्माचें त्याला प्रायश्चित्त मिळाल्यावांचून रहात नाहीं, हें मला माहीत नव्हतें असें नाहीं; असो.

याप्रमाणें त्यावेळीं भावी संकटाची माझ्या मनानें एकाएकीं दहशत घेतली. पण तशा स्थितींतही चटकन् पळून जाण्याचा मी निश्चय केला; व आपल्या पायांना गती देणार तोंच एक पारशी तरुण गाडींतून खालीं उतरतांना माझ्या दृष्टीस पडला. त्याला पाहतांच आपला काळ आला असें वाटून मी अगदीं गर्भगलित झालों व माझ्या शरीराला घाम सुटला.

---

# प्रसंग ३ रा.

पारशी तरुण गाडींतून उतरतांच त्या स्त्रियांच्या जवळ गेला व त्यांच्याशीं थोडावेळ कांहींसें कुजबुजला आणि पुन्हां गाडीकडे वळला. हें पाहतांच आतां हा येथून निघून जाणार असें मनांत येऊन मला थोडासा धीर आल्यासारखें वाटूं लागलें; तोंच त्या तरुणानें गाडीमधून एक हँडबॅग काढली व ती शिरीनजवळ देऊन तो पुन्हां गाडीकडे वळला.

हें काय गौडबंगाल आहे हें मला समजेना. हा तरुण जर खरोखरी शिरीनचा प्रियकरच असता तर त्याच्या शिरीनबरोबर मला पाहतांच तो स्वस्थपणानें राहिला नसता, असें मला वाटून मी आपल्या घाबरून गेलेल्या मनाला धैर्य दिलें; पण ज्याअर्थी तो गाडींतून उतरतांच शिरीन-जवळ जाऊन कुजबुजला त्याअर्थी त्याच्या मनांत माझा सूड घेण्या-विषयींचा कांहीं तरी खोल विचार— कीं जो एकदम मला समजणार नाहीं असा विचार— आला असावा असें मी आपल्या मनाशीं ठरविलें व तेवढ्या वेळा पुरती माझी कल्पना बरोबर आहे असें मला दिसून आलें. कारण त्या तरुणानें दिलेली ती हँडबॅग हातांत घेऊन लागलीच शिरीन एकटीच माझ्याकडे आली, व माझ्याकडे पहात पहात तिनें ‘ पिरोज ’ अशी मोठ्यानें हांक मारिल्याचा मला भास झाला.

आतां या संकटांतून जीव बचावून बिऱ्हाडीं परत जाण्याची आशाच नको असें मला पक्कें कळून चुकलें. तिनें मारिलेली हांक माझ्या कानीं येतांच माझें सर्व लक्ष्य गाडीकडे वेधून गेलें; व गाडींतून पुन्हां तो तरुण बाहेर येऊन त्या दोन स्त्रियांजवळ जाऊन उभा राहिला असें मला दिसलें.

आतां एकदम माझी भीती नाहींशी होऊन संकटाला तोंड देण्याचें धैर्य करून मी आपल्या शत्रूशीं— शिरीनच्या प्रियकराशीं—दोन हात करण्यासाठीं मोठ्या अवसानानें किंचित् पुढें सरसावलों; व त्याच्या अंगावर चाल करून जाणार तोंच शिरीन माझ्याजवळ आली. माझ्या प्रतिस्पर्ध्याशीं झगडण्यासाठीं मी जरी आपल्या अंगांत उसनें अवसान आणलें होतें; तरी पण भयानें माझें सर्वांग अजून हुडहुडी भरल्याप्रमाणें थरथर कांपत होतें. आपण अतीशय भिऊन गेलों आहों हें शिरीनला समजूं देणें इष्ट नाहीं असें जरी मला वाटत होतें तरी माझ्या सर्व शरीरामध्यें त्यावेळीं एकाएकीं उद्भवलेला भीतीचा विकार नाहींसा करणें अगदींच अशक्य होऊन गेलें होतें.

शिरीन माझ्या अगदीं नजीक आली व माझें शरीर लट्लट् कांपत आहे असें पाहून ह्मणाली " पिरोज, तुला फार थंडी वाजत असावी असें दिसतें. कोण मेला हा आजचा गारठा ! पिरोज, थंडीनेंच कां तुझे हातपाय कांपताहेत ? आपण आतां पुन्हां थोडीशी शराब घेऊं ह्मणजे तुझ्या अंगांत थंडीची भरलेली ही हुडहुडी तेव्हांच नाहींशी होईल. आणखी आपण लागलीच घरीं जाऊं ह्मणजे झालें. "

इतकें सांगून आपली हॅंडबॅग तिनें लागलीच उघडली आणि दोन ग्लास व व्हिस्कीची बाटली बाहेर काढून दोन्ही ग्लासांत तिनें थोडथोडी मदिरा ओतली. तिच्या बोलण्यावरून निदान यावेळीं तरी कांहीं दगाफटका होणार नाहीं असें मला वाटलें.

तिकडे तीं तिन्हीं माणसें आपापसामध्यें कुजबुजण्यांत अगदीं गर्क होऊन गेलीं होतीं. थोडक्याच वेळांत त्यांचें काय ठरलें असेल तें असो. पण तो पारशी तरुण गाडीवाल्यापाशीं गेला व त्याला हलकेंच कांयसें सांगून तो मोठ्या झपाट्यानें चालूं लागला; व पाहतां पाहतां कोठें दिसेनासा झाला !

आतां शिरीनच्या दोन्हीं मैत्रिणी आमच्याजवळ येऊन बसल्या व माझ्याकडे पाहून त्या तिघी तरुणी एकाएकीं मोठमोठ्यानें हंसूं लागल्या ! यावेळीं असें हंसण्याचें त्यांना काय कारण वाटलें असेल तें त्यांचें त्यानांच माहीत ! त्यांचे चेहरे त्यावेळीं कांहीं चांगले दिसण्या-

सारखे नव्हतें. तरी भीतीनें मी गांगरून गेलों आहे असें पाहूनच त्यांना हंसूं आलें असावें अशी मला लागलीच शंका आली. पण बराच वेळपर्यंत त्यांच्याशीं मी एक अक्षरही बोललों नाहीं. कारण त्यांच्याशीं निर्धास्तपणानें बोलण्याचें धैर्य माझ्यामध्यें राहिलें नव्हतें ! भयानें माझी वाचा बसण्याचींच वेळ आली होती; व तो पारशी तरुण जर इतक्यांत तेथून निघून न जातां मी उभा होतों तेथपर्यंत आला असतां तर त्याच्याशीं दोन हात करण्यापूर्वींच कदाचित् माझें सर्व धैर्य, अवसान वगैरे एकाएकीं गळून मी बेशुद्धही होऊन पडलों असतों; पण आपल्यावर आलेलें संकट तेवढ्या वेळा पुरतें तरी टळलें असें पाहून मला किंचित् बरें वाटलें. तरी पण त्या परक्या स्त्रियांच्या-- शिरीनच्या मैत्रिणींच्या-- देखत तिच्याशीं बोलण्याची मला लाज वाटत होती.

आपण विचारलेल्या प्रश्नाला मी कांहींच उत्तर देत नाहीं असें पाहून शिरीन किंचित् लडिवाळपणानें मला ह्मणाली " पिरोज, या परक्या स्त्रियांच्या देखत माझ्याशीं बोलण्याचा तुला कदाचित् संकोच वाटत असेल; पण तसें तूं मुळींच समजूं नको. या माझ्या अगदीं जिवाच्या मैत्रिणी आहेत. तुझ्याशीं घडून येणाऱ्या माझ्या संबंधानें या दोघींनाही मोठा आनंद होत आहे. आतां आपण सर्वजण थोडीशी शराब घेऊं व लागलीच येथून निघून जाऊं. "

असें सांगून तिनें बॅगमधील एक सोडावॉटरची बाटली उघडून ती दोन्ही ग्लासांत ओतली व एक ग्लास माझ्यापुढें केला. तो कोणत्याही प्रकारचे आढेवेढे न घेतां मीं लागलीच पिऊन टाकला.

आपलें प्रेम माझ्यावर जडलें आहे ही गोष्ट शिरीननें इतक्यांतच आपल्या मैत्रिणींना कळूं द्यायची नव्हती असें मला वाटलें; व तिच्या त्या अमर्यादपणाबद्दल मीं मनांत तिला थोडासा दोषही दिला. तिच्या त्या मैत्रिणी माझ्याकडे एकसारख्या टक लावून पहात होत्या; व तिची ती गुजराथी सखी तिला ह्मणाली " गडे शिरीन् आतां येथून तूं आपल्या घरीं जातां जातां मला माझ्या घरीं पोंचविशील तर बरं होईल. मी आतां इतक्या रात्रीं एकटी कशी जाऊं ? "

मदिरेनें भरलेला पेला तोंडाला लावीत असतांना शिरीननें उत्तर केलें,

" माणेक, मी ह्मणते कीं, आतां आपण तिघीही माझ्याच घरीं जाऊं. आणखी सकाळीं उजाडण्याच्या अगोदर मी तुह्मांला तुमच्या घरीं पोंचत्या करीन ह्मणजे झालं. "

" शिरीन तुमचं दोघींचं आपलं ठीक आहे " माणेकबाई तिला ह्मणाली, " ल्यूसी काय किंवा तूं काय ? तुह्मी किती वेळ जरी घराबाहेर राहिला, आणखी पाहिजे तेव्हां घरीं गेला तरी तुह्मी स्वतंत्र आहां. आपल्या आईबापांच्या तुह्मी आवडत्या ! तुह्मांला रागें कोण भरणार आहे ! पण माझं कुठें आहे बाई तसं भाग्य ! त्यांतूनहीं तूं ह्मणतेस तसं मी केलं असतं; पण माझे बाबा लिमडीला गेले आहेत ते आज सकाळच्या मेलनें दिवस उगवण्याच्या अगोदरच परत येतील, त्यावेळीं मी घरीं नाहीं असं त्यांनीं पाहिलं ह्मणजे ते रागावतील. तेव्हां आतांच्या आतांच मला घरीं गेलं पाहिजे. "

" छे, छे, माणेक " ल्यूसी मध्येंच ह्मणाली " तुझी समजूत चुकीची आहे. तुला वाटतं तितकं या बाबतींत मला सुख नाहीं. मी आज इतक्या रात्रीं-पर्यंत बाहेर राहिलें हीच मोठी चूक झाली. आई मला उद्यां काय ह्मणेल याची मला मोठी धास्ती वाटते आहे. मागं अशीच एकदां मी आईला न विचारतां एका मैत्रिणीच्या घरीं राहिले होतें तेव्हां दुसरे दिवशीं आई मला फार रागं भरली. आतां मी जरी एकटी घरीं गेलें तरी कांहीं मोठीशी हरकत नाहीं म्हणा— "

" मी नाहीं गं बाई असल्या रात्रीं एकटी जायची. शिरीन्, माझ्या घरापर्यंत तूं मला नाहीं कां पोंचविणार ? हें पहा, तूं माझ्या बरोबर आलीस ह्मणजे कीं नाहीं, यायला इतकी रात्र कां झाली असं मला घरीं कोणी विचारणार दिखील नाहीं. " असें सांगतांना तिच्या पुढें शिरीननें ठेवलेला ग्लास माणेकनें तोंडाला लावला; पण तो न पितां तिनें तसाच जमीनीवर ओतला; व रागाचा आविर्भाव आणून ती शिरी-नला म्हणाली " अगं बाई हें काय हें ! आजच्या सोड्याला घाण कसली येते आहे ही ! मला तर बाई अगदीं ओकारीच आली ! "

शिरीन् ग्लासामध्यें व्हिस्की ओतींत असतांना माणेकनें पाहिलें नव्हतें

असें नाहीं; तरी पण तो ग्लास तोंडाला लावतांना ती असें कां म्हणाली हें मला समजलें नाहीं !

याप्रमाणें त्या तिघींचें बोलणें चाललें होतें; पण होतां होईल तों तोंडावाटे एक अक्षरही काढायचें नाहीं असा मीं बेत केला होता. वास्तविक पाहतां शिरीनच्या प्रियकराबद्दलची मला जी भीती वाटत होती ती आतां बरीच नाहींशी होत चालली होती. तिच्या बरोबर फेरीमध्यें बसून जलक्रीडा करीत असतानांही तिच्याशीं मी फारच थोडें बोललों होतों; व तसें करीत असतांना मी आपला नेहमींचा खरा आवाज तिला कळूं न देण्याविषयीं शक्य तितका यत्न करीत होतो; कारण हा आपला प्रियकर पिरोज नसून दुसराच कोणी तरी आहे अशी तिला यत्किंचितही शंका आली तर आपला सर्वस्वी घात होईल अशी मला मोठी भीती वाटत होती.

आम्हीं सुरापान करीत असतांना मी त्यांच्याशीं बोलण्याचा प्रसंग टाळीत होतों तो तरी याच भीतीमुळें होय. समुद्रांतून परत येईपर्यंत आपल्या मागोमाग शिरीनचा प्रियकर, अथवा दुसरा कोणी इसम आपला पाठलाग करीत येईल ही कल्पनाही माझ्या मनांत आली नव्हती; पण त्या पारशी तरुणाला गाडींतून उतरतांना पाहतांच माझ्या मनांत पूर्वीं आलेल्या भीतीनें अधिकच भयंकर स्वरूप धारण केलें. माझा शत्रू—जो दृष्टीस पडतांच हाच तो शिरीनचा प्रियकर पिरोज असें मला वाटलें तो—बंदरावरून परत गेल्याला बराच वेळ झाला. यावरून एक तर तो पोलीसला आणायला गेला असावा किंवा शिरीनशी त्याचा आपल्याला वाटत होतें तशा प्रकारचा बिलकुल संबंध नाहीं असें मी समजलों व आपल्या संकटाचें स्वरूप आतां बरेंच सौम्य झालें असें मला वाटूं लागलें; पण इतक्यांत दुसरी एक गाडी येऊन आमच्याजवळ उभी राहिली ! व तिच्यांतून एक इसम खालीं उतरतांना दृष्टीस पडला. त्या इसमाच्या अंगांत खाकी रंगाचा अंगरखा असून त्याच्या पायांत त्याच प्रकारची विजार होती. त्याच्या डोकीला शिपाई थाटाचें तांबडें पागोटें होतें. त्यानें आपल्याबरोबर एक बरीच मोठी कातड्याची पेटी आणली होती. ती त्यानें शिरीनपाशीं आणून उघडली; व शिरीनजवळ हँडबॅग वगैरे असलेलें सामान त्यानें त्या पेटींत चट्कन् भरलें. शिरीनचें सामान ठेवण्यापूर्वीं त्या पेटींत काय काय होतें हें मला

चांगलेंसें दिसलें नाहीं; पण कांहीं काळ्या रंगाचे कपडे, बूट व पार्शी लोकांच्या टोपीसारखी एक टोपी होती असें पाहिल्याचें मला आठवतें ! हे कपडे कोणत्या तरी पारशी गृहस्थाचे असाव असा मीं तर्क केला; व नुकत्याच येथून गेलेल्या तरुणाचे तर हे कपडे नसतील ना ? अशी माझ्या संशयग्रस्त मनांत एकाएकी कल्पना उद्भवली ! तो तरुण पिरोजच होता असें ह्मणावें तर त्याच्या अंगात असलेले कपडे या पेटींत येण्याचें कारण काय ? बरें तसें नसलें तरी हे कपडे या शिपायानें काय म्हणून आणले असावे ? कदाचित् फेटमधून दुसरीकडे जातांना शिरीनचा बाप दुसरे कपडे घालून गेला असेल; व त्यानें काढून ठेवलेले हे कपडे त्याचा हा शिपाई परत घरीं घेऊन जात नसेल असें तरी कशावरून ? बरें तसें असतें तर शिपाई बंदरावर कां यावा ? आपण इतक्या अपरात्रीं बंदरावर हवा खात बसणार आहों असें शिरीननें याला सांगून ठेवलें होतें कीं काय ? पण फेटमधून परत येतांना मी जर बंदराकडे वळलों नसतों तर शिरीन तरी इकडे कशाला आली असती ? सारांश, माझ्या मनांत अनेक प्रकारचे कल्पनातरंग एकसारखे येऊं लागले; व सर्व गोष्टींचा विचार करीत असतां मी अगदींच बावरून गेलों. हें काय गौडबंगाल आहे तें मला कांहींच कळेना !

शिपायानें ट्रंक बंद करून गाडींत नेऊन ठेविली; व तो ल्यूसीला हलक्या आवाजानें ह्मणाला " ल्यूसी, बाबा आणि मेमसाब घरीं गेल्या असतील; आतां तुह्मीही पण चलावें. "

शिपायाचें बोलणें ऐकून मला आश्चर्य वाटलें ! हा शिरीनचा शिपाई असावा असें मी समजत होतों ! कारण ल्यूसीच्या शिपायानें पारशी गृहस्थाच्या कपड्याची पेटी आपल्या बरोबर आणण्याचें प्रयोजन नव्हतें ! ल्यूसीला तो घरीं घेऊन जाण्यासाठीं आला आहे असें कळतांच मी अधिकच घोंटाळ्यांत पडलों.

हें ऐकतांच ल्यूसी एकदम उभी राहिली व आह्मांला ह्मणाली " आतां मला घरीं गेलेंच पाहिजे. शिरीन, तुझे पिरोजशेट विलायतेला जाण्यापूर्वीं मला तूं कळविशील ना ? पिरोज शेटना पहावयाला सांपडल्यामुळें आह्मांला खरोखरीच फार आनंद होत आहे. बरें तर आतां मी

जातें. उद्यां किंवा परवां तूं मला भेटशील तर बरें होईल. पण तुला सांगितलेली गोष्ट मात्र विसरूं नको हो. ठरल्याप्रमाणें शक्य ती मदत करण्याचें माणेकनें कबूल केलें आहे. तुझ्या बाबांच्यापाशीं मीं तिच्याबद्दलची गोष्ट काढून ठेवली आहेच. ते जी काय थोडी फार रक्कम देतील ती मला उद्यां परवां तूं आणून दे म्हणजे झालं. "

माणेक मध्येंच सांगूं लागली " माझ्या बाबांनीं मिसेस द्वारकाबाईला मदत म्हणून मेमसाहेबांना देण्यासाठीं माझ्याजवळ तीनशें रुपये देऊन ठेविले होते ते मी तीन चार दिवसांपूर्वींच त्यांना नेऊन दिले. एकंदरीनें अगदींच निराश्रित झाली म्हणायची ! "

" हं " दुःखाचा सुस्कारा टाकून ल्यूसी म्हणाली " करते काय बिचारी ! पोट भरायला साधन नाहीं. कोण ही तुमच्या हिंदू लोकांची वेडी समजूत ! आपलं पोट भरण्याचा एखादा उद्योग धंदा बायकांना शिकवून ठेविला तर त्यांत त्यांचं काय गाठोडं बुडत असेल तें त्यांचं त्यांनाच माहीत ! बायका विधवा झाल्या म्हणजे त्यांनीं काय करावं ? दुसऱ्या देशांमधून पहा बायका कशा पुरुषाप्रमाणें पाहिजे तो धंदा करून आपला चरितार्थ चालवितात ! बरें तें असो. "

" अग पण ल्यूसीबाई " शिरीन् तिला म्हणाली " आम्हीही निघालोंच. आम्हाला कांहीं येथें रहायचें नाहीं आज . "

ल्यूसीला याप्रमाणें सांगून ती माझ्याकडे वळली व माझा हात धरून लडिवाळपणानें मला म्हणाली " पिरोज, आमची एक विनंती आपण मान्य कराल कां ? आपल्याला सगळ्यांना आतां आपापल्या घरोंघरीं जायचें आहे; पण जातां जातां या आमच्या माणेकला तिच्या घरीं पोंचती करून नंतर आपण आपल्या घरीं व मीही आपल्या घरीं जावें असें आमच्या मनांत आहे. "

यावेळीं शिरीनच्या मोहक चर्येवर अत्यंत रमणीय असें हास्य विलसत होतें. तिच्या अंगावर असलेले दागिने अतीशय चमकत होते. त्यांतल्या त्यांत मी तिला नुकतीच दिलेली अत्यंत मौल्यवान् अशा हिऱ्याची अंगठी तिनें आपल्या डाव्या हातांत घातली होती; व ती तिला फारच आवडत असावी असें दिसलें; कारण माझ्या त्या अंगठीकडे ती

वरचेवर सप्रेम पाहून गालांतल्या गालांत हंसत आहे असें मला वाटे! हें पाहून माझा आनंद गगनांतही मावेनासा झाला होता. तिच्या मनांतील हेतू काय होता हें कांहीं माझ्या लक्षांत आलें नाहीं. तिच्या नादांत मी आतां अगदीं गुंग होऊन गेलों होतों; व त्यांतून त्या कामीं—एखाद्या वेड्याप्रमाणें माझ्या मनाची स्थिती बनविण्याच्या कामीं—मदिरेनें मला चांगलीच मदत केली होती. आपल्याबद्दल तिला संशय येईल कीं काय; अशी माझ्या मनाचा इतका वेळ आश्रय करून राहिलेली भीती आतां हळूं हळूं नाहींशी होऊन तिची जागा भरून काढण्याचा यत्न वेड्या आशेनें चालविला होता; आणि शेवटीं शिरीनला वश करण्याच्या प्रबल विकारानें मनांत असलेले इतर सर्व विचार पार घालवून दिले! शिरीनबरोबर पाहिजे तिकडे जावयाला मी आतां अगदीं एका पायावर तयार झालों. सुंदर स्त्रियांचा— तरुणींचा— मोह मोठा कठिण आहे! या मोहाला आजपर्यंत हजारों मी मी ह्मणणारे, वैराग्याच्या यथास्थित गप्पा मारणारे कित्येक पुरुष बळी पडत आले आहेत; हल्लीं पडत आहेत; व पुढेंही पडतील. या मोहाच्या नादीं लागणारांना शेवटीं नेहमीं पश्चात्ताप करण्याचीच पाळी येत असते असें आजपर्यंतच्या जगाच्या अनुभवावरून प्रत्येक मनुष्याला कळलेलें असूनही प्रसंग पडला ह्मणजे असल्या श्रेष्ठ अनुभवाला आपल्या पाया खालीं तुडविण्याला प्रत्येक मनुष्यानें तयार व्हावें हें केवढें आश्चर्य! असो.

तिची विनंती ऐकतांच मला अतोनात आनंद झाला व मी हंसत हंसत तिला किंचित् बारीक स्वरानें ह्मणालों, " शिरीन, तुझी मर्जी असेल त्याप्रमाणें मला तूं हुकूम कर. व तो मला नेहमीं शिरसावंद्य आहे असें समज! तूं मला विनंती करावीस अशी माझी योग्यता नाहीं! यजमानीणीनें कधीं आपल्या नोकराला— आपल्या बंद्या गुलामाला— विनंती केल्याचें आजपर्यंत कोणाच्याही ऐकिवांत नाहीं! तूं मनांत आणशील, ह्मणशील, सांगशील तें बजावण्याला— मग तें कितीही कठीण, भयंकर, अशक्य असो तें लागलीच करण्याला— हा तुझ्या पायाचा दास केव्हांही मागें पुढें पहाणार नाहीं!! " असें तिला लागलीच अश्वासन देऊन मी आपली पेटी ( शिरीननें मला नुकतीच

दिलेली तिच्या दागिन्यांची पेटी ) मोठ्या प्रेमानें आपल्या बगलेंत घेतली व तिच्या बरोबर जावयाला मी तयार झालों !

हें पाहतांच शिरीननें प्रथम आलेल्या गाडीवाल्याला आमच्याजवळ गाडी आणायला ल्यूसीच्या त्या शिपायाला सांगितलें. मागून आलेल्या गाडींत ल्यूसी बसला; व तिचा तो शिपाई कोचमन शेजारीं बसला; आणि ती गाडी मोठ्या सपाट्यानें निघून गेली. आमच्या गाडींत शिरीन, माणेक, आणि मी लागलीच बसलों; व आमचीही गाडी जोरानें चालूं लागली.

अगोदरच मुंबईसारख्या अफाट शहरांत मी अगदीं नवखा, खेडवळ, त्यांतून रात्रीची वेळ ! शिवाय माझ्यावर मदिरेनें आतां आपला पूर्ण अंमल बसविलेला ! मग काय विचारावें ! गाडी कोठें जात होती हें मला नीट कळेना ! बोरीबंदरपर्यंत गाडी आल्याचें मला साधारण भान होतें; पण त्याच्यापुढें आमची गाडी किती लांब गेली, किंवा ती कोणकोणत्या रस्त्यानें वळली हें लक्षांत येण्याइतकी शुद्ध माझ्यांत राहिली नव्हती ! गाडीमध्यें एका अंगाला शिरीन व मी आणि आमच्या समोर माणेक बसली होती. शिरीन माझ्या अगदीं जवळ बसली असल्यामुळें तिच्या सान्निध्यानें मला मधून मधून अतिशय आनंद होत होता व तें मला चांगलें कळत असल्याचा भास होई ! शिरीनसारख्या सौंदर्यपूर्ण तरुणीचा आपल्याला अनायासें विलक्षण लाभ झाला असें वाटून एका विलक्षण प्रकारच्या आनंदानें मी त्यावेळीं अगदीं बेहोष होऊन गेलों होतों ! भवितव्यतेनें आपल्यासाठीं पुढें कोणती योजना केली आहे याची नुसती कल्पनाही मला त्यावेळीं आली नाहीं ! मी आपल्या बिऱ्हाडीं परत जाईपर्यंत सर्व कांहीं आनंदी आनंद होऊन गेला होता. असो !

पुढें थोड्याच वेळांत आमची गाडी एका घरापाशीं उभी राहिली. इतका वेळ आमच्या पुढें चालत असलेली एक गाडी त्याच घराजवळ नुकतीच थांबली होती; व तींतून एक पारशी तरुण, व एक युरोपियन तरुणी— अर्थात ल्यूसी खालीं उतरली. पारशी गृहस्थानें गाडींतून एक पेटी काढली व गाडीवाल्याचें भाडें देऊन टाकलें. गाडींतून उतरलेला

पारशी गृहस्थ माझ्या नुकतांच दृष्टीस पडला होता; व त्यामुळेंच माझें मन अगदीं घाबरून गेलें होतें. तोच गृहस्थ आतां आमच्या पुढच्या बाजूला उभा आहे असें दिसतांच पुन्हां त्याच्या भयानें माझें चित्त एकदम अस्वस्थ होऊन गेलें ! अरे रे, घात झाला ! असे शब्द एकाएकीं माझ्या तोंडांतून निघून गेले. ते मीं कां उच्चारले हें माझें मला कांहींच कळलें नाहीं. पण ते शब्द माझ्या तोंडांतून निघतांच " अद्याप थोडा अवकाश आहे " असें कोणी तरी मोठ्यानें ह्मणाल्याचा मला भास झाला; व तें काम पिरोजचेंच असावें असें माझ्या घाबरून गेलेल्या मनानें पक्कें ठरविलें ! आतां त्याच्या तावडींतून निसटून जाणें मला अगदींच शक्य नव्हतें ! त्याच्या शिरीनजवळ मी बसून आलों हें त्यानें चांगलें पाहिलें होतें ! त्यानें दया केल्यावांचून आपला प्राण वाचत नाहीं असें मीं ठरविलें !

# प्रसंग ४ था.

माणेक, शिरीन व मी गाडींतून उतरलों. आमच्या पुढेंच पिरोज व ल्यूसी उभी होती. ल्यूसीला पाहतांच माणेक व शिरीन तिच्याजवळ गेल्या. ज्या घरापाशीं गाड्या उभ्या राहिल्या त्याच्या जवळच एक लहान बोळ होता. त्यांतून आह्मांला जायचें होतें. तो पारशी तरुण नुकतांच बोळांत वळला होता. मी आपल्या गाडीपाशींच अजून उभा होतों, शिरीननें ' पिरोज, ' अशी हांक मारिली. ती अर्थात बोळाकडे वळलेल्या तिच्या प्रियकरालाच उद्देशून होती याबद्दल आतां मला शंका उरली नाहीं. आतां दगा होण्याची हीच वेळ आहे असें समजून मी मागच्यामागें हलकेंच पळून जाणार होतों; पण इतक्यांत शिरीन घाईघाईनें माझ्याजवळ आली व माझा हात धरून मला ह्मणाली " आतां तूं बराच दमला आहेस असें दिसतें. तेव्हां आपण आपल्या माणेकबाईच्या घरीं थोडा वेळ विश्रांती घेऊं आणि मग तुझ्याबरोबर आपला शिपाई देऊन मी तुला तुझ्या घरीं पोंचवीन. "

तिचें ह्मणणें मीं मान्य केलें ! आणि आह्मी सर्वजण त्या बोळांतून जाऊं लागलों. माझ्याजवळ असलेली दागिन्यांची पेटी मीं आपल्या खाकेंत घट्ट धरून ठेविली होती. पेटी जिवापलीकडे जपून ठेवावयाची असा माझा संकल्प होता; पण चालतांना माझे झोंक जाऊं लागल्या-मुळें ती कांहीं वेळ शिरीनजवळ दिली; व शिरीनचा हात धरूनच मी चाललों होतों. डाव्या उजव्या बाजूला वळतां वळतां कांहीं वेळानें आह्मी एका दुमजली घराच्या दाराशीं गेलों. ऑपोलो बंदरवर पाहि-लेला ल्यूसीचा शिपाई यावेळीं दरवाजापाशीं उभा होता ! त्याला ल्यूसीनें विचारलें " अरे, ती शिरीनबाईच्या पिरोज शेटजींची कपड्यांची पेटी चुकून आपल्या गाडींत आली होती ती त्यांची त्यांना दिलीस कीं नाहीं ? ती लवकर शिरीनबाईच्या स्वाधीन कर ह्मणजे ती त्या पिरोज शेटकडे पोंचवितील. "

" पण तूं घरीं नाहींच कां गेलीस अजून ? " शिरीननें तिला विचारलें.

" अग हो. " ल्यूसी ह्मणाली, पहिल्यानें मी घरीं गेले; पण पाहतें तों आई कांहीं अजून आली नव्हती. तरी तिनें मला एक चिठ्ठी लिहून ठेवली होती. ती मीं वाचून पाहिली तों तिचें कांहीं एक अतीशय मह-त्वाचें काम काल रात्रीं करायचें होतें; व ' तूं घरीं येतांच तें तूं लवकर कर; मला यायला अंमळ उशीर होईल ' असें तिनें लिहिलें होतें ह्मणून मी न थांबतां लागलीच निघालें. मला याच बाजूला जायचें होतें. तेव्हां ह्मटलें कीं, तुझ्या पिरोज शेटची कपड्यांची पेटी चुकून माझ्या गाडींत रात्रीं आली होती ती लागलीच तुझ्याकडे पोंचती करावी. तूं अजून कांहीं घरीं गेली नसशील असें समजून इकडेच आले. "

दरवाजांतून आह्मीं सर्व मंडळी आंत गेलों. आंतल्या अंगाला चांगली मोठी इमारत असेलसें मला वाटत होतें; पण पाहतों तों आंत जातांच पुन्हां एक लांबच्या लांब जागा आह्माला ओलांडून जावें लागलें. पुढें जातों तों पुन्हां एक बैठें घर दिसलें; व त्यांत आह्मीं सर्व मंडळी शिरलों. काय ? असल्या या अमंगळ जागेंत एखादा श्रीमान् गुजराथी शेटिया रहात असेल ? माणेकबाईचें हें असलें दरिद्री घर ! मदिरेच्या गुंगींत

ही मंडळी चुकून भलत्याच घरांत तर नाहींना शिरली. त्या जागेच्या विलक्षण स्थितीबद्दल नानाप्रकारचे विचार माझ्या मनांत येत होते तोंच माणेकबाई त्या शिपायाला जरा दरडावून ह्मणाली " पिराजी, अरे असल्या या भलत्याच वाटेनें मंडळींना तूं कां बरें आणलेस ? बंगल्याचा पुढला दरवाजा अजून बंदच आहे कीं काय ? अरे त्या रखवालदाराला, रामोशाला दरवाजा उघडायला सांगायचं होतंस कीं नाहीं ? आतां या बाजूनें जाऊन बंगल्याचा मागचा दरवाजा उघड जा ह्मणजे मंडळींना इकडूनच बंगल्यांत घेऊन जाऊं. "

हें ऐकतांच तो शिपाई निघून गेला; पण बराच वेळपर्यंत कांहीं परत आला नाहीं. आह्मीं आतां त्याच ठिकाणीं कांहीं वेळ बसून राहिलों. ती जागा ह्मणजे केवळ जुनी, पडकी अशा प्रकारची तीन चार खणाची एक खोली होती. दोन तीन मोठमोठे दिवे लावलेले होते त्यामुळें तेथें उजेड मात्र उत्तम प्रकारचा पडला होता. माणेकबाईनें सांगितल्याप्रमाणें बंगल्याचा दरवाजा उघडून तो शिपाई आह्माला बंगल्यांत घेऊन जाईल असें मी समजत होतों ! इतक्यांत गाडींतून पिरोज शेटजीच्या कपड्यांची ह्मणून आपल्या बरोबर ल्यूसीनें आणलेली पेटी शिरीनूनें आतां उघडली; व तींतून चार ग्लास, व्हिस्कीची, सोडावॉटरच्या वगैरे बाटल्या काढल्या; आणि पुन्हां आह्मी सर्वांनीं एकदां मद्यपान केलें ! यावेळीं माणेकबाईनें पूर्वीप्रमाणें मुळींच आढेवेढे घेतले नाहींत, व सोडावॉटर म्हणून तो मदिरेनें भरलेला ग्लास तिनें सहज झोंकला. हें पाहून मला बरेंच आश्चर्य वाटलें ! मी ज्या जागीं बसलों होतों तेथें आतांपर्यंत जिवाच्या पलीकडे जतन करून ठेवलेली शिरीनच्या दागिन्यांची पेटी कांहीं वेळ ठेविली; कारण मीं केलेलें सुरापान आपल्याला सोसत नाहीं; आतां आपल्याला खास ओकायला होणार असें मला वाटलें; व ह्मणून मी लागलीच दाराच्या बाहेर गेलों व संध्याकाळपासून पोटांत दोन तीन वेळ भरलेलें सर्व मद्य आतां ओकून पडलें.

या गोष्टीकडे सर्व मंडळींचें लक्ष होतेंच. मला ओकायला झालें असें पाहतांच माणेकबाईनें तोंड वगैरे धुण्यासाठीं ताबडतोब मला पाणी आणून दिलें. मदिरा ओकून पडल्या नंतर थोड्या वेळानें मला कांहींसें

बरें वाटूं लागलें. मी बसलों होतों तेथेंच आपल्या जवळची पेटी ठेविली होती. दारांतून पुन्हां आंत जातांना तो शिपाई पाठमोरा झालेला माझ्या दृष्टीस पडला; व त्यावेळीं त्याच्या हातांत माझ्या पेटीसारखी एक पेटी असावी असें मला वाटलें. पुन्हां मी पूर्वीप्रमाणें आपल्या जागीं जाऊन बसलों. यावेळीं माझ्या पेटीबद्दल मला थोडीशी शंका आली होती; पण माझी पेटी मी ठेविलेल्या ठिकाणींच होती. त्या पेटीचें महत्व मला अतीशय होतें; कारण शिरीननें दिलेल्या जिनसा तिजमध्यें ठेवल्या होत्या व त्यांचें रक्षण करणें हें अत्यंत जरूर होतें. तेव्हां पेटींत जिनसा आहेत कीं नाहीं, ती पूर्वीप्रमाणें जड आहे कीं नाहीं हें पाहण्यासाठीं ती मीं हातांत घेतली. पण मला कोणतीही शंका आली नाहीं म्हणून ती उघडून पाहण्याच्या भरीस त्यावेळीं मी पडलों नाहीं !

आतां मी चांगला शुद्धीवर येत चाललों होतों. तें ठिकाण, व आतांपर्यंत घडलेली सर्व हकीकत माझ्या ध्यानांत येऊन हीं कांहीं तरी दग्याची जागा असावी अशी कल्पना एकाएकीं माझ्या मनांत आली ! आह्मीं बोळांत शिरण्यापूर्वीं माझ्या दृष्टीस पडलेला पारशी गृहस्थ—शिरीनचा प्रियकर—तेथें कोठेंच दिसला नाहीं; पण तो कोण, कोठें गेला वगैरे हकीकत त्या स्त्रियांना विचारण्याचें मला धैर्य होईना.

आमचें मद्यपान वगैरे झाल्यानंतर तो शिपाई परत आला व लागलीच ती कपडे वगैरे ठेवण्याची पेटी तो घेऊन गेला. यानंतर थोड्या वेळानें तो पारशी तरुण समोरच्या दारानें येऊन आंत डोकावल्याचा मला भास झाला ! त्याला पाहतांच ल्यूसी व माणेकबाई त्याच्याकडे गेल्या. व शिरीन माझ्याजवळ येऊन बसली. त्याला पाहतांच पुन्हां माझें मन आश्चर्यानें व भयानें अस्वस्थ होऊन गेलें; व तोच विकार माझ्या चर्येवर त्यावेळीं उमटला असावा. कारण, शिरीन माझ्याजवळ येतांच मला ह्मणाली " फिरोज, या परक्या ठिकाणीं जरी मीं तुला आणलें तरी येथें भिण्यासारखें कांहीं एक नाहीं हें तूं पक्कें लक्षांत ठेव. माझ्या जिवांतजीव आहे तोंपर्यंत, जोंपर्यंत माझा तुला कंटाळा आला नाहीं तोंपर्यंत तरी निदान तूं पाहिजे त्या ठिकाणीं असलास, प्रसंगविशेषीं माझ्यासाठीं तुला पाहिजे त्याठिकाणीं यावें जावें लागलें, किंवा हवें

त्या प्रकारचें साहसही करावें लागलें तरी त्यापासून तुझ्या एका केंसा-लाही धक्का पोंचणार नाहीं हें तूं कधींही विसरूं नको ! ”

तिचें बोलणें संपतें आहे तोंच आह्मीं बसलों होतों तेथें पिराजी आला व घाबऱ्या घाबऱ्या शिरीनला ह्मणाला “ बाईसाहेब, आज आपण रस्ता चुकून भलत्याच ठिकाणीं आलों आहों. आपण समजत होतों त्याप्रमाणें माणेकबाईच्या बंगल्याची पिछाडीची ही बाजू नव्हे. कारण पलीकडच्या दारापाशीं जाऊन त्यांच्या रामोशाच्या नांवानें पुष्कळ हांका मारिल्या; पण कोणीच ओ देईना ! ह्मणून आसपासच्या लोकांना जागे करून मीं त्यांना विचारलें; पण शेजारी असणारा बंगला दुसऱ्याच गृहस्थाचा आहे. तुह्मी अपरात्रीं भलत्याच ठिकाणीं चुकून आलां आहां असें त्यांनीं मला सांगितलें. त्यापैकीं एक गृहस्थ मला दरडावून ह्मणाला, मालकाला न विचारतां तुह्मी भलत्याच्याच घरांत रात्रीचे चोराप्रमाणें शिरला तेव्हां तुह्माला पोलीसच्या स्वाधीन करायला काय हरकत आहे ? एखाद्याच्या घराचें दार रात्रीं अपरात्रीं चुकून उघडें राहिलें ह्मणजे पाहिजे त्यानें आंत शिरावें कीं काय ? ”

“ अग बाई, ” शिरीन घाबरून विचारूं लागली “ हें काय ? आज हें भलतेंच झालं ? आतां काय बाई करायचें ? ”

“ बाईसाहेब, ” पिराजी पुढें सांगूं लागला “ त्याच्या दरडावण्यानें मी तर अगदीं भिऊन गेलों. मीं त्या गृहस्थाला पुष्कळ सांगून पाहिलें कीं, महाराज, या शहरांत आह्मीं नवखे आहों. रात्रीं आह्मीं नाटकाला गेलों होतों व परत येतांना गाडीवाल्यांनीं भलत्याच ठिकाणीं आणून सोडलें व ही त्या बंगल्याची पिछाडी आहे असें आह्मांला सांगितलें. आमच्या शेटच्या बंगल्याकडे— त्याच्या मागील बाजूला, आह्मीं ज्या घरांतून इकडे आलों तशाच प्रकारचें घर आहे. बाहेरून नवख्या माणसाला तें सहज ओळखण्यासारखें नाहीं. त्यामुळें आह्मी चूकून आंत शिरलों हें ऐकतांच त्या गृहस्थानें विचारलें ‘ मग त्या बंगल्याच्या पुढच्या दरवाजाशींच तुह्मीं कां गेला नाहीं. मला वाटते यांत कांहीं तरी लबाडी आहे ! ”

यावेळीं शिरीनची चर्या भीतीनें फारच घाबरी होऊन गेली; व कांपऱ्या

आवाजानें तिनें पिराजीला विचारलें " अरे, मग तूं माणेकबाईच्या बापाचें नांव कां त्याला सांगितलें नाहींस. तिच्या बापाचें नांव या बाजूला सर्वांना माहीत आहे. "

" बाईसाहेब, तें सांगितलें म्हणून तर मला परत येतां आलें; नाहींतर त्या गृहस्थानें मला चोर समजून पोलीसच्या हवालीं केलें असतें ! पण माणेकबाईच्या बडलांच्या बंगल्यांत आम्हांला जायचें आहे. व खुद्द माणेकबाईही आम्हांबरोबर आली आहे असें मी म्हणालों. तें ऐकतांच त्याच्या शेजारीं असलेल्या एका गृहस्थानें आह्मीं चोर नाहीं अशाबद्दल त्या माणसाची खात्री केली, व तुह्मीं आतां अमक्या अमक्या रस्त्यानें जा ह्मणजे त्या बंगल्याच्या पुढल्या बाजूला जाल असें त्यानें मला सांगितलें. "

" चला तर येथून लवकर निघून गेलेलं बरं; नाहींतर भलतंच एखादं संकट यायचं. अरे, पण त्या दोघी कुठें गेल्या ? "

" बाईसाहेब, " पिराजी शिरीनला धीर देऊन म्हणाला, " आपण अगदीं भिऊं नका. त्या दोघींनां आतां मी हांका मारून आणतों. "

असें सांगून तो पुन्हां पलीकडच्या दारांतून बाहेर गेला. इतक्यांत कोणी तरी मोठमोठ्यानें ' चोर चोर ' असें ओरडतांना मीं ऐकलें !

मी व शिरीन घाबरून इकडे तिकडे पाहूं लागलों तोंच " अरे, हरामखोरांनो, चार पांच हजारांची नथ विकत घेतों असं मला खोटंच सांगून कालपासून मला येथें कोंडून ठेवलत; आणखी आतां मी एकटा आहे असं पाहून माझ्या जवळच्या जिनसा हिरावून घेतल्यात, आणखी मलाच मारतां काय ? ओय् ओय् ओय् ! अरे नाहीं; तुमचें हें ठिकाण मी कोणालाही सांगणार नाहीं; पण मेहेरबानी करून आतां मला जीवदान द्या " असें आमच्या आसपास कोणी तरी मोठमोठ्यानें सांगत असून मधून रडत असल्याचें माझ्या कानीं आलें. इतक्यांत माणेकबाई घाबऱ्या घाबऱ्या आमच्याकडे धांवत आली; व रडत रडत सांगूं लागली "धांवा हो धांवा ! माझ्या ल्यूसीला कोणी चोरांनीं गांठलं आहे ! आणखी पिराजीला धरून ते एकसारखा मारताहेत ! पिरोजशेट, चला हो तुह्मी तरी आमच्या मदतीला ? " असें ह्मणत ती सैरावैरा धावूं लागली ! तिला

पाहून शिरीन अतोनात घाबरून गेली. तिची ती रमणीय चर्या आतां एका-एकीं विलक्षण निस्तेज दिसूं लागली. हा एकंदर घडून आलेला आकस्मिक प्रकार पाहून भीतीनें माझ्या उरांत धडकी बसल्यासारखें होऊन हातपाय थरथर कांपूं लागले. कोण हें भयंकर संकट ! आपली प्रिय शिरीन व आपण आपल्या बरोबर असलेल्या मौल्यवान् जिनसांसुद्धां निभावतों कसे ? आपल्या मदतीला जरी कदाचित् आसपासचे लोक आले तरी आपण शिरीनला फसवून बंदरावर नेल्यामुळेंच हें संकट ओढवलें असें त्यांच्या उघडकीला येऊन आपली छी थू होणार ! नुकत्याच दृष्टीस पडलेल्या शिरीनच्या प्रियकर पिरोजला—तो जवळच कोठें असला तर—ही बातमी समजल्यावांचून राहणार नाहीं. आणि असें झालें ह्मणजे तो इकडे शिरीनचें रक्षण करण्यासाठीं एकदम धांवून आला तर आपण काय करावें ? कारण येथें पुन्हां त्यानें मला शिरीनजवळ पाहिलें म्हणजे मात्र तो आपल्यावर दया करणार नाहीं ! बरें आपली पेटी घेऊन आपण येथून पळ काढला तर ? छे, हे भानगडीचे रस्ते ! या बाजूला नेहमीं येणारीजाणारी मंडळी सुद्धां आज अगदीं चुकून गेली; मग आपल्यासारख्या नवख्या माणसाला रस्ता कशाचा सांपडतो. बरें इतकेंही करून धैर्यानें तसेंच येथून जावें तर ही असली अपरात्रीची वेळ. वाटेनें जिकडे तिकडे शुकशुकाट झालेला ! वाट विचारायला सुद्धां कोणी माणूस भेटणार नाहीं. शिवाय चोर आपला पाठलाग करीत आले तर ? आपल्याजवळ असलेली शिरीनची दागिन्यांची पेटी जाऊनच्या जाऊन फुकट मार मात्र खावा लागणार ! बरें इतकेंही जरी पत्करलें तरी पण इकडे प्रिय शिरीनची काय बाट होणार ! अशा भीतिप्रद अनेक कल्पना एकाएकीं माझ्या मनांत येऊन एकदम सर्वांगाला दरदरून घाम फुटला; व डोळ्यापुढें अंधेरी आली ! अशा स्थितींत मी धाडकन् जमिनीवर पडून बेशुद्ध झालों असतों; पण शिरीननें माझ्या गळ्याला मिठी मारली; व तिच्या संरक्षणासाठीं माझ्या मदतीची अत्यंत अपेक्षा आहे असें मला तिनें भासविलें; कारण त्यावेळीं तिचा प्रिय पिरोज तेथें नव्हता. पिरोजी चोरांच्या तावडींत सांपडलेला होता. ल्यूसीलाही त्यांनीं धरून ठेवलें होतें, व माणेक तर संरक्षणासाठीं गयावया करीत वेड्या-

सारखी इकडून तिकडे रडत ओरडत सुटली होती. त्यावेळीं स्वसंरक्षणाचा भार आपल्या प्रियकरावर टाकण्यासाठीं शिरीन कांहीं वेळ इकडे तिकडे पहात होती; पण पिरोज कोठेंच दिसत नाहीं असें लक्षांत येतांच तिनें आपल्यापेक्षां किती तरी पटीनें अधिक भ्याड बनून गेलेल्या अशा एका माणसाचा-- अर्थात् माझा— आश्रय केला !

असा प्रसंग माझ्यावर पूर्वीं कधींही आला नव्हता. त्यामुळें भीतीनें माझे हात पाय लट्लट् कांपत होते. तरी काय होईल तें होवो पण निदान अशा आणिबाणीच्या प्रसंगीं भलतेंच कांहीं घडलें तर सर्वांचें प्रत्यक्ष प्राणही जायचे अशा या घोर प्रसंगीं आपण भितरे आहों असें तिला कळूं द्यायचें नाहीं असा मनाचा पक्का निर्धार करून मी मोठ्या धैर्यानें शिरीनला आपल्या एका हातानें घट्ट धरून ठेविली; व धीर देऊन तिला ह्मणालों " शिरीन, तुझें रक्षण करण्याच्या कामीं मी आपला प्राणही देण्याला तयार असतांना तुला इतकें घाबरण्याचें मुळींच कारण नाहीं. येथें तुला एकटीला सोडून जाण्याचें माझ्या अगदीं जिवावर आलें आहे. तसें नसतें तर चोरांची काय बिशाद आहे; मी एकटा जाऊन त्यांचा समाचार घेईन; व तुझ्या प्रिय ल्यूसीला आणि पिरोजीला केव्हांच सोडवून आणीन ! पण काय करूं ! अशा या भयंकर स्थितींत काय करावें हें मला सुचत नाहीं ! यावेळीं तुझी माणेकबाई जरी क्षणभर तुझ्याजवळ येऊन उभी राहिली तरी सुद्धां चोरांची खोड मोडण्यासाठीं तिकडे जायला मला थोडेंसें अवसान येईल ! "

असें बोलत असतांना माझा आवाज बराच कांपत होता. कारण निर्भयपणाचें त्यावेळीं मीं केवढें जरी सोंग आणलें असलें, चोरांचा समाचार घेण्याचें आपल्यामध्यें पाहिजे तेवढें अवसान आहे असें पाहिजे तितक्या युक्तिप्रयुक्तीनें तिला भासविलें असलें तरी माझ्या अंतःकरणाला थरथर कांपवून सोडणारी भीती कांहीं अद्याप माझ्यामधून नाहींशी झाली नव्हती. वास्तविक पाहिलें तर मला स्वतःला चोरांची भीती वाटण्याचें कांहीं कारण नव्हतें. मीं आपली अत्यंत मौल्यवान् अंगठी शिरीनला केव्हांच देऊन टाकली होती; व माझ्याजवळ स्वतःचें असें त्यावेळीं कांहींच राहिलें नव्हतें; आणि खरें पाहिलें तर चोर माझ्यासारख्या

कफल्लकाच्या वाटेलाही गेले नसते. पण सर्व त्रैलोक्यांतील सौंदर्य एकवटून आपल्या कौशल्याच्या परमावधीनें बनविलेल्या त्या लावण्य-पूर्ण शिरीनच्या प्रेमामुळेंच मला चोरांची भीती वाटत होती; व त्याहीपेक्षां अधिक असें पिरोजचें जें मला भय वाटत होतें त्याचें तरी कारण काय? तिनें दिलेल्या त्या दागिन्यांच्या पेटीवर तरी तिच्या प्रेमामुळेंच ममत्व उत्पन्न झालें होतें! तिच्या प्रेमाच्या अभावीं मी त्या पेटींतील दागिन्या-वर कधींही भाळलों नसतों! पण तें तिचें प्रेम! तिला फसवून वश कर-ण्याची व तिनें प्रथम पसंत केलेल्या त्या पिरोजला सोडून देणें भाग आहे असें ती आपल्या पूर्णपणें हातांत आल्यावर तिच्या निदर्शनाला आणून देण्याची माझ्या मनांत उत्पन्न झालेली दुष्ट वासना जर मी पहि-ल्यानेंच जागच्याजागीं दाबून टाकली असती तर मला कशाचें भय होतें? पण तसें कोठून होणार!

---

# प्रसंग ५ वा.

शिरीनची भीती आतां बरीच नाहींशी झाली असें तिच्या चर्येवरून मला वाटूं लागलें. ती आतां माझ्याकडे एकप्रकारच्या वेगळ्या नजरेनें पहात होती; व त्यावरून माझ्या भितरेपणाबद्दल तिला माझा तिरस्कार वाटत असावा असें दिसलें; पण माझें सर्वांग भयानें लटलट कांपत होतें. तरी ही कल्पना तिनें शब्दांनीं मला व्यक्त मात्र करून दाखविली नाहीं. मी तिच्याकडे पहात आहे असें तिच्या लक्षांत येतांच तिची चर्या बदलली. माझ्या स्थितीबद्दल तिला आश्चर्य वाटत आहे असें भासविण्याच्या हेतूनें ती ह्मणाली " पिरोज, अजून देखील तुझी थंडी कशी जात नाहीं याचा मला चमत्कार वाटतो. थंडीनें तुझें शरीर अजून कांपत आहे. "

यावेळीं तिनें आपल्या कोमल हातानें माझा उजवा हात धरिला. माझे हातपाय अद्यापही कांपतच होते; व त्यांतल्या त्यांत पलीकडच्या बाजूला चोरांच्या छळण्यानें व मारानें ल्यूसी व पिराजी विव्हळ होऊन गेले होते,

व माणक रडत ओरडत इकडून तिकडे धांवत होती. त्यांच्या सर्वांच्या भयंकर किंकाळ्या मधून मधून कानावर पडत असल्यामुळें माझी तर अगदीं त्रेधा उडून गेली होती! आतां भयभीत झालेल्या माझ्या भित्र्या मनाला धीर देणें आणि लटलट कांपणाऱ्या व घामानें भिजून गेलेल्या माझ्या शरीरामध्यें अवसान आणणें अगदींच अशक्य झालें होतें; तरी आपण भ्यालों नाहीं असें शिरीनला भासविण्याचा यत्न करणें मला फार अवश्य वाटत होतें! आपण भित्रे आहों; चोरांच्या भयानें यावेळीं आपण अगदीं गर्भगळीत होऊन गेलों आहों असें शिरीनला कळणें ह्मणजे आपला आपण होऊन आपमान करून घेणें होय. तेव्हां पाहिजे तें झालें तरी तिला ही गोष्ट कळूं द्यायची नाहीं; व आपल्याला थंडीनें अतीशय हुडहुडी भरली असल्यामुळेंच आपली अशी स्थिती झाली असें जें तिला वाटत आहे हें एकाअर्थीं बरेंच आहे. या तिच्या अज्ञानाचा उपयोग करून आपण यावेळीं आपली बाजू संभाळली पाहिजे. असा विचार करून मी ह्मणालों 'खरेंच शिरीन, बंदरावरून आपण इकडे यायला निघालों तेव्हांपासून मला अशी कांहीं विलक्षण थंडी वाजत आहे; आणखी त्यामुळेंच माझे हातपाय कांपत आहेत!'

'हें माझ्या लक्षांत आलें ह्मणून तर बंदरावर आपण येतांच मी तुला पुन्हां शराब दिली.' इतकें बोलून शिरीन माझ्याकडे पाहूं लागली. भयानें मी कसा गांगरून गेलों आहे हें तिच्या लक्षांत आलें असावें; पण ही गोष्ट बोलून दाखवावी कीं नाहीं असा तिच्या मनांत विचार चालला होता; याबद्दल मला शंका उरली नाहीं. कारण यावेळीं तिच्या चंचलनेत्रांत एकप्रकारची चमत्कारिक चमक मारीत होती व त्यावरून तिच्या मनांतील हेतू ती लबाडीनें मला कळूं देत नाहीं असा मला संशय आला.

यावेळीं माणेक आमच्याजवळ येऊन उभी राहिली; व तीही बरीच निर्भय झाली असावीसें दिसत होतें. पलीकडच्या जागेंतून इतकावेळ ऐकूं येत असलेल्या किंकाळ्याही आतां बंद पडल्या होत्या; व त्यावरून चोर पळाले असावे, किंवा सर्वांच्या संरक्षणासाठीं कोणी माणसें आलीं असावीं असें मला वाटलें. पण इतकें झालें तरी माझी भीती कांहीं गेली नाहीं. कारण चोर पळून गेले असले तरी पिरोजबद्दलची

मला वाटत असलेली भीती मुळींच कमी झाली नव्हती. पिरोज हाच त्यावेळीं माझा खरा शत्रू होता; व त्याच्या प्रिय शिरीनला फसवून वश करण्याच्या माझ्या अपराधाबद्दल तो चारचौघांत माझी छीथू करील, व मला हवा तितका मार देईल, नव्हें; कदाचित् मला ठार मारायलाही कमी करणार नाहीं. येवढीच वास्तविक मला कायती भीती वाटत होती. इतक्यांत "पिरोज, तुझी वेळेवर आला नसता तर चोरांनीं आह्मां सर्वांना आज मारूनही टाकलें असतें" असे शब्द एकाएकीं कानीं पडल्याचा मला भास झाला! मग काय विचारावें! माझ्या भीतिचा तर आतां कडेलोट होऊन गेला. चोरांचे संकट, त्यांचा मारही मी खुषीनें पत्करला असता; पण इतका वेळ नाहींसा झालेला पिरोजरूपी कृतांत मध्येंच आला आहे असें समजतांच माझ्या डोळयापढें एकदम अंधेरी आली; व मी बेशुद्ध होऊन जमीनीवर पडणार होतों; पण शिरीननें लागलींच मला सांवरलें.

ही सर्व स्थिती माझ्या लक्षांत आली. ज्या कोमलांगीला वश करण्याच्या नादीं लागून मी त्यावेळीं घेतलेल्या सोंगाची बतावणी करीत असतांना आपल्या अंगीं मोठें धैर्य व धाडस आहे असें भासवीत होतों. तिला आपण नामर्द, भ्याड आहों असें समजलें ही गोष्ट माझ्या ध्यानांत येतांच माझ्या आशेचे शतशः तुकडे होऊन गेले. भीतीनें आणि निराशेनें आपला पूर्ण अंमल माझ्यावर बसाविला. माझ्या सर्वांगाला पुन्हां दरदरून घाम फुटला; व माझी चर्या अगदींच निस्तेज दिसूं लागली; कारण शिरीन लागलीच आश्चर्ययुक्त मुद्रेनें माझ्याकडे पहात ह्मणाली "अगबाई! पिरोज, तुला ही इतकी भीती कसली वाटते आहे! आणखी तुझा चेहेरा असा एकदम पांढरा फटफटीत कां बरं दिसूं लागला? पिरोज, हें एकाएकीं असें कशानें झालें मला सांगशील कां?"

तिला पूर्णपणें कळून चुकलेली गोष्ट नाकबूल करणें आतां अगदीं अशक्य होऊन गेलें; तरी आपण चोरांना मुळींच भ्यालों नाहीं; आणि आपल्यामध्यें पाहिजे तितकें अवसान आहे असें भासविण्याच्या उद्देशानें मीं उत्तर दिलें "होय, शिरीन, मला फार भीति वाटते आहे. भीतीनें मी अगदीं गांगरून गेलों आहे. माझ्या अंगाला हा जो घाम फुटला आहे तो

तरी भीतीमुळेंच; पण ती भीती चोरांची मात्र नव्हे. चोरांच्या भीतीनें भेदरून जाणारा मी नव्हें. माझ्या अंगांत पाहिजे तेवढी शक्ती आहे. आणखी दोनचारच काय पण दहा पांच चोरांनीं जरी माझ्यावर एकदम हल्ला केला तरी त्या सर्वांचा मी खरपूस समाचार घेईन. शिरीन, इतकें सगळें जरी खरें आहे तरी पण एका गोष्टीची मात्र मला अतीशय भीती वाटत आहे. शिरीन, तुझें प्रेम माझ्याठिकाणीं नेहमीं टिकेल कीं नाहीं या एका कल्पनेच्या अनिश्चितपणापुढें माझी सर्व शक्ती, माझें धैर्य, अवसान गळून गेल्यासारखें झालें आहे. कोणत्याही कारणामुळें तूं जर कदाचित् पुढें मागें माझा आव्हेर केलास तर मात्र मला मरणप्राय दुःख होईल; आणि या काल्पनिक दुःखाच्या भीतीनें यावेळीं मीं अगदीं गांगरून गेलों आहे. "

" पिरोज, " पुन्हां लडिवाळपणानें मला मिठी मारून माझें अंतःकरण विव्हल करणाऱ्या त्या तिच्या प्रेमदृष्टीनें माझ्याकडे पहात पहात आपलें सुकुमार मुख माझ्या कानाजवळ करून अगदीं हलक्या आवाजानें शिरीन ह्मणाली " पिरोज, माझ्या प्रेमाबद्दल आतां तुला मुळींच भीति वाटायला नको; पण आईबापांच्या रागावण्यानें किंवा आणखी एखाद्या कारणानें आजउद्यां जर माझ्यावर एखादं संकट आलं तर तूं मला विसरणार नाहींस असें तुझ्याकडून मला एकदां वचन मिळालें ह्मणजे तुझ्यासाठीं मी पाहिजे तें साहस करीन. असें झालें ह्मणजे मग पिरोज, माझ्या प्रेमाबद्दलची तुला कोणत्याही प्रकारची शंका, भीती, मनांत आणण्याचें कारणच उरणार नाहीं. पिरोज, मी एखाद्या वेळीं अशा प्रसंगात सांपडले, आणखी तूं जर मला सोडलेंस, मला सहाय्य केलं नाहींस, तर जें कांहीं होणार असेल तें निमूटपणानें मला सहन नाहींकां करावं लागणार ? तुझा आधार असल्यावर मग मला कोणाचीच पर्वा नाहीं ह्मणा ! तूं गरीब आहेस या कारणामुळें तुझा व माझा प्रेमसंबंध घडूं नये असं वाटून माझ्या आईबापांनीं कितीही हरकती घेतल्या, माझ्या वाटेंत कितीह अडचणी उत्पन्न केल्या तरी—इतकंच काय पण त्यांनीं मला जरी घरांतून हांकून दिलं तरी—मला त्याबद्दल मुळींच दुःख वाटणार नाहीं. पण एनप्रसंगीं तूंच जर कां मला फसविलेंस तर मात्र माझा नाइ-

लाज होऊन आईबापांचें ह्मणणें मला कबूल करावें लागेल. आणखी तुझ्या ठिकाणीं जडलेल्या माझ्या प्रेमाबद्दल निराश होऊन आईबाप ठरवितील त्या श्रीमंताच्या मुलाशीं मला लग्न करणें भाग पडेल. ह्मणून ह्मणतें कीं, असं वचन द्यावंसं जर तुला वाटत असेल आणखी तें पाहिजे त्यावेळीं—कारण पडलं तर उद्यां देखील—खरं करून दाखविण्याचं सामर्थ्य आपल्यामध्यें आहे असं तुला वाटत असेल तर त्याप्रमाणं मला आतांच काय तें सांग. पिरोज, माझ्या प्रेमाची अजून तुला खरी कल्पना आली नाहीं. ”

हें तिचें आशाजनक भाषण ऐकतांच माझ्या मनाला कांहीं विलक्षण उत्साह वाटूं लागला; व लागलीच तिच्या हातावर मी आपला हात मारून तिला ह्मणालों ‘ अं: इतकंच ना ! तर मग हें घे माझं वचन ! त्यांत गं काय आहे ! प्यारी शिरीन, तुझ्यासाठीं मी पाहिजे तेव्हां आपला प्राण देखील देईन; यापेक्षां आणखी काय सांगूं ? ’

याप्रमाणें आमच्या दोघांच्या हितगुजाच्या गोष्टी सुरूं होण्यापूर्वी आमच्याजवळ येऊन उभी राहिलेली माणेक मध्येंच पिराजी व ल्यूसी ज्या बाजूला होतीं त्या बाजूला गेली; व शिरीनशी हव्या त्या रीतीनें बोलण्याला मला कोणाचीच आडकाठीच नव्हती; ह्मणून तिच्याशीं मी अगदीं मोकळ्या मनानें बोलत होतों; आणि तिच्या ह्मणण्याप्रमाणें वागण्याचें मी तिला वचनही दिलें. आतां चोरांची भीती नाहींशी झाली होती; व कांहीं वेळापूर्वी ल्यूसी व पिराजी पिरोजशी बोलत असल्याचा मला भास होत होता; पण त्यानंतर ल्यूसी आणि पिराजी या दोघांमध्यें चाललेल्या बोलण्यावरून पिरोज तेथून गेला असावा असें मला वाटल्यामुळें आणि शिरीननें आपलें प्रेम मला अर्पण केल्याचें तिच्या तोंडून ऐकल्यामुळं आतां माझा आनंद गगनांत मावेनासा झाला !

आतां तेथें राहणें चांगलें नाहीं असें वाटून मी शिरीनला ह्मणालों शिरीन, आतां आपण लवकर अपापल्या घरीं जावें हें चांगलें. ”

“ हो, मी तरी तेंच ह्मणतें. ” याप्रमाणें माझ्या सूचनेला अनुमोदन देऊन शिरीननें पिराजीला हांक मारिली. पण “ पिराजी गाड्या आणायला गेला आहे ” असें ल्यूसीनें पलीकडच्या खोलींतून उत्तर दिलें आणि

काय चमत्कार असेल तो असो; पण लागलीच त्या खोलींतून एक पारशी तरुण–अर्थात पिरोज व ल्यूसी बाहेर येत आहेत असें माझ्या दृष्टीस पडलें ! माणेक व तो पारशी तरुण आम्हीं दोघें उभें होतों तिकडे येत होते; पण पिरोज माझ्याजवळ न येतां लंगडत लंगडत डाव्या अंगाला येऊन माझ्यापासून सरासरीं पांच सहा हाताच्या अंतरावर उभा राहिला. ल्यूसी मात्र आमच्या अगदीं जवळ आली; व तिनें पिरोजला कांहीं तरी खूण केली. ती पाहतांच तो चट्कन् दाराबाहेर निघून गेला. पिरोज माझ्याकडे येत आहे असें पाहतांच मी खालीं पाहूं लागलों. माझ्या मनांत उत्पन्न झालेला आनंद आतां जागच्याजागीं जिरून गेला; व पुन्हां भीतीनें माझें शरीर कांपूं लागलें. हें पाहून त्या दोघीं स्त्रिया हसूं लागल्या; आणि मला या गोष्टीची इतकी शरम वाटली कीं, कांहीं सांगतां येत नाहीं; पण पिरोज तेथें उभा होता तोंपर्यंत तोंडांतून एक ब्र देखील काढण्याचें मला धैर्य होईना. मार खाण्याची, विडंबना करून घेण्याची, फार तर काय जीव जाण्याची आतांच वेळ आली आहे हें मला तेव्हांच कळून चुकलें व आपल्या शत्रूच्या अंगावर आपणच तुटून पडावें असा विचार करून पिरोज दाराबाहेर जात होता त्याच्या मागोमाग जाऊन जोरानें त्याच्यावर हल्ला करण्यासाठीं मी निघणार तोंच शिरीननें मला घट्ट धरून ठेविलें आणि त्या दोघीं पुन्हां मोठमोठ्यानें हसूं लागल्या ! हें पाहून मला त्यांचें फार आश्चर्य वाटलें. कारण, ल्यूसीला नुकतेंच चोरांनीं गांठून त्रास दिला होता. तरी त्याबद्दल एक चकार शब्दही न काढतां ती आपली माझ्याकडे पाहून एकसारखी हंसत आहे हा केवढा चमत्कार ! असें मला वाटलें. थोड्या वेळापूर्वी त्या दोघींनाही वाटत असलेली चोरांची येवढी भीती येवढ्यांत कशी नाहींशी झाली हें मला समजेना ! माझ्याकडे पाहून हंसण्याचा तर त्यांनीं एकसारखा सपाटाच लाविला होता ! मला कांहीं वेळ त्यांच्या या विलक्षण कृतीचें आश्चर्य वाटलें खरें; पण आपणच त्यांच्या हास्याचा विषय आहों असें ध्यानांत येतांच मला त्यांचा राग आला.

त्यांच्या दोघींच्या त्या विलक्षण हंसण्याबद्दल मी त्यांना कांहीं बोलणार तोंच माणेकजी हंसतच पलीकडच्या खोलींतून बाहेर आली. यावेळीं

तिच्या हातांत कांहींतरी चकचकत होतें असें मला दिसलें. ती आमच्या-जवळ येऊन आश्चर्ययुक्त मुद्रेनं म्हणाली ' हा कोण तरी बाई चमत्कार! पिरोज आपल्याला चोरांच्या तावडींतून सोडवायला आला; पण चोरांनीं पळून जातां जातां पिरोजला बरेंच मारलें; आणखी तो तिथेंच विवळत पडला होता. त्याच्या एका पायाला बरीच दुखापत झाली; आणि त्याला जागेवरून उठायला देखील येत नव्हतें; पण इकडे पाहवं तो पिरोज आपल्या प्यारीच्याजवळ उभा! पाहिलंसका ल्यूसी, शिरीनवर पिरोजचें कसें प्रेम आहे तें!"

" अग बाई पण तें काय आहे तुझ्या हातांत ?" शिरीननें तिला विचारलें.

" अग हीं तुझीं हिऱ्यांचीं कंकणें " माणेकनें उत्तर दिलें. " अग चोर हीं कंकणें घेऊन पळून जात होते; पण इतक्यांत पिरोजनें त्यांच्याशीं झटापट करून तीं हिसकावून घेतलीं; पण त्याला चोरांनीं मारलें तेव्हां त्याच्या हातांतून तीं पडलीं असावीं. मी मघाशीं तिकडे गेले तेव्हां तीं कोंपऱ्यांत पडलेलीं मला दिसलीं."

"पिराजीला देखील मेल्यांनीं फार मारलें हो!" ल्यूसी मध्येंच म्हणाली. " त्याला बिचाऱ्याला बांधलें होतें; म्हणून त्याचा कांहीं उपाय चालेना. पण शेवटीं पिरोज शेटनीं त्याला सोडविलं म्हणून बरं झालं. खरोखर पिरोजशेट," ल्यूसी माझ्याकडे पाहून म्हणाली, " तुमचे आम्हां सर्वांवर फार उपकार झाले आहेत."

आपण पिरोज आहों असेंच या तिघींना अजून वाटत आहे ही गोष्ट तर आपल्या पथ्यावरच पडली असून, खऱ्या पिरोजला चोरांनीं बेदम मारिलें, त्याचा एक पाय लंगडा झाला हें तर आपण मघाशींच पाहिलें. आतां तो येथून जो पळून गेला तो कांहीं बरा झाल्यावांचून शिरीनकडे खास येत नाहीं असें मी समजलों; व या गोष्टीचें मला मोठें समाधान वाटलें आणि त्या तिघींची समजूत तशीच कायम ठेवण्याचा आपण यत्न केला म्हणजे आपला कार्यभाग झाला असें माझ्या मूर्ख मनानें ठरवून मी त्या तिघींना उद्देशून म्हणालों " तुम्हाला चोरांच्या हातून सोडविल्या

हें ह्मणजे मी कांहीं मोठेंसें काम केलें असें नाहीं. तरी पण आतां येथें थांबणें चांगलें नाहीं. ”

ल्यूसी माझ्याकड पहात पहात हंसून ह्मणाली ‘ गाड्या आणायला पिराजी गेला आहे; तो आतां इतक्यांत येईल. पण शिरीनबाई मी आतां घरीं एकटी कांहीं जायची नाहीं. ’

‘ हें पहा, ’ शिरीन तिला सांगूं लागली, ‘ आपण तिघी एका गाडींत बसूं. वाटेनें माणेकला पोंचती करूं. आतां रात्र कांहीं फारशी उरली नाहीं. आणखी मग माझ्या घरापर्यंत तूं मला पोंचीव, अन् मग तूं आपल्या घरीं जा. आतां तुझी आई कांहीं तुला रागं भरणार नाहीं. पिरोज व पिराजी एका गाडींत बसतील; आणखी दोन्हीं गाड्या वेगळे रस्ते फुटेपर्यंत बरोबरच जातील ह्मणजे झालं. पिरोजचें घर वाटेवर असलें तर आपण त्यांना पोचवूं, आणखी पिराजीला घेऊन पुढें जाऊं. ’

“ हो गडे, मी तसंच ह्मणणार होतें. ” “ माणेक ह्मणाली ” पण पहिल्यानें मला आपल्या घरीं पोंचती करा, ”

याप्रमाणें सांगून माणेक दाराशीं गेली व लागलीच परत येऊन ह्मणाली “ह्या पहा पिराजीनें गाड्या आणल्या आहेत. चला तर आतां लवकर. ”

“ हो पण, ” शिरीन ह्मणाली “ निघण्याच्यापूर्वीं एकदां सर्वांनीं शराब घेतलीच पाहिजे. ह्मणजे आज झालेला सर्व त्रास नाहींसा होईल. ”

इतकें सांगून तिनें पेटींतून मदिरेची बाटली, ग्लास वगैरे सामान काढलं; आणि आह्मीं सर्वांनीं यथास्थितपणें मद्य प्राशन केलें. आह्मीं आतां गाडींत बसण्यासाठीं घराबाहेर पडणार तोंच समोरच्या खोलींतून पिरोज डोकावत आहे असें माझ्या दृष्टीस पडलें ! पण थोडक्यांतच तो दिसेनासा झाला. तरी मी आपली नजर त्या खोलीच्या दाराकडे लाविली होती; व आतां पिरोज बाहेर आला कीं, त्याच्यावर हल्ला केल्याशिवाय सोडायचें नाहीं असा निश्चय करून त्या तरुणीकडे लक्ष न देतां मी मोठ्या तयारीनें उभा राहिलों. हें पाहून त्या तिघी स्त्रिया पुन्हां एकसारख्या हंसूं लागल्या. पण इतक्यांत शिरीनची पेटी हातांत घेऊन खोलीच्या दारांतून पिराजी आमच्याकडे धांवत आला, न घाबऱ्या घाबऱ्या

म्हणाला " चोर पुन्हां मागच्या बाजूनें येत आहेत. आतां येथें बसणें शहाणपणाचें नाहीं. "

हें ऐकतांच आह्मी सर्वजण त्या घरांतून निघून गाड्यांत जाऊन बसलों. एका गाडींत शिरीन, ल्यूसी व माणक बसल्या आणि दुसरींत मी एकटाच बसलों. पण पिराजीच्या हातांत असलेली कातड्याची मोठी पेटी त्यानें माझ्या गाडीच्या पुढल्या बाजूला ठेवली व पिराजी तेथेंच कोचमनाजवळ बसला. दोन्ही गाड्या वेगानें चालू लागल्या. इतक्यांत ' अरे चोर, चोर, चोर, ' असें मोठ्यानें ओरडत आमच्या गाड्या-मागून कोणी तरी धांवत येत आहे असा मला भास झाला !

---

# प्रसंग ६ वा.

शिरीननें दिलेली दागिन्यांची पेटी मी इतका वेळ आपल्या बगलेंत जपून ठेविली होती. ती गाडींत बसल्यावर मी आपल्या शेजारीं ठेविली. पेटी बगलेंतून हातांत घेतल्याबरोबर मला एकदम कांहीं एका गोष्टीची आठवण झाली. माणेकनें नुकतीच शिरीनला दाखविलेलीं शिरीनची कंकणें चोरांच्या हातीं कशीं लागलीं या गोष्टीचा मी आपल्याशींच विचार करीत होतों; व शिरीननें आपल्याला दिलेलीं कंकणें पेटींत आहेत कीं नाहींत हें एकदां पहावें असें माझ्या मनांत आलें; पण बंदरावरून निघाल्यापासून ही पेटी आपण कोणाच्याही हातीं दिलेली नव्हती. आप-ल्याला ओकायला झालें त्यावेळीं जराशी ती शिरीनजवळच ठेविली होती. तेव्हां अर्थात् त्यांतील कंकणें चोरांच्या हातीं लागण्याचा मुळींच संभव नव्हता. कारण शिरीननें ती पेटी लागलीच आपल्याला परत दिली. शिरीन उभी होती तेथें कांहीं चोर आले नव्हते. किंवा शिरीनची पलीक-डच्या खोलींत जेथें चोरांनीं ल्यूसीला, पिराजीला व फिरोजला गांठलें त्या ठिकाणीं गेली नव्हती. तेव्हा आपल्याला शिरीननें दिलेलीं कंकणें चोरांच्या हातीं खास लागलीं नव्हतीं. हीं कंकणें दुसरींच काढलीं तरी असलीं पाहि-जेत असें मीं ठरविलें; व पेटी उघडून पाहण्याच्या भानगडीला मी लागलों

नाहीं. तरी पण माझें मन अजून देखील स्वस्थ झालें नव्हतें. यद्यकदाचित् कंकणें जरी चोरांच्या हातीं लागलीं असलीं तरी तीं आतां पुन्हां शिरीनलाच मिळालेलीं आहेत; तेव्हां त्या बाबतींत मला काळजी वाटण्याचें कारण नव्हतें. पण त्या पारशी तरुणाबद्दलची भीती, व बंद्रावरून निघून पुन्हां गाडींत बसेपर्यंत दृष्टीस पडलेले विचित्र प्रसंग, त्या दोघीं स्त्रियांचा व पिराजीचा चोरांनीं केलेला छळ, व विशेषें करून पिरोजचें वरचेवर भीतिप्रद होणारें असें आगमन, त्या तरुणींचें हंसणें, व माझी त्यांच्या समक्ष एकदां दोनदां झालेली फजीती—माझी फजीती झाली, पिरोजला पाहून मी अगदीं घाबरून गेलों होतों असें त्यांच्या निदर्शनाला आल्यावरूनच त्या तिघीं स्त्रिया वरचेवर हंसत होत्या असें मला वाटत होतें—वगैरे गोष्टींचा माझ्या मनावर कांहींसा परिणाम झाला होता; व त्यांतल्यात्यांत पिरोजच्या शिरीनचा आपण अभिलाष धरून हें कर्म करीत आहों हें चांगलें नव्हें असें मला मधून वाटे; पण शिरीनच्या प्रेमानें वेडावून गेलेलें माझें मन या कामीं पाहिजे तो त्रास सोसण्याला तयार झालेलें होतें. त्यामुळें तें बिलकुल माघार घेईना; असो.

असे विचार माझ्या मनांत चालले असतांना पुन्हां पहिल्याप्रमाणें "चोर चोर" अशी आरोळी ऐकूं आली; म्हणून आपली गाडी जरा थांबविण्याला मी गाडीवाल्याला सांगितलें; कारण माझ्या प्रिय शिरीनची गाडी मागून येत होती; व त्या तिन्हीं तरुणींच्या सुरक्षितपणाची जबाबदारी, निदान शिरीनपुरती तरी मी आपल्यावर घेतली होती. तेव्हां हा काय घोटाळा झाला आहे हें पाहणें माझें काम होतें; आणि आह्मीं गाड्यांत बसून निघाल्यापासून ज्याअर्थी पिरोज कोठें दिसला नाहीं त्याअर्थी त्याचें आतां आपल्याला भय नाहीं असें मी समजत होतों.

गाडीवाल्यानें आमची गाडी लागलीच उभी केली; व मी खालीं उतरून मागची गाडी अजून कां येत नाहीं ह्मणून रस्त्यांत उभा राहिलों. तों गाडीच्या दोन्हीं बाजूला दोन तरुण धांवत आहेत असें मला दिसलें. हा काय प्रकार आहे हें पाहण्यासाठीं मी त्या गाडीपाशीं गेलों; पण मला पाहतांच ते दोन्हीं तरुण रस्त्याच्या दोन बाजूला पळून गेले. गाडीजवळ

जाऊन पाहतों तों शिरीन गाडींत एकटीच असून ती रडत आहे असें मला दिसलें. म्हणून कांहीं तरी दगा झाला असावा असें मनांत येऊन गाडीच्या मागल्या अंगाला मी वळलों, तों माझ्या मागें पिरोज अजमासें तीन चार हातांच्या अंतरावर उभा असून ल्यूसीला व माणेकला हांका मारीत आहे असें दिसलें! मला पाहतांच पिरोज परत वळून माझ्या गाडीकडे गेला. त्याला पहतांच माझें धैर्य पुन्हां खचलें! आतां शिरीन आपल्या हातीं कशाची लागते असें मनांत येऊन मला फार वाईट वाटलें. तरी पुन्हां मनाचा निश्चय करून मी शिरीनजवळ गेलों व तिला म्हणालों " शिरीन, वाटेंतच हा केवढा बरं घोंटाळा झाला. याला आतां काय उपाय करावा?"

" माझें बोलणें ऐकतांच शिरीन अधींकच रडूं लागली व गाडीवाल्याला शिव्या देऊन म्हणाली " या मेल्यानंच हा सारा अनर्थ केलान्. गाडी उभी कर, उभी कर म्हणत मी एकसारखी ओरडत होत; पण याचं मेल्याचं ऐकतं कोण? दोनच मिनिटं झालीं असतील, यानं मध्येंच गाडी अगदीं सावकास चालविली होती. आणखी कोण मेले दोन धटिंगण दोन्हीं बाजूंनीं धावत आले. अन् त्यांनीं ल्यूसीचा, अन् माणेकचा हात धरून दोन्हीं बाजूंनीं दोघींना गाडींतून ओढून नेल्या! मी एकसारखी ओरडलें; पण यानं म्हणून कांहीं गाडी उभी केली नाहींन्. थांब मेल्या आतां तुला भाडं देतें कां पहा."

' बाईसाहेब, ' गाडीवाला मयाकया करून म्हणाला ' घोडा आवरेना त्याला मी काय बरं करूं? तरी गाडी मी सावकास हांकीत होतों; पण घोडा तुफान झाला त्याला माझा काय उपाय?'

" चुप बैस मेल्या " शिरीन रागानें त्याला म्हणाली, " जास्ती बडबड करशील तर यांच्याकडून पोलीसच्या स्वाधीन करवीन. पाहिजे तसं भाडं मिळतं म्हणून कसे मेले माजले आहेत. लोकांच्या जीवाची आहे कां कांहीं मेल्याना काळजी!"

" बाईसाहेब, " गाडीवाला कांहींसा रागावून बोलूं लागला " अशा शिव्या बिव्या मी ऐकून घेणार नाहीं. तुम्हाला मी सांगतो कीं, घोडा

बेफाम झाला, मग गाडी थांबणार कशी. पण तुझी आपल्या मला एक-सारख्या शिव्या देत सुटला हें कांहीं चांगलं नाहीं. ”

हें ऐकतांच “ केम रे ए पागल, ” गाडीवाल्याला कोणी तरी अतीशय कर्कश आवाजानें कांहीं अंतरावरून धमकी दिली, “ तारे कई खबर छे ! बाइडिओन साथे एविगीते बात करनामां तारे कई पण शरम के भीख लागती नथीं ! ”

“ शेट साब, ” गाडीवाल्यानें नम्रपणानें उत्तर दिलें “ आय बाबतमा मारो कई पण वांक नथी. ”

गुजराथी भाषेंत गाडीवाल्याला धमकी देणारा कर्कश आवाज फिरोज-चाच होता याबद्दल मला मुळींच शंका उरली नाहीं. पण फिरोजनें मला कित्येक वेळां पाहिलें असूनही—आपल्या प्रिय शिरीनजवळ, तिचा हात हातांत घेऊन मी तिच्याकडे प्रेमदृष्टी लाविली होती हें त्याला माहीत असूनही—तो माझा सूड घेत नाहीं याचें मला थोडें आश्चर्य वाटलें, व त्यामुळें थोडा आनंदही झाला होता हें खरें; तरी आतां फिरोज रागावला आहे व आतां तो आपल्याला मारल्यावाचून सोडीत नाहीं असें मला वाटूं लागतांच मी लागलीच शिरीनच्या गाडीमागें जाऊन उभा राहिलों, तोंच माणेक व ल्यूती माझ्या मागें उभ्या आहेत असें मला दिसलें !

मला पाहतांच माणेकनें विचारलें “ कोण फिरोजशेट, शिरीन गाडींत आहे ना ? ” “ होय ” असें थोडा वेळ थांबून मीच उत्तर दिलें. माणेकनें फिरोजशेट हे शब्द मोठ्यानें उच्चारिले असतांनाही ज्याअर्थी फिरोजनें उत्तर दिलें नाहीं त्याअर्थीं तो कोठें तरी पुन्हां नाहींसा झाला असावा असा मी तर्क केला. वरचेवर फिरोज नाहींसा होतो या गोष्टीचा मला मोठा चमत्कार वाटत होता. तरी पण त्याच्याबद्दल त्या तिघीं स्त्रियांना किंवा फिरोजीला एक अक्षरही विचारण्याचें मला धैर्य झालें नाहीं; व तसें विचारलें म्हणजे आपली चांगलीच फजिती व्हावयाची असें मनांत आणून फिरोजसंबंधानें माझ्या मनात वेळोंवेळीं उद्भवणारी जिज्ञासा मी तशीच दाबून ठेविली होती.

मी ‘ होय ’ असें म्हटलेलें ऐकून माणेक म्हणाली ‘ बरी बिचारी संक-

टांतून निभावली ह्मणायची. नाहींतर आमच्या दोघींसारखा तिच्यावरही प्रसंग आला असता. '

' पण तुमच्यावर तरी हें कुठलें मध्येंच संकट आलें ? ' सदयतेचा व सहानुभूतीचा आविर्भाव आणून मी तिला विचारलें,

' अहो काय सांगूं ! आमची गाडी जराशीं हलकें चालत होती. चोर चोर अशा आरोळ्या आमच्या कानीं आल्या. ह्मणून गाडी जलदी हांकण्यासाठीं आह्मी गाडीवाल्याला पुष्कळ सांगितलें; पण इतक्यांत आमच्या गाडीमागून धावत येत असलेल्या दोघां इसमांनीं आमची गाडी गाठली; आणखी आह्मांला दोघींना हात धरून बाहेर अचानक ओढून काढिलें. आह्मीं पुष्कळ ओरडलों; पण इतक्यांत आमची गाडी फार वेगानें निघाली; व आह्मीं दोघीं त्या चोरांच्या हातीं लागलों. आतां त्यांतल्या त्यांत नशिबानें येवढं बरें झालें कीं, चोरांनीं आह्मांला धक्काबुक्की करण्यापूर्वीच तेथें अचानक दोन चार माणसें आलीं; आणि त्यांनीं आह्मांला सोडविलें. आह्मीं गाडी मागें येऊं लागलों तों ते दोघे चोर आमच्यापुढें पळत होते. त्यावरून गाडीवर पुन्हां हल्ला करायचा त्यांचा बेत असावा अशी आह्मांला भीती वाटली. आह्मांला सोडविणारे लोक दुसऱ्या रस्त्यानें निघून गेले. तेव्हां चोरांनीं पुन्हां गाडी गांठली तर आमच्या शिरीनची धडगत दिसत नाहीं अशी आह्मांला मोठी धास्ती पडली. पण मध्येंच गाडी थांबली आणि पुढें चाललेल्या गाडींतून तुह्मी शिरीनजवळ जातांच ते मेले पळाले. एकंदरीनें आज अगदीं थोडक्यांत आह्मीं वांचलों; आमच्या मागून ते चार पांच लोक आले नसते आणखी तुह्मी आपली गाडी थांबवून शिरीनकडे आला नसता तर आमचें मोठें कठीण होतें. तेव्हां या गोष्टीबद्दल आह्मीं तुमचे उपकार मानिले पाहिजेत. "

" माझे उपकार, " मी गर्वानें फुगून ह्मणालों, " हो एका अर्थी तसें ह्मटलं तरी चालेल. कारण मी आपली गाडी उभीच केली नसती तर शिरीनचें संरक्षण होणें जरा मुष्किलीचेंच होतें; पण मी ह्मणतों, तुमचें रक्षण करणें हें मुळीं माझें कर्तव्यच आहे असें नव्हे कां ? '

" हें काय विचारावें, " ल्यूसी मध्येंच माझ्या अहंकाराला उत्तेजन

देऊन ह्मणाली, " जरी कर्तव्य असलें तरी तें वेळेवर बजावणारे, आपल्यासारखे वचन पाळणारे लोक फारच थोडे सांपडतील."

"पिरोज," माणेक ह्मणाली, आतां या रस्त्यावर थांबण्यांत काय अर्थ आहे. आपण आपले लवकर आपापल्या घरीं एकदांचे जाऊन पडलों ह्मणजे बरें."

"ठीक आहे तर चला" असें मी ह्मटलें व आह्मीं आपापल्या गाड्यांत बसून निघालों. आतां मागची गाडी पुढें चालली, व थोड्याच वेळांत ती दिसेनाशी झाली.

हें एकाअर्थी बेष झालें असें मला वाटलें. कारण, मी ज्या गृहस्थाच्या घरीं उतरलों होतों त्याच्या घरीं ल्यूसी, माणेक व शिरीन यांनीं येणें मला इष्ट वाटलें नसतें. ते गृहस्थ आमचे अडते, नंदशंकर जरा त्यावेळीं घरीं नव्हते ( रात्रीच्या गाडीनें सुरतेकडे जावयाचे आहेत असें मला माहीत होतें ) तरी अगदीं अपरिचित अशा तरुण स्त्रिया अशा भलत्यावेळीं माझ्याबरोबर आलेल्या पाहून घरांतील इतर मंडळींना कदाचित् माझ्याबद्दल भलतीच शंका आली असती. शिवाय त्या तिघींनीं माझ्याबरोबर येऊन माझ्या बिऱ्हाडीं कांहीं वेळ थांबून जर पुन्हां मद्यप्राशनाचा प्रसंग आणिला असता तर घरांतील मंडळींच्या दृष्टीनें मी किती निंद्य, बदफैली ठरलों असतों हें सांगतांही आलें नसतें. कारण, ती सर्व मंडळी जुन्या चालीची अगदीं सोवळीं, पवित्र व धर्मानें वागणारी होती. तेव्हां त्यांना असलें धर्मबाह्य, नीतिबाह्य, अतएव सर्व प्रकारांनीं गर्हणीय असें आमचें वर्तन खपलें नसतें हें सांगायला नकोच.

आमच्या अडत्याच्या घराचा पत्ता गाडींत बसण्यापूर्वी मी पिरुजीला सांगून ठेविला होता. त्यामुळें व नंदशंकरांची त्या मोहल्ल्यांत सर्वांना माहिती असल्यामुळें त्यांचें घर सांपडण्याला गाडीवाल्याला मुळींच अडचण पडली नाहीं. त्यानें त्या घरापुढें गाडी थांबवितांच पिरोजीनें माझें ठिकाण आल्याबद्दल मला सांगितलें; व मी खालीं उतरून देवडीवरील गड्याला हांक मारिली. त्यानें दरवाजा उघडला; व घरांतील मंडळींना कळूं न देतां मी चटकन् माडीवर गेलों. दरवाजावरील माडींतच शेट-

जीनीं मला बसण्याउठण्यासाठीं जागा दिली होती. तेथें जाऊन मी दिवा लावला, व आपले कपडे काढून बिछान्यावर पडलों. पहाट झाल्यामुळें देवडीवरील गडी आतां जागे होऊन आपापल्या कामाला लागले होते. बिछान्यांवर पडतांच आपल्याला चांगली झोंप येईल असें मला वाटत होतें; पण तसें न होतां रात्रभर घडलेल्या गोष्टी डोळ्यांपुढें दिसूं लागल्या. त्यांतच मद्याचा अंमल आतां मला चांगला जाणवूं लागला होता आणि शिरीन व पिरोज एकमेकांच्या हातांत हात घालून माझ्यापुढें उभे असून पिरोज क्रुद्ध दृष्टीनें माझ्याकडे पहात आहे; व तो आतां आपल्याला मारणार असा विचित्र देखावा डोळ्यापुढें दिसूं लागला ! चिंता, भय, आशा. व आनंद अशा निरनिराळ्या विकारांनीं मन अगदीं अस्वस्थ होऊन गेलें होतें; आणि त्यांतल्यात्यांत कधींही माहीत नसलेल्या अशा त्या मद्याच्या अमलानें तर त्याची इतकी कांहीं ओढाताण चालविली होती कीं, त्या विलक्षण त्रासानें मी अगदीं संतापून गेलों होतों. एकदां आपल्याला कोणी तरी उंच उंच उचलून नेत आहे व लागलीच आपण एकाएकीं एकदम खालीं आदळत आहों असा भास होई. मदिरेच्या व्यसनांत दंग होणाऱ्यांना या बाबतींतला माझ्यासारख्या नवख्या मनुष्यानें आपला अनुभव सांगण्याचें कांहीं कारणच नाहीं; असो.

अशा स्थितींत मी बिछान्यावर पडलों असतांना गाडीचा घोड्याच्या टापांचा आवाज माझ्या कानीं आला. नंदशंकरशेटजी सुरतेहून कांहीं आज यावयाचे नव्हते. तरी कोणाची गाडी आली असावी असा विचार करीत मी सज्जांत येऊन पाहतों तों ती गाडी आमच्याच दारापुढें उभी राहिली. व तिजमधून एक पारशी, एक गुजराथी, एक मुसलमान व एक घाटी असे चार प्रकारचे तरूण बाहेर पडले. व त्यांना काय वाटलें असेल तें वाटो; पण त्यांपैकीं एकटा पारशी मात्र आमच्या दरवाजाजवळ आला आणि खालीं असणाऱ्या एका गड्याशीं तो कांहीं वेळ बोलत उभा राहिला. बाकीचे तिघे इसम लागलीच गाडींत जाऊन बसले.

यावेळीं चांगलें उजाडलें होतें व त्या पारशी तरुणाचा चेहरा मला चांगला ओळखतां आला. हा पिरोजच ! पण यावेळीं हा येथें कां आला असावा; आणखी याच्याबरोबर हे तीन इसम कोण याचा मला कांहीं

उलगडा होईना. गड्यार्शी बोलत असतांना पिरोज मधून मधून घराच्या सर्व बाजूकडे पहात होता. मी उभा होतों त्या ठिकाणाकडे त्यानें आपली तीक्ष्ण नजर दोन तीन वेळां लावून पाहिली. पण माझा चेहरा त्याच्या दृष्टीस पडला नसावा. कारण तसें झालें असतें तर आपल्या हातून निसटून गेलेल्या शत्रूचा पत्ता लागल्याबद्दल त्याला आनंद वाटून त्या विकाराचें प्रतिबिंब त्याच्या चर्येवर उमटलें असतें; पण तसं कांहीं झालेलें दिसत नव्हतें. उलट त्याच्या चर्येवर उद्विग्नतेची व उदासीनतेची छाया मात्र स्पष्टपणें दिसत होती. पिरोजला पाहतांच मी पुन्हां घाबरून गेलों. पुन्हां ही ब्याद कोठून आली असें मला होऊन गेलें. आपला बिलकुल पत्ता लागूं न देतां याला येथून लवकर घालविण्याची कांहीं तरी युक्ती मी शोधीत होतों; पण माझा यत्न व्यर्थ आहे असें मला तेव्हांच कळून आलें. कारण देवडीवरील एका गड्याशीं त्याचें जें बोलणें चाललें होतें तें जरी मला पूर्णपणें ऐकूं आलें नाहीं, — व ऐकूं आलें असलें तरी मदिरेच्या धुंदींत असल्यामुळें तें मला चांगलेंसें कळलें नाहीं तरी त्यांतील वाक्यें माझ्या चांगलीं ध्यानांत आलीं. हा एकंदर प्रकार काय आहे याबद्दल गड्याला यत्किंचितही कल्पना नसल्यामुळें पिरोजनें त्याला विचारलेल्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें त्यानें सरळपणानें आणि मोकळ्या मनानें दिलीं असलीं तर त्यांत कांहीं आश्चर्य नव्हतें.

'एकूण नंदशंकर शेटजी उद्यां संध्याकाळीं येणार तर?' पिरोजनें त्या गड्याला उत्सुकतेनें विचारलें.

'होय साहेब.'

'तर मग त्यांची भेट परवां सकाळीं घ्यायला कांहीं हरकत नाहीं.'

'नाहीं; परवां सकाळीं पुन्हां ते गांवीं जाणार आहेत.'

'बरें ते भगवानदास शेटजी येथें आणखी किती दिवस राहणार आहेत?"

'मला कांहीं बरोबर ठाऊक नाहीं, पण ते आणखी आठदहा दिवस राहतील असें वाटतें.'

'तें रे कशावरून?'

"त्यांनीं परवाच्याच दिवशीं येथल्या एका शिंप्यापाशीं बरेच कपडे

शिवायला दिले आहेत; आणखी ते त्यानें आठ दहा दिवसानंतर आणून देण्याचें भगवानदास शेटजीपाशीं कबूल केलें आहे. '

" कायरे तुझे शेटजी, आणखी तुझे पाहुणे चांगले श्रीमंत आहेत नाहीं ? "

' होय ते दोघेही मोठे व्यापारी आहेत. '

' बरें तें असो ह्मणा. पण आणखी दोन तीन दिवसांनीं आह्मी तुझ्या शेटजीकडे कांहीं कामासाठीं येणार आहों. तेव्हां तुझे ते पाहुणे घरीं असतील कीं नाहीं ? '

" तें मला कांहीं सांगतां येणार नाहीं. मुंबईत ते अगदीं पहिल्यानेंच आले आहत; तेव्हां ते रोज सारा दिवस व रात्र बहूतकरून कोठेंतरी हिंडत असतात, .... पण त्यांची भेट ........ "

दोघांचें इतकें बोलणें होत आहे तों त्या बाजूनें एक पोलीसकान्स्टेबल जातांना दृष्टीस पडला. त्याला पाहतांच गाडींतल्या एका इसमानें पिरोजला कांहींतरी खूण केली; व लागलीच पिरोज गाडींत जाऊन बसला; आणि विरुद्ध दिशेनें त्यांची गाडी जोरानें निघाली ती पाहतां पाहतां दिसेनाशी झाली !

या गोष्टींचा कार्यकारणसंबंध कांहीं केल्या माझ्या ध्यानांत येईना. निरनिराळ्या जातीचीं तीन माणसें बरोबर घेऊन पिरोजचें आमच्या शेटजींच्या घरीं येणें, गड्याला विचारून त्यानें कांहीं गोष्टींचा व विशेषेंकरून माझ्यासंबंधाचा खुलासा करणें, तितक्यांत तेथें पोलिसकान्स्टेबल येणें व लागलीच त्या मंडळींचें विरुद्ध दिशेकडे मोठ्या गर्दीनें निघून जाणें; वगैरे गोष्टींची संगती मला लावितां येईना. तरी पण ही हकीकत दृष्टीस पडल्यापासून माझ्या मनानें एक नवीनच भीति घेतली ! काय ? शिरीनच्या प्रेमासाठीं आपण करीत असलेला प्रयत्न शेवटीं निष्फळ ठरून आपल्याला त्याबद्दल कांहीं तरी भुर्दंड भोगावा लागणार ? त्या पिरोजला कायमचें टाळण्याची कांहीं तरी युक्ती आपल्याला शोधून काढितां येईल काय ? बरें शिरीन आपल्याबरोबर दुसऱ्या एखाद्या गांवीं रहावयाला येण्यास तयार होईल काय ? तिच्या ह्मणण्याप्रमाणें वागून नंतर आपलें खरें स्वरूप तिला व्यक्त करून दाखविलें तर त्याचा परिणाम आपल्याला अनिष्ट होईल कीं काय ? या नव्या संकटाला आता काय उपाय करावा ?

असे नानाप्रकारचे घोंटाळ्याचे अनेक प्रश्न एकसमयावच्छेदेंकरून माझ्या मनाला त्रास देऊं लागले !

---

# प्रसंग ७ वा.

या गोष्टीला आतां उपाय काय करावा ? त्या फॅन्सीफेटमध्यें गेल्यामुळें हा एकंदर घोंटाळा झाला. त्या मयाच्या मायेंत ( फॅन्सी फट पहावयाला गेल्यानें मी एका पारशी तरुणीच्या मोहजालांत सांपडलों असें मनांत येऊन मी त्या फेटला " मयाची माया " असें नांव दिलें होतें. ) सांपडल्यामुळेंच आपल्याला ही दुसऱ्याच्या स्त्रीला फसवून आपल्या नादीं लावण्याची विलक्षण भुरळ पडली ! हें सारें खरें पण आतां शिरीन आपल्या हातीं कशी लागावी; आणखी आपल्या शत्रूची ब्याद नाहींशी करायला काय तोड काढावी ? त्याचप्रमाणें मघाशीं आपल्या दारापाशीं उभ्या असलेल्या गाडींतून उतरलेला, अगदीं हुबेहुब आपल्या शिरीनच्या धिरोजसारखा दिसत असलेला पारशी आपली चवकशी इतक्या बारकाइनें काय म्हणून करीत होता ? असे संशय मनांत येऊन मी विचार करीत आपल्या बिछान्यावर स्वस्थ पडून राहिलों.

गेल्या रात्रीं शिरीननें दिलेल्या मदिरेनें अजूनही माझ्या चित्ताला कवटाळलें होतें; व तिच्या अमलांतून आपण आतां कसे व केव्हां सुटूं असें मला होऊन गेलें होतें. या सर्व संकटांतून सुटण्याचा कांहीं तरी उपाय जर आपल्याला लवकर सुचला तर ठीक आहे; नाहीं तर आपली कांहीं धडगत दिसत नाहीं. त्यांतून आतां आपण आपल्या खुद्द अडत्याच्या—नंदशंकरशेटजींच्या—घरीं आहों. शहरांतल्या कोणत्याही इतर ठिकाणीं असतों तर गोष्ट निराळी होती. दुसऱ्या ठिकाणीं असतांना आपली कशीही जरी फजीती झाली असती; पिरोजनें चारचौघांत जरी कदाचित आपली छी थू केली असती, नव्हे आपल्याला मार दिला असतां किंवा हवें तें केलें असतें तरी पुरवतें; पण नंदशंकरशटजी-सारख्या नांवलौकिकवानाच्या; अब्रूदार व्यापाऱ्याच्या आणि संभावित

गृहस्थाच्या घरीं आपण त्याचे पाहुणे या नात्यानें उतरलों असतांना जर आपली बदनामी झाली तर त्याचा काय परिणाम होईल ? छे अस-ल्या नुसत्या कल्पनेनें देखील काळीज कसें चर्र होऊन जातें; मग प्रत्यक्ष तसें कांहीं घडलें तर आपली स्थिति काय होईल !

अशा प्रकारच्या कल्पना मनांत येत असतांना, शिरीननें मला दिलेली तिची दागिन्यांची पेटी—ही मी घरीं आल्याबरोबर आपल्या बिछान्या खालीं अगदीं आपल्या हाताशींच ठेविली होती–माझ्या हाताला लागली व पूर्वीच्या सर्व कल्पना नाहींशा होऊन मी आपल्या कृत्याचें आतां समर्थन अशा रीतीनें करूं लागलों कीं, ज्याअर्थी मायेच्या मोहजालांत अविचारानें आपण स्वतःला गुरफटून घेऊन, शिरीनला वश करण्याचें भयंकर धाडस केलें आहे त्याअर्थी त्या कृत्याचा बरा-वाईट परिणाम भोगण्याला आपण तयार न होणें हा केवढा नामर्दपणा ? इतक्या थराला गोष्ट आल्यावर शिरीन आपल्या हातीं येण्याला आतां अगदींच थोडा अवकाश राहिला आहे असें स्पष्ट दिसत असूनहीं काल्प-निक भीतीनें घाबरून आतां माघार घ्यावयाची–एखाद्या भागुबाईप्रमाणें लपून बसावयाचें, किंवा पळून जावयाचें हें तरी आपल्या मर्दपणाला शोभ-ण्यासारखें आहे काय ? छे; तें कांहीं नाहीं. असल्या संकटांतून सुरक्षि-तपणानें निभून जाण्याची आणि आपल्या शिरीनला त्या पिरोजच्या हातून सोडवून घेण्याची—खरोखर पाहिलें तर ती कांहीं त्याच्या हातीं अजून लागलेली नाहीं, तरीपण असें आहे तोंच—कांहीं तरी युक्ती लव-कर काढलीच पाहिजे. आतां दुसरा तिसरा विचार करण्यांत फुकट वेळ घालवीत बसण्याची मुळींच सोय नाहीं. असा आपल्या मनाशीं मीं ताबडतोब निश्चय ठरविला; व लागलींच एक कल्पना माझ्या मनांत येऊन त्याप्रमाणें आपण वागलों तर खात्रीनें या संकटांतून पार पडूं असें मला वाटूं लागलें.

यावेळेला अजमासें सात वाजून गेले होते. नंदशंकरशेटजींच्या घरां-तील सर्व मंडळी निजून उठल्याला बराच वेळ झाला होता.. सर्व माणसें आपापले रोजचे व्यवहार करूं लागलीं होतीं. शेटजींचा एक गडी मी उठलों आहे कीं नाहीं हें पाहण्यासाठीं वर आला. मी अजूनही बिछा-

ऱ्यावर लोळत पडलों होतों. मनांत आलेली कल्पना कृतींत कशी उतरवितां येईल याबद्दल साधक बाधक अशा सर्व गोष्टींची आपल्या मनांतल्या मनांत मी शहानिशा चालविली होती. ‘ हो पण असं करण्यापासून उपयोग कितपत होईल ? त्याला भेटायचं खरं; पण काल संध्याकाळपासून घडलेली सगळी हकीकत अगदीं खडानूखडा तो आपल्याला विचारणार. आणखी आपण मूर्खपणानें, अविचारानें अमक्या अमक्या गोष्टीच्या नादीं लागलों आहों असं प्रांजलपणानं त्याच्याशीं कबूल करण्यावांचून कांहीं गत्यंतर नाहीं. बरं इतकंही करून त्यानं भलतीच सल्ला दिली तर ? आपला हा सगळाच व्यूह ढासळणार ! पण यापेक्षां त्याच्याकडे जाऊन आतांपर्यंत काय काय घडलं याचा त्याला मुळींच मागमूस लागूं दिला नाहीं. आणखी अमका अमका मनुष्य कोण आहे, तो कुठें असतो, काय करितों असंच नुसतं त्याला धोरणाधोरणानं विचारून आपल्याला पाहिजे आहे तितकी माहिती त्याकडून काढण्याची खटपट केली तर ? छे, तसं करूनही कदाचित् जमणार नाहीं ! कारण, ज्या माणसाबद्दलची माहिती काढावयाची तो माझ्या परिचयाचा नाहीं हें त्याला पक्कें ठाऊक आहे; आणखी कांहीं तरी विशेष कारण असल्यावांचून त्याच्याबद्दलची माहिती इतकी मी खोदून खोदून कां विचारतों असा त्याला सहजच संशय येणार. शिवाय आपण जर त्याचें समाधान करण्याच्या कामीं आढेवेढे घेतले; उडवाउडवी करूं लागलों तर अशानें आपल्या संकटांतून पार पडण्यासाठीं आपण जें त्याचे सहाय्य मिळवूं पाहणार तें मात्र मिळणें कठीण पडेल ! त्याला सर्व हकीकत सांगितली तर कदाचित् त्याच्या विचारानें आपल्याला कोणताही त्रास न पडतां या पेचांतून मोकळें होतां येईल आणि ज्याच्या ठिकाणीं मन इतकें आसक्त होऊन गेलें आहे तो आपला हेतूही सिद्धीला जाईल. पण आपण अमुक गोष्ट केली असें त्याला सांगणें ह्मणजे तरी आपल्याला लाजिरवाणेंच नाहीं कां ? आपल्याविषयीं त्याची अगदीं जरी अनुकूल भावना असली, संकटांतून आपल्याला तो मुक्त करील अशी आपल्याला त्याच्याबद्दल कितीही खात्री वाटत असली तरी आपल्या हातून जें कृत्य घडलें आहे, जी गुप्त गोष्ट दुसऱ्याला—मग तो कोणीही असो—कळविल्यापासून आपली मानखंडना

व नुकसान होणार हें आपल्याला अगदीं उघड दिसत आहे ती गोष्ट, तें आपलें गुह्य त्याला काय किंवा आणखी कोणाला काय पाहिजे तें झालें तरी कळूं न देतां आपला कार्यभाग मोठ्या हुषारीनें आणि हिकमतीनें साधणें हाच खरा शहाणपणा ! शिवाय दुसरं असं कीं, कोणत्याही गुप्त गोष्टीची वाच्यता झाली ह्मणजे ती साध्य होणें कठीण पडतें. तेव्हां एकंदरीनें असेंच करायचें कीं, 'शेंडी तुटो कीं पारंबी तुटो,' आपला गुप्त हेतू त्याला समजूं न देतां त्याच्याकडून आपल्याला पाहिजे ती माहिती काढून घ्यायची. बस असेंच ! आतां एक क्षणही जाऊं न देतां एकदम आपल्या उद्योगाला लागावयाचें !'

अशा प्रकारचा दृढ निश्चय करून मीं गर्दीगर्दीनें आपला प्रातर्विधि आटोपला आणि लागलीच आपले कपडे चढवून बाहेर जाण्यासाठीं जिना उतरूं लागलों. तोंच आमच्या शेटजींच्या नोकरांपैकीं एक इसम जिन्यांतच मला भेटला आणि ह्मणाला "शेटसाहेब, आपण मघाशीं मागल्या दारीं गेला होता तेव्हां आपली भेट घेण्यासाठीं कोणी एक पारशी बाई, एक मडम, एक गुजराथी बाई आणखी एक शिपाई इतकी मंडळी गाडींत बसून आली होती."

"काय ?" मी चपापून त्याला प्रश्न केला "मला भेटायला इतक्यांत कोणी आलें होतें ?"

"होय शेटसाहेब, ती मंडळी आमच्यापैकीं कोणाच्याच माहितीची नव्हती. आपल्या शेटजींच्या येथें त्यांच्यापैकीं कोणी आलेलं कधीं आह्मीं पाहिलं नाहीं. आणखी त्यांनीं मला सांगितलं कीं, 'तुझ्या नंदशंकरशेटजींची व आमची काहीं ओळख नाहीं. आह्मीं आमच्या पिरोजशेटकडे कांहीं जरूरीच्या कामासाठीं आलों आहों.' पण साहेब, त्यांचे पिरोजशेट कोण हें काहीं आमच्या लक्षांत येईना. मी तर त्यांच्याकडे वेड्यासारखा पाहूं लागलों; आणखी त्यांना ह्मणालों 'बाईसाहेब, तुह्मी भलत्याच घरीं आलां आहां. तुह्मी ह्मणतां त्या नांवाचे गृहस्थ आमच्या या बंगल्यांत कोणीच नाहींत.' पण त्यांना मीं असं सांगितल्यावर त्या पारशी बाई एकदम हंसून मला ह्मणाल्या 'अरे, तूं वेडाविडा तर नाहींसना ! अरे, कालच आमचे पिरोजशेट—....कालिजांतून,' साहेब, यांनीं सांगितलेलें

नांव मी विसरलों– ' इथें आले आहेत; आणखी तुझे हे नंदशंकर शेटजी त्यांचे स्नेही असल्यामुळें मधून मधून ते यांच्या इथें येतात असं आह्माला कळलं आहे. पण या नांवाचे कोणीच गृहस्थ मला ठाऊक नाहींत असं तूं सांगतोस; तुला काय ह्मणावं ? " असें सांगून त्यांनीं मलाच उलटा वेडा ठरविलं ! साहेब, ही काय भानगड आहे ती तुमची तुह्मी आपली समजून घ्या. "

नोकराचें बोलणें ऐकून मी मनांत बराच कचरलों. सुरूं झालेल्या ह्या घोटाळ्यानें कांहीं तरी भलत्याच भानगडी उपस्थित न होवोत असें मला होऊन गेलें. हा इसम ह्मणतो त्या प्रकारच्या तीन बायका आणखी एक शिपाई हे कोण असावेत याचा मी विचार करूं लागलों आणि ज्याअर्थीं त्यांनीं फिरोजच्या नावाचा उल्लेख केला त्याअर्थीं त्या आणखी दुसऱ्या कोण असणार ! पण त्यांना माझं हें ठिकाण कसें कळलें ? त्यांनीं नंदशंकरशेटजींच्या घरीं येऊन आपला तपास करूं नये किंवा माझ्याशीं यांचा कांहीं संबंध आहे असं येथें कोणाला कळूं नये ह्मणून तर मीं काल रात्रीं घरीं येतांना त्या माझ्याबरोबर येतात कीं काय असें वाटून त्यांना मुद्दाम टाळलें होतें; पण शेवटीं त्यांना माझा पत्ता कसा लागला याचें मला मोठें आश्चर्य वाटलें—नव्हे या गोष्टीची माझ्या मनांत एकप्रकारची भीति उत्पन्न झाली. कारण अशा अशा कोण्या तरुण स्त्रिया माझ्याकडे येत असतात असें जर नंदशंकरशेटजींच्या कानावर गेलें तर माझ्याबद्दल त्यांना भलताच संशय येईल आणि त्यामुळें पुढें मागें माझी कदाचित् बेअब्रू होईल अशी माझ्या मनानें धास्ती घेतली. पण आपण यत्किंचितही भ्यालों आहों; किंवा त्या तिघी स्त्रियांचा आपल्याशीं कांहीं संबंध आहे असें मीं त्या नोकराला कळूं दिलें नाहीं. आणि त्यानें सांगितलेली हकीकत ऐकून मी थोडासा स्तब्ध झालों व आपण जसें कांहीं त्या गांवचेच नाहीं असें त्याला भासविण्याच्या हेतूनें किंचित् आश्चर्यचकित् झाल्यासारखें दाखवून मीं त्याला प्रश्न केला " अरे, त्या तिघी बायका कोण, कुठल्या याबद्दल तूं त्यांना कांहीं विचारलें कसें नाहींस ? "

" साहेब, आपल्याला त्यांची माहिती असेल असें वाटून मीं त्यांची कांहीं चवकशी केली नाहीं. "

" अरे, मग मी येईपर्यंत त्यांना बसायला तरी सांगायचें होतेंस. "

असें ह्मणण्यामध्यें माझा हेतु इतकाच होता कीं, जमल्यास त्याच्यापाशीं त्या तिघीजणी आणखी काय बोलल्या हें काढून घ्यावें; पण यावर तो ह्मणाला " थोडा वेळ थांबलात तर बरें होईल असें मीं त्यांना सांगून पाहिलें; 'पण आह्माला दुसरीकडे अगदीं निकडीचें काम आहे. येथें थांबण्याला आह्माला मुळींच वेळ नाहीं' असें त्या ह्मणाल्या. ह्मणून तुमचा कोणाला कांहीं निरोप सांगायचा आहे काय असें मी त्यांना विचारलें. "

'मग त्या काय ह्मणाल्या ?' आश्चर्यचकित् झाल्यासारखें करून मीं त्याला विचारलें.

'होय साहेब, त्यांनीं निरोप तर कांहीं सांगितला नाहीं; पण हें एक पत्र दिलें आहे.' असें ह्मणून त्यानें एक बंद केलेलें पाकीट माझ्या हातांत दिलें.

तें पत्र हातीं घेऊन जसा कांहीं त्याच्याशीं आपला संबंधच नाहीं असें मीं आपल्या चर्येनें त्याला भासविलें ! मला पक्कें माहीत होतें कीं, हें पत्र शिरीननें आपल्यासाठीं ह्मणून दिलेलें असून त्यामध्यें माझ्याविषयींचें तिचें प्रेम वृद्धिंगत होत चालल्याचें कांहींतरी चिन्ह आहे. तिचें माझ्याठिकाणीं जडलेलें प्रेम चंचल नाहीं असें मला समजविण्यासाठींच तिनें हें पत्र लिहिलें आहे. यांत शंका नाहीं ! असें मनांत येऊन मीं तें पत्र मोठ्या आतुरतेनें आपल्या खिशांत घातलें. व ज्या स्त्रियांचा व माझा कांहीं एक संबंध नाहीं असें मी त्याला भासवीत होतों त्या स्त्रियांनीं दिलेलें पत्र मी आपल्या खिशांत घातलें याबद्दल त्याला आश्चर्य वाटूं नये ह्मणून मी कांहीं एका गोष्टीची आठवण झाल्यासारखें करून त्याला ह्मणालों " हं, आतां आलें माझ्या ध्यानांत ! एक पारशी गृहस्थ—आणखी त्याचें नांवही पण पिरोजच आहे—माझ्या ओळखीचा आहे. तो काल रात्रीं मी नाटकाहून परत आलों तेव्हां माझ्या बरोबर येथेंच येणार होता; आणखी कदाचित् तो गृहस्थ आज येथें असेल असें समजून तूं ह्मणतोस त्या बायका त्याच्याकडे ह्मणून आल्या असतील."

याप्रमाणें त्या नोकराच्या मनांत कांहीं तरी शंका येईल असें समजून मीं मोठ्या युक्तीनें त्याचें समाधान केलें; व आज दोन प्रहरीं मी जेवावयाला येणार नाहीं असें घरांतील मंडळींना कळविण्याविषयीं त्याला सांगून मी आपल्या कामाला निघालों.

यावेळीं मी जो कांहीं एक विशिष्ट विचार मनांत आणिला होता तो मी घराबाहेर पडतांच थोडावेळ रहित केला आणि नुकतेंच खिशांत ठेविलेलें शिरीनचें पत्र पहिल्यानें वाचून पाहिलें ! मी आज आपल्याला तीन वाजण्याच्या सुमारास अमक्या ठिकाणीं भेटेन असें तिनें आपल्या पत्रांत मला लिहिलें होतें. तिच्या हातचें तें पत्र वाचून पाहतांच मला जो कांहीं आनंद झाला तो सांगतां येत नाहीं. एकदां तीन केव्हां वाजतात व शिरीन आपल्याला केव्हां भेटते असें मला होऊन गेलें. आतां प्रथम मनांत आणिलेल्या विचाराकडे, संकटांतून पार पाडण्याची युक्ती काढण्यासाठीं मी ज्या गृहस्थाकडे जायला निघालों होतों त्याच्याकडे जाऊं नये असें मला वाटलें; पण सुदैवानें ज्या गृहस्थाकडे मी जाणार होतों त्याचें ठिकाण व शिरीननें आपल्या पत्रांत उल्लेखिलेलें ठिकाण हीं दोन्हीं एकमेकांपासून लांब नव्हती. त्यामुळें आपण पहिल्यानें त्या गृहस्थाकडेच जावें आणि तीन वाजेपर्यंत त्याच्या येथेंच थांबून नंतर मग शिरीनची वाट पहात ठरलेल्या जागीं जाऊन बसावें असा बेत करून मीं एका भाड्याच्या गाडींत बसून मला आमक्या ठिकाणीं जावयाचें आहे असें गाडीवाल्याला सांगितलें आणि त्याप्रमाणें गाडीवाल्यानें त्या बाजूला गाडी चालविली.

मला मुंबईची कांहींच माहिती नव्हती. पण गाडीवाले लबाड असतात हें मीं ऐकलें होतें व त्या गोष्टीचा मला गेल्यारात्रीं अनुभवही आला होता; ह्मणून गाडीवाला आपल्याला आतां कोठें घेऊन जाणार याबद्दल मला खात्री नव्हती. कदाचित् गेल्या रात्रीप्रमाणेंच आतांही आपण भलत्याच ठिकाणीं जाऊन पडलों तर आपला बेत बाजूला राहून शिवाय शिरीनची व आपली ठरल्याप्रमाणें भेट झाली नाहीं तर काय करावें अशी भीति वाटून मी गाडीवाल्याला “ मी ह्मणतों तें ठिकाण तुला माहीत आहे ना ? ” असें एखाद्या वेड्याप्रमाणें वारंवार विचारीत होतों.

हें ऐकून गाडीवाला वरचेवर माझ्याकडे पहात होता; व शेवटीं तो मला म्हणाला " शेट, असे गाबरतं कसाला ? तुला आमी फसवेल का काय ? "

" तसें नाहीं रे, " मी त्याला उत्तर दिलें. " भलत्याच, लांबच्या एखाद्या रस्त्यानें गाडी नेलीस तर मला तिथें जायला उशीर लागेल; ह्मणून तुला सांगतों. "

मला जेथें जावयाचें होतें तें ठिकाण ह्मणजे मुंबईतील अगदीं सुप्रसिद्ध अशा ठिकाणचें एक असून तें प्रत्येक गाडीवाल्याला अगदीं सहज सांपडण्यासारखें होतें. तरी पण आपण त्या ठिकाणीं पोंचतों कीं नाहीं; वाटेंतच आपल्यावर एखादें संकट ओढवतें कीं काय अशी मला भीती वाटत होती !

इतक्या वेळांत मला जेथें जावयाचें होतें त्याठिकाणीं माझी गाडी जाऊन पोंहोंचली; व मीं अगदीं निर्धास्तपणानें, वाटेंत कोणत्याही प्रकारचा दगा फटका न होतां गाडींतून खालीं उतरून गाडीवाल्याचें भाडें चुकतें केलें; आणि ज्या गृहस्थाची मला भेट घ्यावयाची होती ते बाहेर गेले आहेत कीं काय, हें पाहण्यासाठीं दहापांच पावलें पुढें गेलों. पण तो गृहस्थ बऱ्याच वेळापूर्वीं बाहेर गेल्याचें तेथल्या एका नोकरानें सांगितल्यामुळें आतां तीन वाजेपर्यंत काय करावें या विचारांत मी तेथेंच आसपास इकडे तिकडे फिरूं लागलों; व भाड्याची गाडी करून पुन्हा कोठून तरी फिरून यावें असें मनांत आणून त्याप्रमाणें जवळच उभ्या असलेल्या गाड्यांपैकीं एका गाडीमध्यें जाऊन बसणार तोंच माझ्या परिचयाचा गृहस्थ समोरून येतांना मला दिसला.

# प्रसंग ८ वा.

" अरे, मी तर समजत होतों कीं तूं काल रात्रीच्या मेलनेंच पेटलादला गेलास ह्मणून. "

" हो, तुला सांगितल्याप्रमाणें मी जाणारच होतों; पण संध्याकाळीं फेट मधून परत आल्यावर आणखी देखील थोडे दिवस ही फेटची मजा पहायला रहावं असं वाटूं लागलं आणखी ह्मणूनच मीं आपला बेत रहित केला. "

" पण यावेळीं तूं माझ्याकडे येशील असं मला ठाऊक असतं तर मी बाहेर तरी गेलों नसतों. तुला बराच वेळ माझी वाट पहात रहावं लागलं असेल ना ? "

" हो पण त्याचं काय मोठंसं, तें असूं दे ह्मणा. "

" बरं पण आज यावेळेला तूं इकडे कोणीकडे ? "

" तुझ्याचकडे म्हणून आलों होतों. काल तुला सांगितलं होतं पेटलादला जाईन म्हणून; पण आणखी कांहीं दिवस राहून फेटची मजा पहावी असं मीं ठरविलं. तेव्हां ह्मटलं कीं, सहज तुला एकदां भेटावं ह्मणजे माझ्याबरोबर संध्याकाळच्या वेळेला फेट पहायला जायचं आहे असं ठरवायला ठीक पडेल. येशील कां तूं माझ्याबरोबर दोनतीन दिवस ? "

त्यानें 'हो' असें उत्तर दिलें आणि आह्मी दोघे पुन्हा सहज रस्त्याच्या बाजूला आलों. यावेळीं कोठें तरी बाहेर जावयाचा त्याचा विचार असावासें मला दिसलें; पण त्याबद्दल तो मला कांहींच ह्मणाला नाहीं.

ज्या गृहस्थाला भेटायला मी गेलों होतों त्याचें नांव मनुभाई असें होतें. त्याचा व माझा अगदीं लहानपणापासून स्नेह होता. विद्याभ्यासासाठीं तो सुमारें तीन चार वर्षे मुंबईत राहिला होता. वास्तवीक यावेळीं त्याची गांठ घेण्यांत माझा हेतू कांहीं निराळाच होता; पण मुद्दाम आपण येवढ्यासाठींच आलों आहों असें माझ्या मनांतून त्याला समजूं द्यावयाचें नव्हतें. ह्मणून त्याच्याशीं बोलतांना फेट पहायला जाण्याचा विचार ठरविण्या-

साठींच मी तझ्याकडे आलों आहे असें मी त्याला अगदीं खोटेंच सांगितलें.

त्याची व माझी गांठ पडण्यापूर्वी मनामध्यें थोडीशी शंका उत्पन्न होऊन — शिरीनच्या पत्रांत तिनें आपल्या भेटीला येण्याची वेळ कोणती लिहिली आहे, तीन कीं साडेतीन हें गर्दीत बरोबर ध्यानांत न राहिल्यामुळें — त्याबद्दलची मनाची एकदां खात्री करण्यासाठीं मीं शिरीनचें पत्र पुन्हां उघडून कांहीं वेळ रस्त्यांतच वाचीत बराच वेळ उभा राहिलों होतों. त्यावेळीं माझ्या मनाला विलक्षण मोह पाडणारें तें पत्र मीं दोन तीन, नव्हें किती तरी वेळां वाचून पाहिलें असेल! त्या पत्रानें मला इतका कांहीं आनंद झाला कीं सांगतां येत नाहीं. शिरीनला वश करण्यासंबंधाची काल संध्याकाळपासून माझ्या मनांत उत्पन्न झालेली हांव, दुष्ट वासना, कांहीं झालें तरी तृप्त केल्याशिवाय रहावयाचें नाहीं असा मीं ठरविलेला निश्चय तिचें तें पत्र हातीं येण्यापूर्वी किंचित् लटपटल्याचा मला भास होत होता. पण त्या निश्चयाला डळमळविणाऱ्या सर्व प्रतिकूल कल्पना आतां एकाएकीं नाहींशा झाल्या. व त्या निश्चयाला आतां एक प्रकारचें विलक्षण उत्तेजन मिळालें, असें मला वाटूं लागून ज्या संकटाच्या कल्पनेनें मी घाबरून गेलों होतों, ज्या माझ्या प्रिय हेतूच्या सिद्धिविषयीं माझ्या मनांत जबरदस्त शंका उत्पन्न झाली होती तें संकट आणि इष्टहेतू संबंधाची ती निराशा आतां एकदम कोठल्या कोठें गेली हें मला समजलेंही नाहीं! कोणताही मनुष्य एखाद्या कार्याच्या — मग ते बरें अथवा वाईट कसेंही असो — पूर्णपणें नादीं लागला आणि त्या बाबतींत त्याला उत्तेजन देणारी अशी एखादी अगदीं क्षुल्लक गोष्ट जरी घडून आली — निदान तसें झाल्याचें कल्पनेनें जरी त्याला वाटलें — तरी त्याला केवढा आनंद होतो व किती विलक्षण अवसान चढत असतें. पण या आनंदाच्या भरांत आपण करावयास निघालेलें कृत्य कसें काय आहे. त्याच्या योगानें आपलें किंवा दुसऱ्या कोणाचें नुकसान होण्याचा संभव आहे कीं काय, वगैरे विचार — कोणत्याही कार्याच्या सिद्धीला अवश्य असणारे विचार — तो सहसा मनांत आणीत नाहीं. आणि अविचारानें टाकलेलें पाऊल मागें न घेतां तो आपला नाश करून घेण्याला प्रवृत्त होत असतो!

मनुभाईची व माझी गांठ पडली त्यावेळीं शिरीनचें तें पत्र चुकून माझ्या हातांत तसेंच घडी न करितां राहिलें होतें. त्याच्याकडे मनुभाईची सहजच नजर गेली; आणि त्या पत्राबद्दलची जिज्ञासा त्याच्या मनांत उत्पन्न झाली असावी असें मला त्याच्या मुद्रेवरून दिसलें. हीं गोष्ट माझ्या तेव्हांच ध्यानांत आली; पण तें पत्र आपण खिशांत घालण्याची जर गर्दी केली तर कदाचित् त्याला कांहीं तरी शंका येईल असं वाटून मी बेफिकिरपणानें तें आपल्या हातांत तसेंच राहूं दिलं!

आमचीं बरींच प्रश्नोत्तरें झालीं तरी एतका वेळ तें पत्र माझ्या हातांतच होतें. ते खिशांत घालावें कीं नाहीं याबद्दलचा मी अजूनसुद्धां विचारच करीत होतों; पण येवढा वेळ त्याचीही नजर मधून मधून माझ्या हाताकडे जात होतीच; व माही पत्रांतील मजकूर होतां होईल तों त्याला दिसूं द्यावयाचा नाहीं अशा इच्छेनें आपला डावा हात वरचेवर इकडे तिकडे करीत होतों. तरी याबद्दल माझ्या मनामध्यें स्वस्थता मात्र मुळींच नव्हती व त्यावेळीं माझी चर्या बरीच चमत्कारिक झालेली दिसत असावी असें मला वाटलें; कारण, थोडच्याच वेळानें मनुभाईला इतका वेळ यानें आपल्या हातांत हा कसला कागद ठेविला आहे असें वाटून त्यानें मला विचारलें "भगवानदास, अरे, आज हा तुझ्या हातांत कागदं कशाचा आणला आहेस? माझं कांहीं एखादें पत्र बित्र तुझ्या पत्त्यावर आलं आहे कीं काय?"

"छे" मी मनांत चपापून ह्मणालों. "तुझं पत्र कुठलं आलं आहे. तुझं असतं तर लागलीच तें तुला देऊन नसतं कां टाकलं? आणखी तुझं पत्र माझ्याकडे येण्याचा संभव तरी आहे कां?"

"तसं नाहीं रे," मनुभाई हंसून ह्मणाला. "तूं पेटलादहून निघालास तेव्हां तूं मुंबईला जातो आहेस असं पाहून माझ्या बाबांनीं मला देण्यासाठीं ह्मणून जर एखादं पत्र दिलं असलं तर तें कदाचित् विसरून तुझ्याजवळ तसंच राहिलं असेल; दुसरं काय?"

"छे, तसं मुळींच नाहीं." त्याची खात्री व्हावी; पत्राबद्दल त्याच्या मनांत शंका राहूं नये ह्मणून मी गंभीरपणाचा आव घालून लागलीच त्याला ह्मणालों.

हें ऐकतांच पत्रांतील थोडा तरी मजकूर त्याच्या दृष्टीस पडला असावा. व सर्व पत्र वाचायला मिळावें अशी इच्छा मनांत उत्पन्न झाल्याचें त्याच्या मुद्रेवरून मला वाटूं लागलें आणि आतां विनाकारण आढेवेढे न घेतां कांहीं तरी बाहणा करून आपण होऊनच पत्र त्याला दाखवावें ह्मणजे त्याच्याकडून आपल्याला जी कांहीं माहिती काढून घ्यावयाची आहे ती आपल्याला सहजच मिळेल अशी युक्ती मनांत आणून मी मोठ्यानें हंसलों, व विस्मययुक्त दृष्टीनें त्याच्याकडे पाहून ह्मणालों ' मनुभाई, या पत्राशीं आपल्यापैकीं कोणाचाच संबंध नाहीं. तें सहज माझ्या हातीं आलें. आणखी वाचून पाहिलें तों तें मोठें मौजेचें वाटल्यावरून तुला तें दाखवावें ह्मणून तुझ्याकडे घेऊन आलों. ”

याप्रमाणें मनुभाईला कांहीं तरी खोटें सांगून तें पत्र मीं त्याच्या हातीं दिलें. त्यानें पत्रामधील मजकुरावर आपली नजर फिरविली, व किंचित् आश्चर्ययुक्त मुद्रा करून तो उद्गारला ! ' अरे, पण हें पत्र तुझ्या हातीं आलं याचं मला आश्चर्य वाटतं ! '

' त्यांत आश्चर्य कसलं ? कांहीं तरी चुकीनच तें माझ्याकडे आलं असलं पाहिजे ! '

' ह्मणजे ? '

" ह्मणजे काय " ? माझ्याबद्दल त्याला संशय येऊं नये ह्मणून मी मुद्दाम पत्राबद्दलची कांहीं तरी खोटी हकीकत सांगूं लागलों " आमच्या नंदशंकरशेटजींच्या एका गड्याजवळ हें पत्र पिरोजला देण्यासाठीं ह्मणून आज सकाळीं एका पारशी तरुणीनें आणून दिलें. पाकीट बंद केलेलं असलं तरी त्यावर कोणाचंच नांव लिहिलं नव्हतं; आणखी आमच्या शेटजींच्या गड्यानं मी बाहेर येण्यासाठीं निघालों तेव्हां तें माझ्यापाशीं आणून दिलं. ह्मणून मीं सहजच तें फोडून वाचलं ! "

" पण असं परक्या माणसाचं पत्र वाचणं आपल्याला कांहीं बोवा पसंत नाहीं ! " तिरस्कारयुक्त आवाजानें मनुभाई ह्मणाला.

" तूं ह्मणतोस तें खरं; पण यामध्यें माझा मुळींच अपराध नाहीं. तें पत्र दुसऱ्याचं आहे असं जर मला समजतं तर मीरे कशाला वाचायला

बसलों असतो. माझा काय त्यांत संबंध आहे ? कोण फिरोज, आणखी कोण ती शिरीन ! मला रे त्यांच्यांशीं काय करायचं आहे ? पण आपलं सहज असलं पत्र वाचायला मिळालं तेव्हां म्हटलं काय मजा आहे ती तर पाहूं अनायासें आपल्या दृष्टीस पडली तर !" असें बोलून मी थोडा वेळ थांबलों व पत्राबद्दल आतां त्याच्या मनांत शंका उरली नसेल असें वाटून पुढें म्हणालों " कोण रे हा फिरोज ? तुमच्या याच कॉलेजांतला कोणी विद्यार्थी आहे वाटतं ! "

" असेल कोणी तरी झालं, मला तरी काय करायचं आहे त्याच्याशीं; आणखी तुझं तरी काय अडलं आहे त्याच्यावांचून ! "

" अडायचं कसलं रे त्यांत, पण आपलं सहज विचारलं तुला. तो कोणी तरी मोठ्या श्रीमंताचा मुलगा असला पाहिजे विद्यार्थी दशेंत असले ढंग करायला ! "

" कां ! गरीब असला तर त्याला असं करतां येत नाहीं कीं काय ? " माझ्या तोंडाकडे एकसारखी टक लावून पहात तो म्हणाला.

मी त्याच्याकडे न पाहतां आपली नजर चटकन एका बाजूला वळविली; तरी पण येथें कांहीं तरी पाणी मुरतें आहे असें माझ्या चर्येवरून त्याला वाटलें असावें; कारण मी बोलत नाहीं असें पाहून तो मुद्दामच आपली दृष्टी माझ्या तोंडाकडे फिरवून पुढें म्हणाला " तुझ्यासारखा अविचारी तरुण तर असल्या गोष्टींच्या नादीं सहज लागायचा. पण असलीं तंत्रें मोठीं कठीण, भयंकर असतात. त्यांचा परिणाम पुष्कळ वेळां फार वाईट होत असतो हें त्यांना कळत नाहीं ! "

हें वाक्य वास्तविक त्यानें माझी कांहीं तरी थट्टा करण्याच्या हेतूनेंच उच्चारलें होतें; व शिरीनच्या नादीं लागण्याचा अपराध जर माझ्या हातून घडला नसता तर मला त्याच्या बोलण्याचें कांहीं वाटण्याचें देखील कारण नव्हतें; पण हा आपली चेष्टा करीत आहे हें त्यावेळीं माझ्या ध्यानांत आलें नाहीं; व मी मुद्दामच रागाचा आविर्भाव आणून म्हणालों ' काय या पत्राशीं माझा कांहीं संबंध असेल असें तुला वाटतें कीं काय ? "

' मी नुसतें तुझ्यासारखे तरुण असें म्हणालों म्हणजे त्यावरून मी तुझ्याबद्दलच कांहीं म्हणालों असं रे कां तुला वाटावं ? '

" अरे मला काय त्याबद्दल वाटायचं आहे ! " मी गंभीरपणानें उद्गारलों. " पण हा पिरोज एकंदरीनें मोठा चमत्कारीक माणूस असला पाहिजे असं नाहीं कां तुला वाटत ? अरे, दुसऱ्याच्या मुलीला आपल्या नादीं लावून या कॉलेजसारख्या ठिकाणीं तिला भेटायला बोलवायचं ह्मणजे केवढं धाडस, केवढा अविचार ! मला तर वाटतं हा पिरोज या मुंबईमधलाच राहणारा असला पाहिजे ! "

' कुठला कां असेना. तुला काय करायचं आहे त्याचं ? '

" असें नव्हे रे ! त्या पारशी तरुणीनें हें पत्र आमच्या नंदशंकरशेटजींच्या गड्याजवळ दिलें तेव्हां ' पिरोजशेट कालरात्रीं तुझ्या शेटजीकडे आले असल्याचं मला कळलं आहे' असें ती म्हणाली. या पत्राच्या पाकिटावर कोणाचंच नांव नव्हतं; आणखी हें काय प्रकरण आहे तें मला माहीत असेल असं समजून गड्यानं हें पत्र माझ्याजवळ दिलं. तेव्हां नंदशंकरशेटजीकडे या भानगडीचा कांहीं संबंध येऊं नये ह्मणून त्या पिरोजची चवकशी करावी व हें पत्र एका पाकिटांत बंद करून त्याला द्यावं असं मला वाटतं. पण असलं पत्र भलत्याच माणसाच्या हातीं जाऊं नये म्हणून तर पिरोजची बरोबर माहिती लागली पाहिजे. "

अशा प्रकारचें माझें बोलणें ऐकून त्याच्या मनांत मजबद्दल आलेली शंका क्षणमात्र दूर झाली असावी असें मीं ठरविलें. कारण तो ह्मणाला ' असंच असलं तर पिरोजची चवकशी करणं हें ठीक आहे. पण मी ह्मणतों कीं, आपल्याला या भानगडींत पडून काय करायचं आहे ? तो कोणी कां असेना ? ' त्याची समजूत बदलली आहे असें लक्षांत येतांच मला फार समाधान झालें; व आतां आपल्याला पाहिजे ती सर्व माहिती याच्याकडून आपण सहज काढून घेऊं अशी आशा माझ्या मनांत उत्पन्न होऊन मी ह्मणालों ' मला काय त्याच्याशीं करायचं आहे. हें पत्र माझ्या हातीं लागलं नसतं तर मीं रे कशाला या भानगडींत पडलों असतों ! पण असल्या प्रकारचं पत्र वेळेवरच ज्याचं त्याला पोंचविणं प्रत्येकाचं काम आहे असं मी समजतों. आणखी तें पत्र त्याला मिळालं ह्मणजे आपण सुटलों. तसं नसतं तर आतांच्या आतां हें काम झालं पाहिजे असं मी तुला सांगितलं नसतं; पण तूं वाचलाच आहेस पत्रांतला मजकूर आणखी

त्यावरून तुझ्या लक्षांतही पण आलेंच असेल कीं, ती शिरीन कां कोण ती—काय तिचं नांव असंच कायसं आहे नाहीं—त्याला भेटायला येण्या-पूर्वी हें पत्र त्याला मिळणं अवश्य आहे असं मला वाटतं ! ह्मणून मी तुला ह्मणतों कीं, पिरोज या नांवाचा कोणी पारशी विद्यार्थी तुझ्या या कॉलेजमध्यें आहे कीं नाहीं याचा लवकर तपास कर. "

' अरे, तूं ह्मणतोस खरं; पण लागलीच त्याचा तपास लागावा कसा ! आमच्या कॉलेजमध्यें कितीतरी पारशी विद्यार्थी आहेत; आणखी त्यांत पिरोज या नांवाची देखील कदाचित् एकापेक्षां अधिक मुलं असण्याचा संभव आहे. शिवाय आज कदाचित् तो तुझा पिरोज कॉलेजमध्यें आलेला नसला तर तो आतां कसा भेटायचा ? आणखी त्याला ओळ-खायचा तरी कसा ? '

' अरे, त्याला ओळखायला एक युक्ती आहे. हें पाहिलेंस कां पत्रांत त्या शिरीननं काय लिहिलं आहे तें ! "

असें ह्मणून, कालरात्रीं चोरांनीं मारल्यामुळें पिरोजच्या एका पायाला दुखापत झाली होती; व त्याच्या पायाबद्दल आपल्याला फार काळजी वाटत आहे अशा अर्थाचें शिरीननें पत्रात लिहिलेलें वाक्य मीं त्याला दाखविलें; व त्याचा लवकर तपास करून येण्याला मनुभाईला पुन्हा सांगितलें आणि त्याप्रमाणें लागलीच तो तेथून गेला. माझ्याजवळ अस-लेलें घड्याळ त्यावेळीं बरोबर नव्हतें; व कदाचित् तीन वाजण्याचा सुमार झाला असावा; आतां शिरीन आपल्याकडे येणार; पण या ठिकाणीं तिला भेटण्याची काय युक्ती करावी याबद्दल मी बराच वेळ विचार करीत होतों. मनुभाईशीं आपण बोलत असतांना कदाचित् तीन वाजण्याची वेळ होऊन शिरीन एकदम आली तर ती आपल्याला पाहतांच कांहीं तरी बोलल्याशिवाय कांहीं राहणार नाहीं, असें वाटूनच मनुभाईला मीं पिरोजचा तपास करण्यासाठीं ह्मणून पाठवून दिला; पण तो जातांना त्याच्या हातामधून शिरीनचें तें पत्र चटकन् घेण्याला मात्र मी विसरलों नाहीं.

या माझ्या एका युक्तीनें मला दोन गोष्टी साधावयाच्या होत्या; त्यापैकीं पहिली ह्मटली ह्मणजे कोणालाही शंका न येईल अशा रीतीनें

शिरीनला भेटणें ही होती; व ती साधण्यासाठींच मी मनुभाईला तेथून युक्तीप्रयुक्तीनें थोडावेळ घालविलें होतें. असें करण्यांत माझा उद्देश असा होता कीं, रस्त्यावर जाऊन आपण उभें रहावें व शिरीन दृष्टीस पडतांच एका भाड्याच्या गाडींत बसून दोघांनीं कोठें तरी हिंडायला ह्मणून जावें ह्मणजे कोणाचीही अडकाठी न येतां एकांतांत तिच्याशीं हवें तसें हितगुज करायला सापडेल. त्याचप्रमाणें दुसऱ्या व कदाचित् पहिली पेक्षाही अधिक महत्वाच्या अशा गोष्टीकडे नुकतेंच माझें लक्ष वेधलें होतें. शिरीनच्या पत्राच्या मागील अंगावर कांहीं मजकूर लिहिलेला होता, तो वाचून पाहण्याचें माझ्या किंवा मनभाईच्या ध्यानांत आलें नव्हतें. पण मनुभाई जवळ न मी तें पत्र घेऊन पुन्हा वाचूं लागलों. या वेळीं शिरीनच्या भेटीची वेळ तिनें कोणती लिहिली आहे अशाबद्दल पूर्वीप्रमाणें पुन्हा शंका येऊनच केवळ तिचें पत्र मी वाचण्यासाठीं आपल्यापुढें धरिलें. पुढील बाजूवर लिहिलेला मजकूर या वेळीं मी वाचिला; व ती बरोबर तीन वाजतां आपल्याला भेटायला येणार असें मनांतल्या मनांत मी दहा पांच वेळां घोंकिलें. पायाला दुखापत झाल्यामुळें तिला त्याबद्दल फार काळजी वाटत आहे व ती तेवढ्यासाठीं पिरोजच्या ( अर्थात् माझ्या स्वतःच्या ) इतक्यांत समाचाराला येणार ही कल्पना मनांत येऊन मला माझ्या ठिकाणीं असलेल्या शिरीनच्या प्रेमाबद्दल अतीशयच आनंद वाटूं लागला ! पण तिच्या पत्राच्या मागील बाजूवरचा मजकूर माझ्या दृष्टीस पडतांच आतां आपला आजच्याआज याच ठिकाणीं घात होणार अशी एकाएकीं भीति वाटूं लागली ! “ हा काय चमत्कार आहे बोवा ? ” मी त्या पत्राच्या मागील बाजूवरील मजकूर वाचून आपल्याशीं ह्मणालों. “ काय ? शिरीन काय लिहिते ? काल संध्याकाळपासून आपण पिरोज आहों असें भासवून कोणी तरी एक लबाड मनुष्य आपल्या दृष्टीस पडला तर त्याची चांगली खोड मोडल्याशिवाय मात्र तूं राहूं नको. कालरात्रीं आपण बंदरावरून निघालों तेव्हांपासून कसा मेला तो मधून मधून लुडबुडत असतो पाहिलास ना ! ”

हा मजकूर मी मनांत वाचला खरा. पण शिरीननें तो मला उद्देशून लिहिला आहे कीं खऱ्या पिरोजला उद्देशून लिहिला आहे हें कांहीं

केल्या ह्मणून माझ्या ध्यानांत येईना ! एकदां असें वाटे कीं, तो पिरोज आज कॉलेजमध्यें आला आहे असें मनुभाईनें येऊन सांगितलें कीं, इकडे शिरीन दृष्टीस पडल्याबरोबर तिची व पिरोजची गांठ पडण्यापूर्वी तिला गाडींत बसवून आपण तिच्याबरोबर हिंडायला जावें व " त्या लबाड मनुष्याच्या लंगडा झालेल्या त्या पिरोजच्या आतां नादीं लागूं नको ह्मणजे त्याची फ्याद मी नाहींशी केलीच असं तूं समज ! " पण लागलीच असा विचार मनांत येई कीं, इतकं करण्यापेक्षां चट्कन् आपण आपल्या बिऱ्हाडीं जाऊन बसावं; नाहींतर आजच्या आज आपल्या पेट्लादलाच निघून जावं ह्मणजे यापुढें विनाकारण ही भानगडच नको आपल्याला ! छे. असें केल्यावर मग त्यांत काय राहिलें ? काल संध्याकाळपासून शिरीनसाठीं आपण जो इतका त्रास सोसला तो कशासाठीं ! आणखीं असं केलें तर शिरीनसारखी लावण्यसंपन्न तरुणी आपल्याला मिळण्याची आशाच नको ! छे, तें कांहीं नाहीं; वाटेल तें झालं तरी बेहेत्तर; पण शिरीनला ह्मणून आतां हातची जाऊं द्यायची नाहीं !

असा निश्चय ठरवून मी शिरीनची वाट पहात रस्त्यावर इकडून तिकडे हेलपाटे घालीत राहिलों. तीन वाजून तर नसतीलना गेले, आणखी कदाचित् आपल्याला कॉलेजच्या बाहेर येण्यालाच उशीर नसेलना झाला ! न जाणो आपण बाहेरच्या बाजूला कोठें दिसत नाहीं असं पाहून शिरीन कॉलेजमध्यें येऊन सर्वांसमक्ष आपली भेट घेण्याला लाजल्यामुळें कदाचित् ती दाराशीं येऊन तशीच परत गेली असेल ! अशी शंका मनांत येऊन मीं रस्त्याकडे आपली पाठ फिरविली; व कॉलेजच्या बाहेरच्या बाजूला उभा राहिलों तोंच मागल्या बाजूनें कोणी तरी इसम येऊन त्यानें आपल्या खांद्यावर हात ठेविला आहे असा मला भास झाला.

हा इसम कोण असावा असें वाटून मीं बराच भ्यालों; कारण मनुभाईवांचून माझ्याशीं इतक्या सलगीनें वागणारा असा दुसरा कोणताच मनुष्य साऱ्या मुंबईंत देखील कांहीं माझ्या ओळखीचा नव्हता. पण मनुभाई कालेजमधून बाहेर आला असेल ह्मणून ह्मणावें तर तो आपल्या पुढच्या बाजूनंच येणार ! मग हें असावं तरी कोण ! हा पिरोजच तर नसेल ना आपल्याला मारायला आला ! छे, पण भरदिवसा सर्वांच्या देखत

आपल्याला मारण्याची त्याची काय छाती आहे ! सारांश, भीतीनें झणा कीं पहाटे घेतलेल्या मदिरेच्या धुंदीनें झणा—पण मदिरेनें असें झालें नसेलसें मला वाटतें —एकाएकीं माझ्या डोळ्यापुढें सरासरी एक मिनिट-भर अंधेरी आल्यासारखें मला वाटून तेवढ्या वेळांत कित्येक कल्पना मनांत आल्या ! आपलें तोंड मागें न फिरवितां मी होतों तसाच एक मिनिटभर उभा राहिलों !

---

# प्रसंग ९ वा.

माझ्या खांद्यावर हात ठेविलेल्या इसमानें मी त्याच्याकडे वळून पाह-ण्यापूर्वींच अगदीं हलक्या आवाजानें माझ्या कानांत कांहींतरी सांगित-ल्याचा भास मला झाला ! ' काय, ' मी आपल्याशींच पुटपुटलों, ' शिरीन आतां इकडे यावयाची होती; पण तिच्या आईबरोबर नुकतीच ती बाहेर गेल्यामुळें तिला परत यायला निदान पंधरा वीस मिनीटें उशीर होईल. ' हो इतकेच शब्द त्या माणसानें आपल्या कानांत सांगितले. शिरीनची आठवण होतांच मी मागें वळून पाहूं लागलों तों एक गुजराथी स्त्री व एक लंगडत चालणारा पारशी तरुण जवळच उभ्या असलेल्या एका व्हिक्टोरियांत बसतांना माझ्या दृष्टीस पडले व ती व्हिक्टोरिआ मी उभा होतों त्याच्या डाव्या बाजूकडे जाणाऱ्या रस्त्यानें पाहतां पाहतां तेव्हांच निघून गेली !

या गोष्टीचा माझ्या मनावर फारच विलक्षण परिणाम झाला ! इतकावेळ शिरीनची वाट पाहून शेवटीं कांहीं उपयोग नाहीं तो नाहींच. पण झालें हें एका अर्थी बेष झालें; कारण यावेळीं जरी शिरीन भेटली नाहीं तरी निदान आपल्यावर आलेलें संकट तरी टळलें ! शिरीनला भेटण्याच्या नादांत कदाचित् कांहीं तरी दगा फटका होण्याचा संभव होता तो टळला हें तरी काय थोडें झालें ! आणखी त्यांतल्या त्यांत दुसरी गोष्ट अशी कीं, आपल्या इच्छेप्रमाणें अगदीं निर्धास्त रीतीनें जरी शिरीनची व आपली येथें रस्त्यावर गांठ पडली असती तरी

तिच्याशीं बोलतांना आपल्याला जर कदाचित् मनुभाईनं पाहिलं असतं तर तेंही कांहीं चांगलं झालं नसतं. तेव्हां एकंदरीनं झालं हें एकप्रकारें ठीकच झालं असं मी आपल्या मनाचं समाधान करून आतां शिरीन आपल्याला पुन्हा कशी आणखी कोठें भेटणार असा विचार करीत होतों; व नुकतीच पाहिलेली गाडी तेथून निघून जातांच अंगांत खाकी कपडे घातलेला एक शिपाई गाडी ज्या रस्त्यानें गेली त्याच रस्त्यानें धांवत धांवत माझ्याजवळ आला आणि त्याच्यापाशीं असलेलें एक पत्र चटकन् माझ्या हातीं देऊन तेथें एक मिनीटभरही न थांबतां मोठ्या गर्दीनें तो निघून गेला. तो शिपाई माझ्या समोरून आल्यामुळें मी त्याला तेव्हांच ओळखलें; व शिरीनबाई पुन्हा केव्हां आणखी कोठें भेटतील असं तो परत जाऊं लागतांच त्याला विचारण्याचा माझा बेत होता; पण मी "पिराजी" म्हणून त्याला हांक मारणार तोंच तो गर्दीनें धांवत डाव्या बाजूच्या रस्त्यानें गेल्यामुळें तेव्हांच दिसेनासाही झाला !

आतां मात्र एकाएकीं माझें मन बरेंच अस्वस्थ, उदासीन, निराश होऊन गेल्याचें मला वाटूं लागलें ! पिराजी आपल्याजवळ येऊन देखील कांहींच बोलला नाहीं—शिरीनबद्दल माझें मन इतकें उतावीळ झालें असतांना त्यानें आपल्याला तिजबद्दल कांहींच सांगितलें नाहीं. याबद्दल मला वाईट वाटलें. कारण शिरीन बरोबर बहुतकरून नहमीं असणारा हा पिराजी ज्याअर्थी परत आला आहे त्याअर्थी शिरीनही पण आपल्या आईबरोबर बाहेर गेली असली तरी ती केव्हांच पिराजी बरोबरच परत आली असली पाहिजे. आणखी आज साडेतीन होऊन गेले ( असें मला वाटत होत.) तरी तिनें आपल्या पाठविलेल्या—आपल्याला पांचच मिनिटापूर्वी कळलेल्या—निरोपावरून पाहिलें तर ती याच्या अगोदरच येथं यावयाला पाहिजे होती, असें तो लंगडा पारशी गाडींत बसून गेलेला दृष्टीस पडतांच पुन्हा मला वाटूं लागलें होतें ! आतां तिच्या निरोपाप्रमाणें तीन वाजून पंधरा वीस मिनिटेंच काय, पण अर्धातास सुद्धां होऊन गेला असेल; आणखी या वेळीं ती येथें यावयाला पाहिजे होती. पण तीही आली नाहीं, आणखी त्या पिराजीनेंही पण तिच्याबद्दल आपल्याला कांहींच सांगितलं नाहीं याबद्दल मला राग आला ! कारण पिराजीनें नुकत्याच आणून

दिलेल्या पत्रांत-हें मी अद्याप वाचलें नव्हतें—याच गोष्टीचा कांहीं तरी उल्लेख असेल असें माझ्या लवकर ध्यानांत आलें नाहीं !

पण थोड्याच वेळांत तें पत्र मी वांचून पाहिलें; आणि त्याची घडी करून तें चटकन खिशांत घालीत असतांना माझ्या मागच्या अंगाला कोणीतरी मोठ्यानें हंसल्याचा मला भास झाला ! ह्मणून मी मागें वळून पाहिलें तों मनुभाई माझ्या शेजारीं उभा असल्याचें मला दिसून आलें ! मला पाहिल्याबरोबर तो अधिकच हंसूं लागला; ह्मणून त्या गोष्टीचें मला अतीशय आश्चर्य वाटून मी त्याला विचारलें " मनुभाई, एकाएकीं इतकं हंसण्याचं रे कारण काय ? "

" अजूनही त्याचें हंसणें न आंवरतां त्यानें उत्तर केलें " अरे, कारण कसलं त्यांत आलं आहे. काल संध्याकाळपासून तुझ्या अंगावर हे पारशी तऱ्हेचं कपडे पाहून मला फार आश्चर्य वाटत आहे ! मी तुला यापूर्वी कधीं पाटलोण, नेकटाय, कॉलर वगैरे घालतांना पाहिलं नव्हतं ह्मणून तुझं हें सोंग दृष्टीस पडतांच मला हंसूं आवरेना ! " कारण हा कोण पारशी गृहस्थ आपल्याकडे आला बोवा, असा वरचेवर मला भास होत आहे. मी कालच तुला विचारणार होतों; पण आपण फेटमध्यें हिंडत असतांना तूं एकाएकीं कोठें दिसेनासा झालास ! मी पुष्कळ तुझी वाट पाहून मग परत आलों ! "

" तुझं हें आपलं कांहीं तरीच ह्मणणं आहे झालं ! मी मुंबईत आल्यापासून माझा याच प्रकारचा पेहराव असतो " खरें ह्मटलें ह्मणजे मी त्याला हें कांहीं तरी उडवाउडवीचें उत्तर दिलें होतें; कारण मी जातीचा कपोळवाणी असल्यामुळं आमच्यामध्यें पारशी तऱ्हेची टोपी घालण्याची वहिवाट आहे; व आमच्या जातींतील बहुतेक लोक असल्याच टोप्या-( पागोटीं हीं मुळचीं आमचीं पागोटीं असून पारशी लोक गुजराथेंत आल्यापासून ते असलीं पागोटीं घालूं लागले आहेत ) घालीत असतात. त्याचप्रमाणें कांहीं शिकले सवरलेले लोक बूट, पाटलोण, नेकटाय, कॉलर वगैरे घालीत असतात; पण मी खेडवळ; पागोट्याशिवाय त्यावेळीं माझ्या अंगावर जो पोषाख होता तसल्या तऱ्हेचा पेहराव मीं कधींही घातलेला नव्हता; निदान मनुभाईच्या पाहण्यांत तसें आलें नव्हतें हें कांहीं खोटें

नाहीं. मुंबईत येऊन मला चार पांच दिवस झाले होते; काळपर्यंत मी कोठेंही गेलों तरी धोतर नेसून व नेहमींच्या पद्धतीचा पोषाख करूनच जात असे. पण काल तिसऱ्या प्रहरीं मला काय वाटलें असेल तें वाटो, कित्येक लोकांचे पेहराव पाहून मी पाटलोण, नेकटाय, कॉलर वगैरे विकत घेतली; व संध्याकाळीं तशा प्रकारचा पोषाख करून फेट पाहण्यासाठीं गेलों. तूं अगदीं हुबेहुब पारशासारखा दिसतोस अशा अर्थाचें मनुभाई जें कांहीं मला ह्मणाला तें अगदीं खरं होतें. कारण गेल्या रात्रीं पिरोजला पाहतांच याचा चेहेरा हुबेहुब आपल्यासारखाच आहे असें मला वाटलें; आणि पिरोजशीं माझें बरेंच साम्य असल्यामुळेंच शिरीन आपल्याला पाहतांच फसून आपल्या नादीं लागली. ही गोष्ट माझ्या ध्यानांत येतांच मला स्वतःबद्दल, माझ्या त्या पोषाखाबद्दल मोठं कौतुक वाटलें; आणि ज्याअर्थी या पोषाखाच्या सहाय्यानें शिरीन-सारख्या अप्रतिम सौंदर्याच्या तरुणीला आपण भुरळ घातली त्याअर्थी आपण मुंबईत आहों तोंपर्यंत तरी निदान असलाच पोषाख घालावयाचा असें मीं ठरविलें,

मनुभाईचा चेहरा त्यावेळीं कांहीं निराळयाच प्रकारचा दिसल्यावरून त्यानं सांगितलेलें कारण खरें नाहीं अशी मला शंका आली व मी त्याला ह्मणालों " तूं ह्मणतोस तसं जरी असलं तरी येवढ्यावरून ह्मणजे तुला इतकं हसूं यावं असं मला कांहीं वाटत नाहीं आणखी तूं ह्मणतोस तें खरं असतं तर कांहीं वेळापूर्वीं जेव्हां तूं मला पाहिलंस तेव्हांच तूं हंसला असतास. "

' तसं नव्हे रे, ' माझी थट्टा करण्याच्या हेतूनें त्यानें उत्तर दिलें, " या पोषाखानें तूं अगदीं हुबेहुब पारशासारखा—मघाशीं त्या बाजूला जो एक लंगडा पारशी दिसत होता त्याच्यासारखा—तूं दिसतोस हें जरी खरं आहे तरी हा पोषाख तुला चमत्कारिक दिसतो असं मला वाटतं. आणखी मला जें यवढं हंसूं आलं तें तरी दुसरं कशानं ? "

" तसं असेल ह्मण; कारण अमका पोषाख आमक्या माणसाला शोभतो किंवा न शोभतो असं वाटणं हें केवळ डोळयांच्या संवयीवर अवलंबून आहे असं मी समजतों. माझ्या अंगावरचा हा पेहेराव तुला चमत्कारिक दिसत असेल; पण हाच पोषाख मी नेहमीं घातलेला पाहण्याची तुझ्या

डोळयाला एकदां सवय झाली ह्मणजे आजच्या इतकं आश्चर्य वाटणार नाहीं. ”

“ तूं ह्मणतोस तें तसं असेल, त्याबद्दल माझं ह्मणणं नाहीं. पण कोण-त्याही प्रकारचा पोषाख घालतांना, आपण एक अमक्या मनुष्यासारखं दिसावं असं त्या माणसाला वाटत असतं; नाहीं ? ”

हें त्याचें मार्मिकपणाचें वाक्य मीं ऐकलें, तरी पण त्यांतली खुबी कांहीं माझ्या लक्षांत आली नाहीं; व मी चटकन् ह्मणालों “ हो तसं कांहीं तरी वाटत असल्याशिवाय आपला नेहमींचा पूर्वींचा पोषाख टाकून दुसऱ्या एखाद्या विशेष प्रकारच्या पोषाखाची हौस मनुष्याला वाटायचं तरी काय कारण ! ” इतकें मी बोलून गेलों; पण लागलींच माझी चूक माझ्या लक्षांत येतांच मी आपला ओंठ चावला; व हें सोंग आणण्यामध्यें आपला काय हेतू आहे हं याला समजलं कीं काय असं वाटून मी पुढं ह्मणालों “ तसं जरी असलं तरी सध्यां माझ्या अंगावर दिसत असलेला पोषाख मी अमक्या एका हेतूनं केला आहे असं नाहीं. मी पडलों गांवढ्या, असला पोषाख, ही छानछकी, ही ऐट, आमच्या गांवढ्यांत आह्मांला कुठली मिळायला; तेव्हां ह्मटलं सहज आपण मुंबईंत आलोंच आहों; पाहूं यामध्यें तरी काय मजा असते ती ! ”

“ हं तें माझ्या केव्हांच ध्यानांत आलं ! पुन्हा हंसून व डोळे मिच-कावून तो ह्मणाला. “ पण आतां या रस्त्यावर आणखी किती वेळ असंच उभं राहण्याचा तुझा विचार आहे ? ”

“ अरे, माझ्या ओळखीचा एक इसम इकडे यायचा आहे; ह्मणून त्याची मघापासून मी एकसारखा वाट पाहतों आहे; पण अजून देखील कांहीं तो कुठं या बाजूला दिसत नाहीं. ”

“ इकडे तो अमक्या वेळेला येणार असं ठरलं असलं, आणखी तो खास येणारच असं तुला ठाऊक असलं तर त्याची वाट पाहण्याचा उप-योग ! मी तर कांहीं बुवा, कोणाचीही वाट पहात रस्त्यावर इतक्या उन्हांत कधीं उभा राहिलों नसतों. बरं पण त्या तुझ्या माणसाकडून कांहीं निरोपबिरोप तरी आला कां ? नाहींतर त्याची वाट पहात तूं असा वेड्यासारखा किती वेळ उभा राहणार ! बरं असा तुझा तो

माणूस तरी कोण आहे; आणखी त्याच्याशीं तुझं असं काम तरी काय आहे. तसंच कांहीं महत्वाचं काम असलं तर गोष्ट निराळी. ”

“ माझं · · · काम · · होय ? किंचित् अडखळत मी ह्मणालों. हो · · तसंच कांहीं असल्याशिवाय कां मी इतकावेळ रस्त्यावर उभा राहिलों असतो ! ”

“ तुझं काय काम आहे असें मी तुला विचारणार होतों, ” तो माझ्याकडे न्याहाळून पाहतांना पुन्हा हंसत ह्मणाला. “ पण · · तुझं काम जरा गुप्त, नाजुक असावसं दिसतं · · कां माझा अजमास बरोबर आहे कीं नाहीं ? ”

त्याचा हा खुबीदार प्रश्न ऐकून मी गोंधळून गेलों. त्याला आतां काय उत्तर द्यावें हें मला सुचेना ह्मणून संभाषणाचा विषय बदलण्याच्या हेतूनें त्याला विचारलें, “ कां मग लागला कां त्या फिरोजचा कांहीं तपास ? कुठून बुवा हें नसतं लचांड माझ्या मागं आज लागलं कोणाला ठाऊक. ”

“ लचांड तर खरंच ” तो गंभीरपणानें ह्मणाला. “ पण तुला मनापासून तर तसं वाटत नाहीं ना ! तसं वाटत असतं तर तूं त्याच्या नादींच लागला नसतास ! ”

“ पण यामध्यें माझ्याकडे रे काय अपराध आहे ? ”

“ काय असेल तो तुझा तुला ठाऊक ! पण एकंदरीनं राजेश्री आज आपण कुठल्या तरी भानगडींत सांपडला आहां यामध्यें मात्र मुळींच शंका नाहीं ! तुझ्या चर्येवरच तसं दिसतं आहे त्याला काय उपाय ! ”

“ काय मी····आणखी····भानगडींत ! ” जसें कांहीं आपण त्या गांवचेंच नाहीं असें त्याला भासविण्याच्या हेतूनें मी आश्चर्यचकित झाल्यासारखें करून ह्मणालों “ छे, तुला आपली भलतीच कांहीं तरी शंका आली आहे झालं ! माझ्या गांवढ्या माणसाचा या मुंबईशहरांतल्या कोणत्या भानगडीशीं संबंध असणार ! ”

माझे अशा प्रकारचे उद्गार ऐकून तो पुन्हा माझ्याकडे एकसारखा पहात स्तब्ध उभा राहिला. आपलें एकंदर बर्म त्याला कळलें असावें असें त्याच्या मुद्रेवरून आतां माझ्या स्पष्टपणें ध्यानांत आलें; पण त्याला ही गोष्ट कशी कळली असावी याचा मी विचार करूं लागलों; व आतां

तेथून कोठें तरी जावें असें मनांत आणून मीं त्याचा हात आपल्या हातांत धरिला आणि ह्मणालों " मनुभाई, काल रात्रींपासून मला अगदीं चैन पडेनासं होऊन गेलं आहे, ह्मणून आज दोन प्रहरीं मी जेवलों देखील नाहीं. कुठें तरी क्षणभर फिरायला जाऊन पहावं बरं वाटेल तर. असं मनांत आणून मी खरोखरी तुझ्याकडे यायला निघालों; पण मध्येंच हीं पत्राची भानगड निघाली; आणखी तितक्यांत माझा एक ओळखीचा माणूस अमक्या अमक्या ठिकाणीं अमुक वेळेला आपल्याला भेटणार आहे अशीही आठवण झाली. तें असो ह्मणा. पण त्या पिरोजचा कांहीं पत्ता नाहींना लागत. नसला कोणी त्या नांवचा मनुष्य तुमच्या कॉलेजमध्यें तर मी तें पत्र टाकतों फाडून ह्मणजे झालं ! आपण तरी काय करावं त्याला ! कोण बसतों आतां त्याला शोधीत; आणखी त्याचा तपास तरी लागायचा कसा ! जाऊं दे कीं, आपल्याला काय करायचं आहे त्या भानगडीशीं. " असें ह्मणून तें शिरीनचें मीं पत्र फाडून टाकिलें.

माझें बोलणें ऐकून तो सद्यतेनें ह्मणाला " खरोखरींच तुला सुचेनासं झाल्याचं ऐकून मला वाईट वाटतं. पण मुंबईशहरांतली मजा पाहण्यासाठीं तूं आलास आणखी कोणत्याही गोष्टीची तुला काळजी नसतां तुझं मन असं उदासीन कां बरं झालं असावं ? मला सांगायचं नसलं तर तूं पाहिजे तर सांगूं नको; पण मला तर वाटतं कीं, तुझं मन कसल्या तरी फिकीरींत पडलं आहे. "

" फिकीर कशाची ह्मणा; पण मला कांहीं सुचत नाहीं येवढं खरं. बरं काय रे, तूं त्या पिरोजची कांहीं चवकशी केलीस कीं, नाहीं ? "

" मी पुष्कळ तपास करून पाहिला, " पुन्हा त्यानें हंसत हंसत उत्तर केलें. " पण आज जितके विद्यार्थी कॉलेजमध्यें आले आहेत त्यांच्यामध्यें पिरोज या नांवाचा इसम कोणीच नाहीं. आतां तूं ह्मणतोस कीं, तो तुझा पिरोज लंगडा आहे; तेव्हां यावरून मात्र थोडी शंका येते. कारण आज एक वाजण्याच्या सुमाराला मी एका पारशी विद्यार्थ्याला लंगडतांना पाहिलं; आणखी थोड्या वेळांपूर्वी तो व्हिक्टोरियांत बसून या बाजूनें कुठेसा गेला; पण त्याचं नांव काय हें मात्र मला ठाऊक नाहीं. "

" बरं तर मी ह्मणतों कीं, तुला वेळ असला तर आपण गाडी करून फिरायला जाऊं. आतां सरासरीं तीन वाजून गेले असतील. आपण दोन तीन तास कोठून तरी फिरून येऊं, आणखी मग आपलं ठरलं आहे त्याप्रमाणं फेट पहायला जाऊं. "

" तें सारं होईल रे पण तूं आज जेवला नाहींस याची काय वाट ! "

" अं: त्याचं काय मोठसं. वाटेंत कुठें तरी एखाद्या चांगल्याशा दुकानांत जाऊन फराळ करूं ह्मणजे झालं. "

" बरं तर. "

असें बोलत बोलत आह्मी एका व्हिक्टोरियाजवळ गेलों; आणि ' हँगिंग-गार्डन ' असें गाडीवाल्याला सांगून आह्मी गाडींत बसलों व गाडी चालूं लागली. वाटेंत एका फराळाच्या दुकानापाशीं गाडी उभी करवून दोघांचा यथास्थित फराळ झाल्यावर पुन्हा गाडींत बसून निघालों; आणि कांहीं वेळानें हँगिंगगार्डनवर जाऊन पोंचलों. आह्मी गाडींत होतों तितक्या वेळांत माझ्या मनांतली गोष्ट काढून घेण्याचा मनुभाईनें पुष्कळ यत्न केला; आणि त्या गोष्टीचें त्याला खरें वर्म कळलें नसावें असें मीं समजत होतों. त्यानें अगदीं खोदून खोदून मला पुष्कळ प्रकारानें विचारून पाहिलें; पण शिरीनच्या पत्राशीं माझा काय संबंध होता, ही शिरीन कोण, कोठली, तिचें माझ्यावर आणि माझें तिच्यावर प्रेम कसें जडलें---इतकेंच नव्हे तर तिची आणि माझी ओळख केव्हां, कुठें, कशी झाली—हें देखील मीं त्याला समजूं दिलें नाहीं.

मेडिकल कॉलेजमधून आह्मी गाडींत बसून निघालों तेव्हांपासून आमच्या गाडीमागें दुसरी एक गाडी येत होती. फराळाच्या दुकानाशीं आमची गाडी उभी राहिली तेव्हां मात्र आमच्यामागें असलेली गाडी मध्येंच कोठें तरी दिसेनाशी झाली होती. पण आह्मी फराळ करून पुन्हा गाडींत बसून निघालों तेव्हां पुन्हा ती गाडी पूर्वीप्रमाणें आमच्या मागून येतांना मीं पाहिली; व हँगिंगगार्डनजवळ आमची गाडी उभी राहतांच आमच्या मागल्या बाजूला ती गाडी थांबली आणि तिच्यामधून दोन गुजराथी तरुण स्त्रिया खालीं उतरल्या. आमच्याप्रमाणें त्याही बागेंत इकडे तिकडे हिंडत होत्या. बरीच संध्याकाळ झाली तेव्हां आह्मी दोघे

एका बाकावर बसून इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलूं लागलों. तेव्हां त्या दोघी स्त्रिया आमच्या शेजारच्या बाकावर येऊन बसल्या. त्यांच्या दोघींच्या तोंडाकडे मी वरचेवर न्याहाळून पहात होतों; पण त्या माझ्या ओळखीच्या आहेत असें मला वाटलें नाहीं. खरोखरीं त्या दोघी स्त्रियांना मीं कांहा कधीं पाहिलें नव्हतें, तरी त्यांचा संवाद मधून मधून माझ्या कानावर पडत होता. त्यावरून त्यांच्या बोलण्याचा विषय मात्र आपल्या माहितीचा आहे अशी माझी खात्री झाली. कारण त्यापैकीं एक स्त्री सद्गदित अंतःकरणानें दुसरीला ह्मणाली, " खरंच बाई तिच्यावर प्रसंग तर मोटा कठीण आला आहे. तिच्या आईनें परवाच्याच दिवशीं तिच्यापाशीं एका अनाथ बाईला धर्म करण्यासाठीं ह्मणून पांचशें रुपये दिले होते. कुंवरबाईनीं ते आपल्या एका मैत्रिणीकड पोंचवायला सांगून ते तिला दिले होते; पण तिनं तसं न करितां ते रुपये आपल्या पिरोजच्या गरिबींत त्याला फार उपयोगीं पडतील असं वाटून त्याच्याकडे पाठविले; पण ते पिरोजच्या हातीं न पडतां मधल्या मध्येंच ते कोणी तरी लांबविले, असं कळतांच तिला फार वाईट वाटलं ! बर कुंवरबाईनां ही गोष्ट समजली नसती तरी एक बरं होतं; पण त्यांच्या घरच्या एका चोंबड्या मोलकरणीनं त्यांना हें सारं सांगून टाकलें ! तेव्हांपासून काय विचारतेस; तिच्या आईबापांनीं तिचे जे कांहीं हाल मांडले आहेत ते कांहीं पहावत नाहींत. "

" तिचं चुकलं त इथेंच ! " दुसरी स्त्री ह्मणाली. " अग पण खरी-खरी गोष्ट होती तर, पैसे चोरीला गेले होते तर, तसं तिनं आईला लाग-लीच कळविलें असतं तर, कुंवरबाई कांहीं कधीं रागावल्या नसत्या असं मला वाटतं. अग त्यांच्यासारख्या श्रीमंतांना त्या पांचशें रुपयांची कथा ती काय ? "

" तूं ह्मणतेस तें खरं आहे पण कुंवरबाई अगोदरच तिच्यावर अगदीं संतापून गेल्या आहेत; आणखी तिच्या हातून हे पैसे हरवल्याचं समजल्या-मुळें तर त्यांना पहिल्यानं आलेली शंका अधिक बळकट झाल्यासारखी झाली. "

" ह्मणजे ? " विस्मयसूचक आवाजानें दुसरीनें प्रश्न केला " कुंवर-

बाईच्या मनांत तिच्याबद्दल कांहीं शंका आली आहे कीं काय ? मला नाहीं बाई यातलं कांहीं कळलं. ”

“ अग दोन तीन दिवसांत तूं तिला भेटलीच नाहींस मग कळणार तरी कसं. ”

असें ह्मणून तिनें आपलें तोंड तिच्या कानापाशीं नेल्यासारखें केलें आणि किंचित् हलक्या आवाजानें ती कायसें बोलली. हें मला कांहीं चांगलेसें ऐकूं आलें नाहीं. कारण, यावेळीं अगोदरच ती हलक्या आवाजानें बोलत होती आणि त्यांतून मनुभाई पुन्हा मला त्याबद्दल विचारूं लागला होता. पण त्याचें बोलणें मीं फारसें ध्यानांत न आणतां आपलें सर्व लक्ष तिच्या बोलण्याकडे लाविलें होतें; व ती काय सांगते हें आपल्याला कळलें तर फार बरें होईल असें वाटून तिचें बोलणें ऐकण्याविषयीं मी अतीशय उत्सुक होऊन गेलों होतों, तोंच दुसरी स्त्री उद्गारली “ अगबाई ! असले जिन्नस, आईला न विचारतां तिनं त्याला देऊन टाकलेन अं ! कोण तरी बाई हा तिचा वेडेपणा ! मग कुंवरबाई इतक्या रागावल्या त्यांत कांहीं नवल नाहीं. बरं पण ते जिन्नस मीं अमक्याला दिले आहेत असं तिनं कुंवरबाईजवळ अजून तरी कबूल केलंन् कीं नाहीं ? ”

“ अग, आपल्या वरूनच पहा ह्मणजे झालं ! अग तर असली नाजुक गोष्ट दुसऱ्याला कोणी तरी सांगेल कां ? तिनं आपलं नुसतं ‘ माझ्या हातून जिन्नस हरवले ’ असं सांगितलंन्. एकंदरीनं बिचारी मोठ्या संकटांत सांपडली आहे येवढं खरं ! ”

“ अग, आई इतकी रागावली आहे तर मग ते जिन्नस तिला परत नाहीं कां मिळायचे ? ते आणून तिनं आईला दाखविलेन् ह्मणजे झालं ! ”

“ हो तिनं तशी खटपट तर चालविली आहेन् खरी; आणखी ते जिन्नस, आणखी रुपये देखील आपल्याला मिळतील असं तिला वाटत आहे; मग पहावं काय होतं तें. ”

त्या दोघींचें सर्व संभाषण आपल्याला ऐकायला सांपडेल, त्या कोण आहेत हें आपल्याला कळेल तर बरें होईल असें मला होऊन गेलें होतें.

व त्या स्त्रिया जाईपर्यंत मी तेथून हाललोंही नसतो, नव्हे त्यांचा तपास, त्यांची ओळख करून घेतली असती; पण ' आतां परत गेलेंच पाहिजे ' असें मनुभाईनें दोन तीन वेळां मला सांगितल्यामुळें मी अगदीं निरुपायानें त्याच्याबरोबर परत फिरलो !

---

# प्रसंग १० वा.

हँगिंगगार्डन पाहून आह्मी निघाल्यावर वाटेनें येतांना " फॅन्सी फेट पहायला आज जायचें आहे कीं काय ? " असें मनुभाईनें मला विचारलें; पण शिरीनचें दुसरें पत्र माझ्या हातीं कोणीसें आणून दिल्यापासून मी कांहीं निराळ्याच फिकीरींत पडल्यामुळें, पुन्हा फॅन्सी फेट पहावयाला जाण्याचा वगैरे सर्व विचार मी आपल्या मनांतून काढून टाकले होते. ज्या नव्या विवंचनेनें माझें चित्त उद्विग्न केलें होतें तिच्यापुढें मला दुसरी कोणतीही गोष्ट सुचेनाशी झाली होती; व पत्र वाचून पाहिल्यापासून आतां या संकटाचें निवारण कसें करावें हा एकच विचार माझ्या मनांत एकसारखा घोळत होता. त्यामुळें फॅन्सी फेट पहावयाला जावयाचें नाहीं असें ठरवून त्याप्रमाणें मनुभाईला कळविलें; व तो आपल्या ठिकाणीं निघून गेला; पण जातांना तो माझ्यावर रागावल्यासारखें करून ह्मणाला " भगवानदास, तूं पाहिजे तसा बहाणा केलास तरी माझ्यापासून तूं इतका वेळ लपवून ठेविलेली गोष्ट मला कळली नाहीं असं मात्र समजूं नको. तुझा व माझा लहानपणापासून स्नेह असून तूं कोणतीही गुप्त गोष्ट—मग ती कशी का असेना—सांगणार नाहींस असं मला वाटलं नव्हतं ! तूं सध्यां कुठल्या तरी भानगडींत सांपडला आहेस ही गोष्ट आज दोन प्रहरीं, तूं त्या पिरोजचा शोध करण्यासाठीं ह्मणून जेव्हां माझ्याकडे आलास तेव्हापासूनच मला कळलेली आहे. पण मनांतला खरा हेतू मला कळूं न देतां तूं भलतेंच कांहीं तरी सोंग करून मला फसविण्याचा यत्न केलास हें कांहीं एकंदरीनं चागलं केलं नाहींस. तूं कोणत्या प्रसंगांत सांपडला आहेस हें जर मला सांगितलं असतंस तर तुला मीं पाहिजे ती मदत

केली असती ! इतकेंच नव्हे पण अजूनही मला तूं सर्व हकीकत अगदीं मोकळया मनानें सांगितलींस तर मी तुला संकटांतून सोडविण्यासाठीं हवे ते यत्न करीन; पण ज्याअर्थी माझ्याशीं अशी प्रतारणा करणं तुला बरं वाटतं त्याअर्थी तुझं काहीं जरी झालं, तूं मूर्खपणानें ज्या भलत्याच गोष्टीच्या नादीं लागला आहेस तिचा शेवट कितीही वाईट झाला—आणखी तो तसा झाल्यावांचून मात्र राहणार नाहीं असें मी तुला बजावून ठेवतों—तरी त्याला माझा काहीं उपाय नाहीं. असो; मर्जी तुझी ! आतां माझं मित्राचं कर्तव्य म्हणून मी तुला सांगून ठेवतों कीं, आज उद्यां, पुढें मागें केव्हांही जरी माझं सहाय्य पाहिजे असं तुला वाटलं तर तूं त्याप्रमाणं मला कळीव. थोडक्यांतच तुझ्यावर येणाऱ्या संकटाची इत्थंभूत हकीकत मला सांगायला तूं लाजूं नको किंवा कोणत्याही प्रकारचा संशय मनांत आणूं नको. म्हणजे माझ्याकडून होईल तेवढी मदत केल्याशिवाय मी राहणार नाहीं. बरं तर आतां मी जातों. पण पुन्हा तुला आणखी एकदां बजावून ठेवतों कीं असल्या प्रकारच्या नादीपणाचा, अविचाराचा परिणाम कधींही चांगला होत नाहीं. हें माझं म्हणणं लक्षांत आणून अजून देखील तूं आपले डोळे उघडलेस व तो नाद सोडून दिलास तरी चालण्यासारखं आहे. पण मी सांगतों तें न ऐकतां अदूरदर्शित्वानं तुझ्या मूर्खपणाची, उल्लूपणाची मजल यापुढें गेली म्हणजे मात्र तुला संकटाची इशारत मिळाली असूनही, शेवटीं आपल्या हातानं आपण आपला नाश करून घेतला असं तुला वाटल्यावांचून राहणार नाहीं. या उपर तुझी मर्जी ! ”

यावेळीं त्याला सर्व हकीकत स्पष्टरीतीनें कळवावी असें एकदां माझ्या मनांत आलें होतें; पण ‘ हा वेडा आहे, याला असल्या गोष्टी कशा कळणार ! म्हणेनाका सध्यां काय हवं तें. थोड्याच दिवसांत आपल्या मनाप्रमाणें सर्व कांहीं जमून आलं म्हणजे हाच मनुष्य आपलं वर्णन करूं लागेल ’ असें मीं ठरविलें आणि ‘ तूं हें आपलं भलतंच कांहीं तरी मला सांगतों आहेस झालं ’ असें मी त्याला म्हणणार होतों; पण त्याच्या बोलण्याला मी कांहींच जबाब दिला नाहीं असें पाहतांच तो लागलींच तेथून आपल्या ठिकाणाकडे झपाट्यानें निघून गेला; व मीही त्याच्या वेडेपणाबद्दल मनामध्यें त्याला नांवें ठेवीत नंदशंकरशेटजींच्या घरीं आलों !

मी करीत असलेली गोष्ट चांगली नाहीं असें मला एकट्या मनुभाईनेंच दोन तीन वेळां बजावून सांगितलें होतें असें नाहीं. माझें मलाही मधून मधून असेंच वाटत होतें, आणि मी शहाण्या माणसाप्रमाणें वागलों असतों तर चंद्रशंकरशेटजीकडे आलेल्या त्यांच्या एका स्नेहानें त्यांना जें काहीं सांगितलें त्यावरूनहा माझ्या मूर्खपणाबद्दलची चांगली कल्पना मला सहज येण्यासारखी होती; पण त्यावेळीं मला लागलेल्या नादानें—एका सुंदर तरुणीला वश करण्याच्या पापवासनेनें—मी अगदीं वेडावून गेलों होतों; माझी मति अगदीं भ्रष्ट होऊन गेली होती; आपण काय करीत आहों याचा पोंच भावी संकटाची इशारत मिळाली असूनही, मला राहिला नाहीं. अविचारानें एखादी भलतीच गोष्ट करण्याला प्रवृत्त होणारा मनष्य येरवीं कितीही शहणा असला तरी तेवढ्या वेळा पुरता त्याचा शहाणपणा, त्याची अक्कल, त्याचा दूरदर्शीपणा वगैरे सर्व गुण कचकामाचे होऊन जातात; पण अशा गोष्टी मनुष्याच्या अविचारानें घडत असल्या तरी त्यात्यावेळीं तशी तशी बुद्धि झाल्याखेरीज मात्र असें होत नाहीं. विपत्तिकाळ आला ह्मणजे शहाणे लोकही फसत असतात; मोठमोठ्या कर्त्या पुरुषांची अक्कल गुंग होऊन जाते; ज्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेपुढं प्रत्यक्ष लक्ष्मीही केवळ हात जोडून उभी असावयाची त्याना वेळेला पोटाला मिळण्याचीही पंचाईत पडते, असें क्षणभर वाटतें; पण सूक्ष्म दृष्टीनें विचार केला तर विपरीत अशा सर्व प्रकारच्या गोष्टी अविचारामुळेंच घडून येतात असें ह्मणावें लागतें; कारण सहसा कधींही न फसणारे शहाणे लोक, कसल्याही संकटातून निभावून जाणारे कर्ते पुरुष, आणि लक्ष्मीला आपल्या केवळ लीलेनें नांचविणारीं बुद्धिवान् विद्वान् माणसें जगांत ज्याअर्थीं आपल्याला दृष्टीस पडतात त्याअर्थीं मनुष्याच्या विचाराकडे, दीर्घदर्शित्वाकडे बरेंच कर्तृत्व द्यावें लागतें; व ज्याअर्थीं विपत्तिकाल केव्हां येणार हें कळणें दुरापास्त आहे त्याअर्थीं कोणतेंही कार्य योग्य विचारानें करणें हें शहाण्या माणसाचें, किंबहुना प्रत्येक माणसाचें कर्तव्य आहे असें समजलें पाहिजे.

पण हे विचार त्यावेळीं मला सुचले नाहींत! फिरोजबद्दलची भीती कितपत टिकणारी आहे; याचा अजमास लागावा ह्मणून त्याच्या संबंधाची

माहिती मोठ्या धूर्तपणानें मिळविण्यासाठीं, व शिरीनला फसविण्याच्या कामीं आपण पिरोज ह्मणून आणलेलें सोंग आपली व तिची भरदिवसां गांठ पडण्याचा प्रसंग आल्यामुळें उघडकीला येऊन आपला फजीति होते कीं काय हें पाहण्यासाठीं मी मनुभाईकडे गेलों होतो. पिरोजबद्दलच्या संकटाला आपणच तोंड देऊन युक्तीप्रयुक्तीनें तें नाहींसें करावयाचें व आपला निरुपायच झाला तर मात्र मनुभाईला आपल्या मूर्खपणाचा सर्व वृत्तांत निवेदन करून त्याची मदत घ्यावयाची; कारण, आपलें गुह्य दुष्ट वासनेला बळी पडून आपण हातीं घेतलेलें घाणेरडें कृत्य दुसऱ्याला कळूं देणें ही नामर्दपणाची अत्यंत अपमानास्पद गोष्ट होय असें मीं ठरविलें होतें व दोनप्रहरीं रस्त्यावर उभा असतांना जें कांहीं माझ्या नजरेला आलें तें माझ्या नीच हेतूला सर्वप्रकारानें अनुकूल असें वाटून भावी यशाच्या आशेनें मला अतीशय आनंद झाला होता. मनुभाईच्या सांगण्यावरून पिरोज या नांवाचा कोणी पारशी विद्यार्थी कॉलेजमध्यें असेल व कदाचित् असलाच तरी तोही लंगडा—मनुभाईच्या संदिग्ध बोलण्यावरून मीं असें अनुमान केलें—होऊन गेलेला ह्मणजे अर्थात् अजारी ! आपल्याला आतां त्याच्यापासून कोणत्याही प्रकारचा त्रास पोंचेल अशी बिलकुल शंका येण्यालाही जागा नाहीं असें मी मोठ्या गर्वानें आपल्या मनांत ह्मणालों, व समोरच्या बाजूला एका गाडीपाशीं दिसलेला लंगडा पारशी एका स्त्रीच्या मदतीनें गाडींत बसत आहे असें दृष्टीस पडतांच आपण आतां अगदीं निर्धास्त झालों या गोष्टीबद्दल माझी खात्री होऊन चुकली. त्या लंगड्या माणसाला गाडींत बसविणारी तरुणी कोण असावी याकडे मी फारसें लक्ष दिलें नाहीं. कारण शिरीनच्या दुसऱ्या पत्रामुळें माझें मन नवीनच एका व्यवसायांत गढून गेलें होतें; व पत्र वाचून पाहिल्यापासून एकच विचार मनांत घोळत असल्यामुळें 'मला काल रात्रींपासून करमेनासें झालें आहे, आतां आपण कोठेंतरी हिंडायला जाऊं' असें मनुभाईला जरी मीं सांगितलें होतें तरी तें अक्षरशः खरें नव्हतें. हँगिंगगार्डन कोठें आहे हें पाहून यावें अशी त्यावेळीं मला अनावर इच्छा झाली होती हें कांहीं खोटें नव्हे; पण तसें करण्यांत माझा हेतू मात्र अगदीं निराळा होता; व तो स्पष्टरीतीनें मनुभाईपाशीं व्यक्त करून दाखविणें

मला बिलकुल इष्ट वाटलें नाहीं कारण तसें करण्यानें आपण आपली सर्वच हकीकत त्याला थोडक्यांत कळविल्याप्रमाणें आहे असें समजून हँगिंगगार्डन पहायला कां जावयाचें या गोष्टीचा त्याला मी मागमूसही लागूं दिला नाहीं. पण गार्डनमध्यें जावयाला आह्मी निघाल्यापासून किंवा मी मनुभाईकडे गेलों तेव्हांपासून—आह्मीं परत येईपर्यंत जें जें कांहीं त्याच्या दृष्टीस पडलें त्यावरून—माझ्या हातांत शिरीनचें पहिलें पत्र पाहिल्यापासून जी माझ्याबद्दलची शंका त्याच्या मनांत उत्पन्न झाली होती ती अधिकच दृढ होऊन तो मला तरतऱ्हेनें विचारीत होता. गार्डनमध्यें आमच्या शेजारीं बसलेल्या दोघीं तरुणींचा संवाद माझ्याप्रमाणें तोही अगदीं लक्ष्यपूर्वक रीतीनें ऐकत होता; व त्यावेळीं माझ्या वृत्तींत स्वाभाविकपणानेंच जो एकप्रकारचा फरक पडला त्यामुळेंच माझ्यावर कांहीं तरी संकट ओढवणार असें त्याच्या मनानें घेतलें; आणि त्याप्रमाणे त्यानें "हा नाद तूं सोडून दे. याचा परिणाम वाईट होईल" अशा अर्थाची सूचनाही केली. पण ती सूचना ऐकून त्याप्रमाणें वागणं—हातीं घेतलेलें अशाप्रकारचें काम मध्येंच परिणामाच्या भीतीनें सोडून देणें—केवळ बायकीपणाचें वाटून त्यानें केलेल्या उपदेशाकडे मीं समजून उमजून दुर्लक्ष्य केलें! त्यामुळें त्याचा परिणाम ठरल्याप्रमाणें झाला यांत कांहीं आश्चर्य नाहीं!

मनुभाई आपल्या ठिकाणाकडे गेल्यावर मी लागलींच आपल्या बिऱ्हाडीं आलों व आपण तिच्यासाठीं हवें तें करूं, प्रत्यक्ष आपला प्राण देण्यासही मागेंपुढें पाहणार नाहीं असें तिला नुकतेंच दिलेलें वचन आपण खरें करून दाखविल्याशिवाय राहणार नाहीं; अशा आशेनें शिरीननें पत्रांत लिहिलेलें आपल्याला करावयास सांगितलेलें कार्य आपल्या हातून कसें पार पडणार, या विलक्षण विवंचनेनें माझें चित्त अगदीं भ्रमन गेल्यासारखें झालें होतें! तिनें कांहीं मला आपला जीव द्यावयाला सांगितलें नव्हतें; किंवा मी एखाद्या कड्यावरून उडी टाकावी, अथवा कोणत्याही मनुष्याला अगदीं अशक्य वाटणारी अशी एखादी गोष्ट मी करून दाखवावी असें कांहीं तिनें मला लिहिलें नव्हतें! एका अगदीं साधारण अशा कामामध्यें तिनें माझ्या मदतीची अपेक्षा केली

होती. तें तिचें ह्मणणें सुंदर तरुणींच्या नादीं लागून वेडा होऊन जाणाऱ्या कोणत्याही तरुण पुरुषानें सहज मान्य केलें असतें. पण माझ्या त्या वेळच्या स्थितींत ती गोष्ट मला अगदीं अशक्य वाटल्यामुळें आतां काय करावें, येवढीशी गोष्ट–आपली प्रिय शिरीन संकटांत सांपडली असतां तिच्यासाठीं येवढीशी क्षुल्लक गोष्ट– करण्याला देखील आपण असमर्थ आहों असें जर कळलें तर तिला किती वाईट वाटेल ! हेंच कां तिच्या ठिकाणचें आपलें प्रेम–कीं ज्याच्यासाठीं आपण आपला प्राण देखील खर्ची घालूं असें तिला वचन दिलें असूनही आपल्या हातून असली यत्किंचित् गोष्टही घडूं नये ! छे !' तें कांहीं नाहीं ! तिनें सांगितलेलें काम आपण करणारच ! मग काय होईल तें होवो ! असा शेवटीं मीं निश्चय ठरविला.

मी घरीं जाण्यापूर्वीच नंदशंकर शेटजी लिमडीहून परत आले होते. मी घरीं आलों त्यावेळीं रात्रीचे आठ वाजून गेले होते; आणि नंदशंकर शेट माझी वाट पहात बसले होते. मला पाहतांच त्यांनीं विचारलें ' कां भगवानदास, आज सकाळपासून कोठें गेला होता तुह्मी इतका वेळ ? मला वाटतं तुह्मी आज वाटेंत कुठं चुकला बिकला होतां कीं काय ? नवीन माणसानं या मुंबई शहरांत मोठ्या बेतानं वागावं लागतं; कारण अगोदर शहर अफाट, आणखी त्यांतल्यात्यांत इथें नानाप्रकारचे लोक आहेत. नवा माणूस चुकण्याचा ह्मणा कीं फसण्याचा ह्मणा पुष्कळ संभव असतो. खेडेगांवांतल्यासारखे इथले सारेच लोक गरीब, निरुपद्रवी, संभावीत असतात असं समजूं नका हो ! "

" छे, छे, भलतंच ! शेटजी. तुमचं सांगणं चुकीचं आहे असं मी ह्मणत नाहीं. तरी मी पुष्कळ दिवस मुंबईंत राहिलों नसलों ह्मणून मला या साऱ्या गोष्टी माहीत नाहींत असं नाहीं. आपण ह्मणतां त्या सर्व तऱ्हा मला ऐकून चांगल्या ठाऊक झाल्या आहेत त्यावरून मी सहसा कांहीं फसणार नाहीं अशी मला खात्री वाटते. "

" तसं असलं तर उत्तमच ! " शेटजी माझ्या तोंडाकडे पहात ह्मणाले, " पण व्यवहारांत चांगल्या शहाण्यासुर्त्या माणसाला देखील नादीं लावणारे आणखी सहज ठकविणारे कित्येक फसवे या शहरांत ठिकठिकाणीं आहेत. तुमच्यासारखा नवा मनुष्य त्यांना तेव्हांच ओळखतां येतो

आणखी अशा माणसाला भुरळ घालणं त्यांना तर अगदींच सोपं...तुझांला कोणी फसविलं असेल असं माझं ह्मणणं नाहीं. पण— ”

हें शेटजींचें बोलणें ऐकून मला त्यांचें किंचित हसूं आलें; व मी मनांत ह्मणालों, “ नवा मनुष्य तुमच्यासारखा अजागळ असला ह्मणजे त्याला फसवायला मुंबईशहरांतलाच एखादा लुच्चा पाहिजे असं नाहीं. माझ्यासारखा गांवढळ देखील हे सहज करील ! ” आपण केवढें विलक्षण कार्य केलें आहे असें वाटून मी त्यावेळीं गर्वानें अगदीं फुगून गेलों. “ अहो शेटजी तुह्मी आहांत कोठल्या भ्रमांत ! तुमच्या या मुंबई शहरांत ! येऊन एखाद्या अस्सल भामटयालाहि देखील जें फसवेगिरीचं काम साधणार नाहीं असलं काम तुमच्या मुंबईतल्या एका खुपसुरत तरुणीला भलतेंच सोंग घेऊन नादीं लावण्याचें—नव्हे वश करण्याचं—अवघड काम मी सहज एक दोन दिवसांत करून टाकलं आहे ! ” असे शब्द उच्चारण्याच्या मी अगदीं बेतांत होतों; पण मला बोलण्याला फुरसत मिळण्यापूर्वींच शेटजी खालीं गेले आणि लागलीच एका गड्यानें मला जेवायला झाल्याबद्दलची सूचना केली त्यामुळें मीही खालीं गेलों. यामुळें माझ्या दर्पोक्तीला अवसरच सांपडला नाहीं व नंतर “ थोडा विचार केल्यावर आपण भलतेंच बोललों नाहीं हें बरें झालें ” असें मला वाटलें !

आमचें जेवणखाण आटोपल्यानंतर पुन्हा शेटजी व मी माडीवर येऊन बोलत बसलों. शेटजींना आपली अडचण कळवावी ह्मणजे कांहीं तरी उपयोग होईल असें एकसारखें माझ्या मनात घोळत होतें व मी लागलीच त्यांना ह्मणालों “ शेटजी, आपल्याला एक विनंती आहे. आपण मनांत आणिल्यास माझें काम सहज होणार आहे. ”

“ हं, तुमचें काय काम आहे तें सांगा तर खरं; ह्मणजे पाहतों. माझ्या हातून होण्यासारखं असलं तर करीन. ”

“ काम कांहीं असं ह्मणाण्यासारखं अवघड—आणखी आपल्यासारख्याला तर मुळींच कठीण नाहीं. ” मी मुद्दामच किंचित् निष्काळजीपणा दाखवून ह्मणालों, “ माझा एक स्नेही मोठ्या अडचणींत पडला आहे. त्याला ऐन नडीच्यावेळीं एका इसमानं फसविलं त्यामुळं तो मोठ्या प्रसंगांत आहे. आणखी तुला खात्रीनं मदत करीन असं सांगून मी

त्याला धीर देऊन चुकलों आहे. पण हें केवळ आपल्या आधारावर ! माझी स्वतःची सध्यां तरी निदान घरीं लिहिल्यावांचून कांहीं तशी स्थिती नाहीं. पण पाहिजे तें असलं तरी त्याला दिलेलं वचन मला कांहीं मोडतां येत नाहीं. कारण तो सर्वस्वी माझ्या विश्वासावर अवलंबून बसला आहे. आणखी हो, उद्यां त्याचं काम झालंच पाहिजे. तेव्हां आपण मनांत आणिलं तर – त्याच्यावर किंवा पर्यायानं माझ्यावर—आपले उपकार होणार आहेत. ”

“ पण असे उपकार होण्यासारखं तुमचं काम तरी कोणतं आहे ? ” शेटजींनीं माझ्याकडे निरखून पहात पहात प्रश्न केला.

“ तसं ह्मणण्यासारखं कांहीं नाहीं. ” मी त्यांना चढविण्यासाठीं पुन्हां ह्मणालों “ आज माझ्या हातांत नाहींत—नाहीं तर आपल्याला तसदी देण्याचं कारण नव्हतं. त्याची नड मीं केव्हांच भागविली असती ! ”

“ पण पुढें काय तें बोलाल तर खरं ! ” शेटजी उत्सुकतेनें ह्मणाले.

त्यांच्या ठिकाणीं किंचित् दया उत्पन्न करण्याच्या उद्देशानें मी सांगूं लागलों, “ काय करील बिचारा ! येवढा सधन असून ऐन प्रसंगाच्या वेळीं कसा अगदीं नाडला आहे; आणखी तो देखील स्वतःच्या कोणत्याच चुकीनं नव्हे—केवळ एका लुच्याच्या विश्वासघातानं ! ”

इतकें बोलून आपल्या स्नेह्याची ही करुणास्पद स्थिती पाहून फार दुःख होत आहे. असें शेटजींना भासविण्यासाठीं मी मुद्दामच आपला हात डोळ्यांना लावून आपल्याला दुःखाश्रु येत आहेत असें दाखविलें !

हें पाहून शेटजी अधिकच उत्सुकतेनें व सद्गदित अंतःकरणानें ह्मणाले, “ भगवानदास तुमचा मित्र संकटांत सांपडल्यामुळें तह्माला इतकं दुःख होत आहे हें पाहून मला फार वाईट वाटतं. माझ्या हातून कांहीं होण्यासारखं असलं तर तें मी आनंदानं करीन. अहो, तुह्माला दुःख करितांना पाहिलं ह्मणजे मला बरं कसं वाटेल! एकमेकांच्या उपयोगीं आपण पडलों नाहीं तर आपल्या लोभाचं आणखी ऋणानुबंधाचं काय करायचं आहे. तुह्माला काय पाहिजे आहे तें मला अगोदर सांगा पाहूं ? ”

“ शेटजी तसं कांहीं नाहीं ! ” दुःखाचा सुस्कारा टाकून मीं उत्तर

केलें, " दोन किंवा चार दिवसापुरतेच पाहिजे होते; पण ते आजच्या आज मिळून उद्याला त्याच्या हातीं पडतील तर उपयोग ! "

" हो मी समजलों; पण काय? आणखी किती ? तुम्हाला आज कांहीं पैसे कां पाहिजे आहेत ? "

" होय, शेटजी, फक्त पांचशें रुपये; आणखी रकमेबद्दल मी स्वत: जामीन राहतों. आपण त्याबद्दल बिलकुल काळजी करूं नका ! रुपये आपण मलाच दिलें आहेत असं समजा; आणि कसेंही करून माझ्या त्या नडलेल्या मित्राची गरज भागवा येवढीच विनंती आहे. "

यावर शेवजी थोडासा विचार केल्यासारखें दाखवून ह्मणाले, " हात्तेच्या येवढंच ना काय तें ! मी ह्मटलं असं आहे तरी कसलं काम; आणखी त्याबद्दल विनंती ती काय करायची आहे ! "

" अंह, शेटजी तसं नव्हे. बाबांची आपल्याजवळ मोठी पत आहे. त्यांनीं सांगितलं तर आपण पाचशेंच काय पण पांच हजार सुद्धां सहज द्याल हें मला चांगलं माहीत आहे. पण हा व्यवहार माझ्या मनांतून बाबांना कळवायचा नाहीं. कारण दोनचार दिवसांची तर कथा ! माझ्या मित्राकडून रक्कम तेव्हांच मोकळी होईल; आणखी ती परत आली कीं, लागलीच तुमची तुह्माला मी देऊन टाकणार. "

" भगवानदास, तुह्मी ह्मणतां त्याबद्दल मला मुळींच धास्ती वाटत नाहीं. मला शंका येते ती वेगळ्याच गोष्टीची ! हे पैसे कोणाला पाहिजे आहेत, तुमचा तो मित्र कोण, कुठला, उद्योग काय करीत असतो वगैरे गोष्टींची तुह्मी नीट चवकशी केली असेलच ह्मणा; पण कदाचित् तसं झालं नसलं तर मात्र या गोष्टीनें तुह्माला पश्चात्ताप होईल. माझं ह्मणणं येवढंच कीं, अगोदर काय तो नीट तपास करा. माझं काय, येवढ्या रकमेचं ह्मणजे मला कांहीं वाटेल अशातला भाग नाहीं. पण सध्याच्या काळांत भामटे, मित्र म्हणून—लोकांना भोळ्याभाबड्या लोकांना—नादीं लावून आपला विशेष स्वार्थ साधतांच त्यांना तोंडघशी पाडतात; इतकेंच काय, पण हव्या त्या माणसाचा गोड गोड बोलून हवातसा उपयोग करून घेतात व शेवटीं त्यांचा नाश करायलाही मागेंपुढें पहात नाहींत. हल्लींचा काळ मोठा

कठीण आहे. कोणत्याही प्रकारच्या संकटांत न सांपडतां किंवा कोणतेंही दुष्ट कर्म हातून होऊं न देतां एकदां आपलें आयुष्य लोटलें म्हणजे मिळविली असं मी समजतों " नंदशंकर शेटजीनीं हल्लींच्या लोकांवर इतका ताशेरा कां झाडावा हें मला समजलें नाहीं; पण त्यांच्या बऱ्याच व्यवहारांत ते गाफलपणानें वागल्यामुळें शेटजी फसले गेले असावें असें त्यांच्या बोलण्याच्या एकंदर रोंखावरून मीं अनुमान केलें ! शेटजी फसले असले तरी मला त्यांच्या पांचशें रुपयावांचून त्यांच्याशीं सध्यां कांहीं एक कर्तव्य नव्हतें. माझें मन त्यावेळीं स्वस्थ असतें व तशा स्थितींत शेटजीनीं लोकांवर केलेली टीका माझ्या कानीं पडती तर कदाचित् त्यांच्या बोलण्याचा मीं विचार केला असता; पण आपण हातीं घेतलेल्या कामांत एखादा लबाड मनुष्य आपल्याला भेटल्यामुळें शेटजींच्या म्हणण्या-प्रमाणें आपलें कांहीं नुकसान होण्याचा संभव आहे कीं, काय या गोष्टीचा मीं बराचवेळ विचार करून पाहिला; व आपल्या या व्यवहारांत आपल्याला त्या पिरोजवांचून कोणाचीही भीती वाटण्याचें कारण नाहीं अशी मला खात्री वाटली. बरें, त्या पिरोजची भीती तरी तो लबाड किंवा फसव्या म्हणून नव्हें तर तो आपला शत्रु, शिरीनच्या व माझ्या प्रेमांत विघ्नें आणणारा दुरात्मा म्हणूनच त्याची थोडीशी धास्ती मला वाटत होती; पण तीही तो लंगडा झाल्यापासून जवळ जवळ नाहींशीं झाली होती. सारांश, मी कोणातरी फसव्यांच्या नादीं लागलों आहे अशी नंदशंकरशेटजींना जी शंका वाटत होती तिजमध्यें यत्किंचितूही तथ्य नव्हतें; व त्यांच्या त्या साधेभोळेपणाबद्दल मला त्यांची कींव आली !

मी बराच वेळ बोलत नाहीं असें पाहून शेटजी लागलीच आपल्या जागेवरून उठले व शेजारच्या माडींतून त्यांनीं कसलेंसें एक कागदांचें पुडकें आणिलें; आणि त्यांतून शंभर शंभर रुपायांच्या पाच नोटा काढून त्यांचे नंबर त्यांनीं एका कागदावर लागलीच टिपून घेतले, व त्या नोटा माझ्यापुढें करून ते म्हणाले " भगवानदास, माझं म्हणणं अजून तुमच्या ध्यानांत आलं नाहींसं दिसतं तुम्हाला पांचशें रुपये कसे द्यावे असा मला विचार पडला असावा असं तुम्ही समजत आहा कीं काय ? तुमच्या-सारख्या गृहस्थाला पांचशें रुपये द्यायला मी आढेवेढे घेईन असं तुम्हाला

वाटतं काय? छे! तसं कांहीं वाटत असेल तर ते अगदीं खोटं आहे. तुह्मीं ज्याला पैसे देऊं केले आहेत त्या मनुष्याची चांगली सचोटी, व्यवहार, ओळख वगैरे गोष्टींचा तपास केल्याशिवाय तुह्मी त्याला पैसे देऊं नका; येवढं माझं तुह्माला सांगणं आहे. पण तो गृहस्थ जर तुमच्या चांगला माहितीचा असेल तर माझं मुळींच कांहीं ह्मणणं नाहीं."

"माझ्या चांगल्या माहितीचा!" मी किंचित् रागाचा आविर्भाव आणून ह्मणालों. "शेटजी, त्याच्यासारखा जीवाला जीव देणारा मित्र सहसा मिळणार नाहीं. निदान मला तरी आजपर्यंत कांहीं तसला दुसरा मनुष्य—सर्व तऱ्हेनं विश्वास ठेवण्याला योग्य असा—पहायला देखील सांपडला नाहीं. शेटजी, असलीं खरीं खरीं चांगलीं माणसं जगांत फार दुर्मिळ असतात. तेव्हा माझ्या त्या मित्राबद्दल मला कधीं कांहींचीही शंका येणार नाहीं व आपण निदान त्याच्यासंबंधानं तरी असं भलतंच कांहीं मनांत आणूं नये."

"भगवानदास," माझ्या हातांत त्या पांच नोटा देऊन ते किंचित् दिलगिरी व्यक्त करण्याच्या हेतूनें म्हणाले, "मी तुमच्या मित्राबद्दल मुळींच कांहीं बाललों नाहीं; हल्लींच्या लोकांशीं फार सावधगिरीनें वागलं पाहिजे असं मीं तुम्हाला नुसतं मोघम सांगितलं हं ते ठेवा पांचशें रुपये नीट; आणखी उद्यां आपल्या मित्राची गरज भागवा. बरं तर आतां बरीच रात्र झाली आहे आणखी तुह्मीही साऱ्या दिवसभर हिंडण्यानं दमून गेला असाल तेव्हां आतां स्वस्थ निजा" इतकें बोलून शेटजी जरा स्तब्ध राहिले व किंचित हंसून पुढें म्हणाले "हो, पण बरी आठवण झाली; आज सकाळीं तुम्ही जे एकदां घरून गेलांत ते जेवायला कांहीं परत आला नाहीं असं मला समजलं. मला वाटतं तुमच्या त्या मित्रानेंच—सकाळीं तुम्हाला पत्र आलं होतं त्यानेंच—तुम्हाला जेवायला बोलावलं होतं नाहीं?"

"होय; त्याच्याचकडे मी आज गेलों होतों." मी विचार न करितां एकदम बोलून गेलों.

"आणखी तोच गृहस्थ सध्यां संकटांत पडला आहेना?" शेट-

जीनीं पुन्हा हंसून प्रश्न केला; व माझ्याकडून त्याचें उत्तर मिळण्या-पूर्वीच ते आपल्या निजावयाच्या जागीं निघून गेले !

शेटजीकडून मला हवे होते तेवढे पैसे हातीं येतांच मला समाधान वाटलें. शिरीननें दिलेली दागिन्यांची पेटी आणि त्या नोटा मी आपल्या ट्रंकमध्यें ठेविल्या व आनंदानें निजलों.

दुसरे दिवशीं तिसरेप्रहरीं—चार वाजण्याच्या सुमारास आह्मी चहा घेत असतां—शेटजी व मी एकाच ठिकाणीं चहा घ्यावयाला बसलों होतों—शेटजींच्याकडे त्यांच्या परिचयाचे कोणी गृहस्थ आले. बराच वेळ त्यांच्या दोघांमध्यें इकडच्या तिकडच्या गोष्टी चालल्या होत्या. इत-क्यांत, नंदशंकर शेटजींनीं लिमडीहून परत येतांना तेथल्या मोडकळीला आलेल्या एका श्रीमंत गृहस्थाच्या कडून मुंबईचा बाजार दाखविण्यासाठीं एक हिऱ्याचें कंकण ( वरील भागावर हिरे बसविलेलें ) आणलेलें होतें तें त्या गृहस्थांना दाखवून त्यांना विचारलें " कहानजी शेट, ( हे गृहस्थ मुंबई शहरांतील एक नामांकित रत्नपारखी होते ) आपण या कंकणाची किंमत किती कराल ? "

कहानजीशेट तें कंकण हातांत घेऊन पाहूं लागले व म्हणाले, " अशा जिनसाची किंमत तावडतोब करितां येणें कठीण आहे. मी हें कंकण पुन्हा एखाद्यावेळीं स्वस्थपणानें पाहून मग त्याबद्दल काय तें सांगेन. " इतकें बोलून कहानजीशेट कांहींवेळ स्तब्ध झाले; व एकाएकीं त्यांच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले ! हा काय चमत्कार आहे हें आम्हाला कांहीं केल्या समजेना ! कहानजी-शेट, कसल्या तरी गोष्टीची आठवण झाल्यामुळें आतां अतोनात कष्टी होऊन गेले होते. त्यांची चर्या एकदम दुःखानें व संतापानें अगदीं लाल होऊन गेली व त्यांचा गळा दाटून आल्यामुळें त्यांच्या तोंडातून शब्द निघेना. हें पाहतांच आह्मी दोघेजण अगदीं गोंधळून गेलों ! हा काय एकदम चमत्कार झाला याचा आह्मांला दोघांना कांहींच उमज पडेना ! याप्रमाणें आह्मीं दोघे एकमेकांच्या तोंडाकडे वेड्याप्रमाणें पहात राहिलों. काय बोलावें हें कोणालाच सुचेना !

अशा स्थितींत अजमासें पांच मिनिटें गेल्यावर नंदशंकर शेटजींनीं

शेवटीं मोठा धीर करून त्या रत्नपारख्याला विचारलें " शेटजी, हें कंकण पाहतांच आपली एकाएकीं अशी स्थिति कां बरं झाली ? आपल्याला कोणत्या गोष्टीमुळं इतकं दुःख होत आहे हें आम्हाला आपण सांगाल काय ? "

" शेटजी, " कहानजीशेट दुःखाचा दीर्घ श्वास टाकून कापऱ्या आवाजानं ह्मणाले, " काय सांगावें, धंद्यांत जर अशी ठोकर बसली तर आमचा निभाव कसा लागावा ! अहो, याच कंकणाच्या घाटाची, पण किंमतीनं याहून हलक्या प्रतीची कंकणाची जोडी मी आमच्या त्या.... साहेबांनीं सांगितल्यावरून त्यांच्या मेमसाहेबांच्या हातांत बरोबर बसेल आणखी चांगली शोभेल अशी मुद्दाम तयार करविली होती; पण आमचं दैव आडवं आलं त्याला काय करणार ! "

" ह्मणजे ? " आश्चर्ययुक्त मुद्रा करून नंदशंकरशेटजींनीं विचारलें, " साहेबांनीं शेवटीं तीं घेण्याचं नाकारलं कीं काय ? "

" छे हो. नाकारतात कशाचे ! तसं झालं असतं तरी मला त्याचं कांहीं वाटलं नसतं. कारण, ती पाहिजे तशी खपली असती, पण— " इतकें बोलतांच पुन्हा त्यांचे डोळे भरून आले व उपरण्यानें डोळे पुशीत घोगऱ्या आवाजानें ते पुढें ह्मणाले " पण तीं कंकणं त्याच्यासाठीं मुद्दाम करविलेल्या एका सुंदरशा पेटींत घालून ठेविलीं होतीं. ती पेटी लहानशी येवढी ( असें ह्मणतांना त्यांनीं आपल्या हाताच्या बोटांनीं पेटीचें मोजमाप दाखविलें ) होती. ती मी नेहमीं आपल्या बसण्याच्या गादीशेजारीं ठेवीत असें; व दुकानांतून घरीं जातांना ती सेफमध्यें घालून सेफला कुलूप लावून मी जात असें; पण एकेदिवशीं कामाच्या धांदलीमुळं ती पेटी सेफमध्यें ठेवण्याचं मी विसरलों; आणखी या गोष्टीची, दुसरं किंमतवान जवाहिर खरेदी करण्याच्या नादांत मला मुळींच आठवण झाली नाहीं ! पेटी नाहींशी होण्याच्या आदल्याच दिवशीं आह्मी एक तरणा गोरटेला - रासरी वीस बावीस वर्षांच्या वयाचा नवीन गडी चाकरीला ठेविला होता; आणखी त्या हरामखोरानं पाळद राखून ती पेटी लांबविली. तेव्हांपासून त्या गड्याचा व त्या पेटीचा बिलकुल पत्ता नाहीं ! "

" शेटजी असूं द्या आतां " आमचे शेटजी त्यांना धीर देऊन ह्मणाले, " गोष्ट होऊन चुकल्यावर दुःख करून कांहीं उपयोग नाहीं. बरं शेटजी, तुमची ती पेटी ओळखण्यासारखी आहे कां ? "

" अहो ओळखण्यासारखी ह्मणजे ! तिच्यावर वरल्या बाजूला झांकणाच्या आंत आणखी दोन्ही बाजूवर आपल्या त्या साहेबांच्या नांवाची एम. एस. अशीं अक्षरें इंग्रजींत खोदविलीं आहेत ! "

" बरं या गोष्टीला किती दिवस झाले ? तुह्मी पोलीसला लागलीच कळविलं कीं नाहीं ? "

" हो; पेटी नाहींशी झाली व तो पोरगाही निघून गेला असं लक्षांत येतांच त्याप्रमाणें मीं लागलीच सर्व हकीकत पोलीसला कळविली; आणि त्या नव्या गड्याचं नांव चेहरेपट्टी वगैरे सांगून आमचा त्याच्यावर वहीम आहे असं सांगितलं आहे. आणखी याला कांहीं फारसे दिवस झाले नाहींत; आजचा तिसराच दिवस—हो, आज शुक्रवार ना; तर गेल्या मंगळवारची ही गोष्ट. "

" तर मग शेटजी, तुमचे जिन्नस कुठें जात नाहींत असं तुह्मी पक्कं समजा; आणखी या बाबतींत आमच्याकडून होईल तेवढी खटपट, हवं त्याप्रकारची मदत करण्याचं आह्मी तुह्माला वचन देतों. आतां या गोष्टीबद्दल तुह्माला मुळींच काळजी करण्याचं कारण नाहीं. "

याप्रमाणें दोघांचा बराच वेळ संवाद झाल्यावर लागलीच ते बाहेर गेले. ते बाहेर केव्हां जातात याचीच मी वाट पहात होतों; कारण मलाही आपल्या कामाला जायचें होतें. ह्मणून मीं लागलीच आपली ट्रंक उघडली व नोटा काढल्या. कहानजीशेट ज्या गोष्टीबद्दल नुकतेच आमच्या शेटजीशीं बोलत होते ती चमत्कारिक गोष्ट माझ्या मनांत घोळत होती; व मी ट्रंक उघडतांच आंत ठेवलेल्या शिरीनच्या पेटीकडे माझें साहजीकरीतीनं लक्ष्य गेलें; आणि ती पेटी आपल्या हातांत घेऊन मी पाहूं लागलों तों काय चमत्कार झाला असेल तो असो; पण तिजवर देखील तींच दोन अक्षरें खोदलेलीं आहेत असें मला आढळून आलें. ह्मणून मी लागलींच ती पेटी उघडून पाहिली तों शेटजीच्या ह्मणण्याप्रमाणें तिच्या आतल्या बाजूलाही एम. एस हीं दोन इंग्रजी अक्षरें कोरलेलीं मला

दिसलीं; व शेटजींनीं केलेल्या वर्णनाबरहुकुम त्याही पेटींतील कंकणें आहेत असें माझ्या दृष्टोत्पत्तीस आलें. हें पाहून मी एकदम चपापलों; मी बराच वेळ विचार करून पाहिला; पण ही अघटित घटना कशी घडून आली याबद्दल मला कांहींच कल्पना करवेना ! शेवटीं या गोष्टीचा तपास परत आल्यावर करावयाचा असें ठरविलें व ती पेटी बाहेर काढून ट्रंक बंद करितों तों बाहेर मला कोणी तरी हांक मारीत आहे असें एका गड्यानें येऊन सांगितलें; ह्मणून कोण आलें आहे हें पाहण्यासाठीं मी पेटी व नोटा घेऊन माडीवरून खालीं उतरलों !

---

# प्रसंग ११ वा.

मी माडीवरून खालीं आलों तेव्हां अजमासें साडेसहा होऊन गेले असावेत. दाराबाहेर येऊन पाहतों तों एक व्हिक्टोरिया उभी असून गाडीवाला " भगवानदास शेट, ओ पिरोजशेट " अशा माझ्या नांवानें—माझ्या दोन्हीं नांवानें—हांका मारीत असल्याचें पाहून मला फार आश्चर्य वाटलें. मी पिरोजशेट असें याला कोणी सांगितलें असावें हें मला समजेना ! पण त्यावेळीं मी या गोष्टीचा फारसा विचार करण्यांत वेळ घालविला नाहीं.

मला दारांतून बाहेर येतांना पाहतांच गाडीवाला ह्मणाला " अहो पिरोजशेट, शिरीनबाई नुकत्याच पुढें गेल्या आहेत आणखी तुह्माला लवकर घेऊन येण्याबद्दल त्यांनीं मला सांगितलं आहे ! "

नंदशंकर शेटजींचे दोन गडी दरवाजाच्या बाहेरल्या बाजूला उभे होते; व गाडीवाल्यानें उच्चारलेलें वाक्य ऐकतांच ते एकदम एकमेकांकडे पाहून मोठमोठ्यानें हंसूं लागले ! ज्यानें शिरीनचें पहिलें पत्र मला दिलें तो गडी तेथेंच होता. त्याच्या ध्यानांत ही सर्व हकीकत येऊन त्यानें ती दुसऱ्याला सांगितली असेल—किंबहुना उडत उडत ती मालकाच्याही कानापर्यंत कदाचित् जाऊन पोंचली असेल—अशी मला शंका आली, पण तिकडे बिलकुल लक्ष न देतां मी लागलीच मोठ्या गर्दीनें माडींत

बसून निघालों; व सुमारें पंधरा वीस मिनिटांच्या आंतच ठरलेल्या ठिकाणीं जाऊन पोंचलों.

त्यावेळीं शिरीन हँगिंगगार्डन मधल्या ठरलेल्या जागीं माझी वाट पहात एकटीच बसली आहे असें मला दिसलें ! तिला एकटीला तेथें पाहतांच मला जो कांहीं आनंद झाला त्याचें वर्णन करणें कठीण आहे !

तो समय मला इतका कांहीं आल्हादकारक वाटला कीं, नंदनवन ह्मणतात तें हेंच असलें पाहिजे असें माझें वेडे मन मला सांगूं लागलें ! आहाहा ! तें स्वच्छ चांदणें, ती बागेची रमणीय शोभा, ती मंदमंद वाहणाऱ्या वाऱ्याची झुळुक, आणि वनदेवीनें माझ्यासाठीं ह्मणून निर्माण केलेली ती मंदस्मित करीत करीत नकती विकसित होत चाललेली लावण्यपूर्ण कलिका—माझी प्रिय शिरीन—दृष्टीस पडतांच माझा आनंद गगनांत मावेनासा झाला ! आतांपर्यंत ज्या ज्या वेळीं शिरीनची व माझी गांठ पडली होती त्या त्या वेळीं माझा शत्रु, तो पिरोज बहुधा तिच्या बरोबरच कोठें तरी असे; पण या वेळेला मात्र तो कोठेंच दिसला नाहीं; त्यावरून त्याच्या लंगड्या पायानें शेवटीं त्याला दगा दिला अशी कल्पना मनांत येऊन मला त्या गोष्टीबद्दल अतोनात समाधान वाटलें !

मला पाहतांच शिरीन चटकन लाजून उभी राहिली; व लडिवाळपणानें माझा हात धरून तिनें मला बाकावर बसविलें आणि ती माझ्याजवळ बसली व ह्मणाली " तुझा पाय आतां अगदीं चांगला झाल्याचं पाहून मला इतका कांहीं आनंद झाला आहे कीं, सांगतां येत नाहीं. आणखी हें ठिकाण तरी किती मजेचं, आनंदाचं आहे ! अशा या आनंदाच्या ठिकाणीं आपण अगोदर शराब अल्बत घेतलीच पाहिजे. कारण त्याशिवाय कोणत्याही गोष्टींमध्यें—कोणत्याही सुखामध्यें, आनंदामध्यें—खरी मजा उत्पन्न होत नाहीं. शराब घेतली नाहीं ह्मणजे कोणत्याही सुखाचा तेव्हांच अगदीं थोड्या वेळांत कंटाळा येऊन जातो ! "

असें ह्मणून तिनें व्हिस्कीची एक बाटली, दोन ग्लॉस व सोड्याच्या दोन बाटल्या आपल्या हँडबॅगमधून बाहेर काढल्या व दोन्ही ग्लासांत

बरोबरशी व्हिस्की ओतून त्यामध्यें सोड्याची एक बाटली रिकामी केली; आणि एक ग्लास एका हातानें माझ्यापुढें धरून दुसरा तिनें आपल्या तोंडापाशीं नेला.

हें पाहतांच आतां मी कोणत्याही प्रकारचा आग्रह करून न घेतां तिनें माझ्यापुढें धरिलेला ग्लास हातांत घेऊन त्यामध्यें असलेली मदिरा आनंदानें पिऊं लागलों; व तिनेंही तात्कडतोब माझें अनुकरण केलें ! मदिरेच्या अमलानें मला एक रात्र व एक दिवसभर इतका असह्य त्रास सोसावा लागला असतांनाही या वेळीं शिरीननें एकांतांत मोठ्या प्रेमानें मला अर्पण केलेल्या मदिरेचा अव्हेर करण्याचें माझ्या एकवेळही मनांत आलें नाहीं; कारण थोड्याच वेळांत भोगावयाच्या अनेक प्रकारच्या सुखांच्या आरंभी मदिरा न घेतल्यास तेव्हांच कंटाळा येतो; सुखामधील गोडी थोड्याच वेळांत नाहींशी होते असें तिनें नुकतेंच मला सांगितलें होतें; व या तिच्या सांगण्याचा अनुभव घेण्याची संधी सुदैवानें त्यावेळीं आल्यावर तिच्या म्हणण्याप्रमाणें वागण्यांत मीं बिलकुल कसुर केली नाहीं ! त्यांतूनही शिरीन आज आपल्याला एकटी भेटली या गोष्टीच्या आनंदानें तर माझें मन नाचूं लागलें !

मदिरा प्राशन झाल्यानंतर शिरीन माझ्या अगदीं जवळ आली व माझा हात आपल्या दोन्हीं हातांत घेऊन ती अत्यंत लडिवाळपणानें म्हणाली, "पिरोज, यावेळीं मला किती आनंद झाला आहे म्हणून सांगूं ! मला बाई अगदीं मनापासून वाटतं कीं, रोजच्या रोज तुझ्याशीं असं एकसारखं आपलं हंसत खेळत मजा करीत रहावं ! पण बाई तसं कुठून घडायला ?"

"कां न घडायला काय झालं ?" मी मोठ्या ऐटीनें म्हणालों. "आतां आपल्या मार्गांत अडचण अशी मुळींच उरलेली नाहीं. येऊन जाऊन आपल्याला त्या लबाड, ढोंगी माणसाची--आतां आपल्याला बिलकुल भीति उरलेली नाहीं. एकंदरींत त्याच्या त्या लंगड्या पायानं त्याची चांगली खोड मोडली म्हणायची ? आतां येशील कां म्हणावं मध्यें मध्यें लडबुडायला ! आपण बंदरावरून आलों त्या रात्रीं त्या गुलामानं कसा एकसारखा आपला अगदी पिच्छा पुरविला होता ! पण परभारें चोरांनींच पाय मोडला म्हणून ठीक झालं; नुसत्या पायावर तरी निभावलं;

माझ्या तावडींत सांपडला असतां तर या दुनियेंतून त्याला नाहींसा करायलाही—पण तूं सांगितलं असतंस तरच अं—मीं कमी केलं नसतं ! एकंदरीनं त्याचा त्रास नाहींसा झाला ह्मणूनच प्यारी, तुझ्या एकांताचा हा अप्रतिम लाभ मला आज मिळतो आहे किंवा यापुढें रोज मिळणार असं मी समजतों ! ”

“ तें सारं खरं; पण मी सांगितलेली गोष्ट जर तुह्मी केली नसती—आज तुह्मी ती केली नाहीं असं मला मुळींच वाटत नाहीं— तर उद्यां माझ्यावर कोणता प्रसंग आला असतां हें तुह्माला ठाऊक तरी आहे कां ! खरोखरीं पाहिलं तर मेली माझी ती कंकणं तीं काय आणखी विलायतेला जाऊन शिकून येण्यासाठीं मी तीं तुम्हाला दिलीं ह्मणून तेवढ्यानं आईचं काय बिघडत होतं ! पण गडे, आईचा तो हट्टी स्वभाव पाहून कींनाई मला तिचा भारी राग आला आहे ! तसंच दुसरं पांचशें रुपयांचं प्रकरण ! काय मेलं येवढ्याशा गोष्टीचा जसा कांहीं ग्रंथ झाला आहे. पांचशें रुपड्यांची कथा ती काय आणखी माझ्या हातून ते हरवले ह्मणून माझी आई इतकी रागावते ती काय ! काय मेलं कालपासून कीं नाइ सगळंच आपलं विपरीत होऊं लागलं आहे. पण त्यांतल्या त्यांत माझ्यावरचं आपलं प्रेम कमी झालं नाहीं येवढीच काय ती दुःखांत सुखाची गोष्ट म्हणायची झालं दुसरं काय ? ”

हें तिचें बोलणें ऐकून मी आनंदच्या अगदीं ऐन भरांत आलों; व तिची स्तुति करून तिला चढवावी अशा हेतूनें ह्मणालों “ पण प्यारी, तुझं माझ्यावर एकदां जडलेलं प्रेम अजन कायम आहे ही गोष्ट तूं साधारणच समजतेस कीं काय ? अग, अतीशय सुंदर ह्मणून नांवाजलेल्या कांहीं बायकांचें खरे प्रेम एकाच ठिकाणीं नेहमीं सहसा रहात नाहीं असं कित्येक लोक ह्मणतात; पण माझा आतांपर्यंतचा अनुभव तरी निदान त्यांच्या विरुद्ध आहे ! ”

‘ हें आपलं तुमचं कांहीं तरी ह्मणणं आहे झालं ! पण मग खरंच कां यावेळीं तुह्मी तीं माझीं कंकणं आणखी पांचशें रुपये माझ्यासाठीं आणले आहेत ? जर हें काम माझ्यासाठीं तुह्मी केलं नसलं तर उद्यां मात्र माझी कांहीं धडगत नाहीं ! समजा, आईनं मला उद्यां घरांतून घालवून

दिलन् तर मग पुढें मीं काय करायचं ! तुमच्या कोरड्या प्रेमाला आणखी वाग्फळ वचनाला घेऊन माझा थोडाच निभाव लागणार आहे. ‘ मी तुझ्यासाठीं तूं सांगशील तें करीन. प्रत्यक्ष आपला प्राणसुद्धां देईन ’ असं तोंडानं नुसतं ह्मणणं सोपं असतं आणखी तेवढ्यानंच माझ्यासारख्या भोळ्याभावड्या अज्ञान अबला फसून जातात. पण पुरुषांचे कावे, त्यांचा स्वार्थ, आणखी तो साधण्यासाठीं तेवढ्या वेळापुरती त्यांनीं केलेली हवीतशी बडबड कांहीं आह्मा गरीब बायकांच्या लक्षांत येत नाहीं. आणखी शेवटीं बिचाऱ्या कावेबाज पुरुषांच्या मोहांत सांपडून त्या फसतात ! ”

हें तिचें बोलणें मला बरेंच अवास्तव वाटलें; कारण त्यावेळेपर्यंत तिनें सांगितलेली प्रत्येक गोष्ट करण्यास मी चुकलों नव्हतो. तिच्या मर्जीप्रमाणें वागण्यासाठीं मी आपल्या प्रिय मित्राची व कित्येक वर्षें ज्यांच्याशीं आमची देवघेव चाललेली होती आणि जे मला पूज्य वाटत असत अशा त्या नंदशंकर शेटजींची किंवा दुसऱ्या कोणाचीही पर्वा बाळगली नव्हती. शिरीनच्या व आपल्या प्रेमाच्या आड कोणीही आलें, कितीही अडचणी उत्पन्न झाल्या तरी माघार ह्मणून घ्यावयाची नाहीं असें ठरवून त्याप्रमाणें मी वागत होतों ! या बाबतींत मीं माझ्या धर्माकडे, माझ्या सद्सद्विवेकबुद्धीकडे किंवा अशा कोणत्याही गोष्टीकडे लक्ष दिलें नाहीं ! किंवा तिच्या प्रेमापुढें मला कोणत्याही गोष्टीचें महत्व वाटलें नाहीं. माझ्या धर्मानें अपेयपान, व अभक्ष्यभक्षण निंद्य मानून त्याचा निषेध केलेला असला, दुसऱ्याच्या स्त्रीला वश करणें ही अत्यंत अनीतिमूलक व पापमूलक गोष्ट आहे असें जरी माझें मन मला वारंवार सांगत होतें तरी मीं सर्व प्रकारच्या उपदेशाकडे—मीं ठरविलेल्या विचाराशीं व वर्तनाशीं विरोधी अशा वाटणाऱ्या उपदेशाकडे—जाणून बुजून डोळेझांक केली होती; व शिरीनची आज्ञा हीच वेदवाक्य मानून त्याप्रमाणें वागत आलों होतो ! आतांपर्यंत शिरीननें केलेली आज्ञा मी शिरसावंद्य मानून चाललों होतो ! तरी आपल्या विरुद्ध यत्किंचितही पुरावा नसतांना शिरीन आपल्याला असें टोंचून कां बरें बोलली असें वाटून मला तिचा थोडासा राग आला, व मी ह्मणालों,

" शिरीन, तूं ह्मणतेस तसं असेल; पण त्याचा माझ्याशीं संबंध कसा येतो हें मात्र मला समजत नाहीं ! ' तुझ्यासाठीं, प्रसंग पडला तर मी आपला प्राण देण्याला सुद्धां मागं पुढें पाहणार नाहीं ' असं मीं तुला वचन दिलं आहे; पण तें माझ्या हातून पाळलं गेलं नाहीं, तूं केलेल्या परिक्षेंत मी तुझ्या मनाप्रमाणं उतरलों नाहीं असं सिद्ध केल्यावांचून तुझं ह्मणणं मला कसं बरं पटेल ? "

" काय ! " तिनें तिरस्कारसूचक आवाजानें मला प्रश्न केला, " तुह्मी देखील इतर पुरुषाप्रमाणंच आहां असं मी सिद्ध करून देऊं होय ? अं: त्यांत काय आहे ? "

" त्यांत कांहीं नसेल. पण ती गोष्ट माझ्या प्रत्ययाला आल्यावांचून ती खरी आहे; माझ्याबद्दलचं तुझं मत बरोबर आहे असं मीं काय ह्मणून समजावं ? शिरीन, माझी परीक्षाच पहायची आणखी मा दिलेलं वचन कोणीकडून तरी माझ्याकडून खोटं करवायचं येवढ्याच साठीं जर तूं मला अशक्य गोष्ट करायला सांगितलीस, आणखी ती माझ्या हातून वेळेला झाली नाहीं तर आतापर्यंत केवळ तुझ्या प्रेमासाठीं ह्मणूनच, दुसऱ्या कोणत्याही इष्ट अनिष्ट, बऱ्यावाईट गोष्टींचा यत्किंचितही विचार न करतां हव्या त्या अडचणी सोसून, हवा तो त्रास सोसून, दोन तीन दिवसच कां होईना, पण अगदीं तुझ्या मर्जीनुरूप जो मी वागलों त्याचा एकंदरीनं कांहींच उपयोग झाला नाहीं असंच म्हणायचं कीं काय ? "

" छे, तसं मी कां म्हणेन पण ! जोंपर्यंत एखादी विरुद्ध गोष्ट माझ्या अनुभवाला आली नाहीं तोंपर्यंत तुमचं प्रेम इतर पुरुषांच्या प्रेमापेक्षां अधिक उत्तम आहे असं मी हवं तर म्हणेन ! पण मघाशीं तुह्मी ' तुझ्या प्रेमासाठीं, तुझ्या मर्जीसाठीं मी अमक्या रीतीनं वागलों ' असं जें तुह्मी ह्मणाला त्याचा अर्थ काय ? उघड बोलायचं ह्मणजे तुह्मी जे माझ्या येवढे भजनी लागला आहां ते स्वार्थासाठीं नाहीं तर तुमच्या मनांतला कांहींएक विशेष हेतू साधण्यासाठीं माझ्यासारख्या सुस्वरूप भोळ्या भाबड्या तरुण स्त्रीला हवीं तशीं वचनें देऊन शेवटीं फसविण्यासाठींच नव्हे तर काय ? पण माझ्यासाठीं ह्मणून तुह्मी अशी कोणती

गोष्ट करायला तयार आहां कीं, जिच्या योगानं तुमचं पाहिजे तें नुकसान झालं तरी त्याबद्दल तुह्माला मुळींच दुःख होणार नाहीं ? मनुष्यानं मनांत आणलं तरी त्याला कधींही करतां येणार नाहीं अशी एखादी अशक्य गोष्ट मी तुह्माला करायला सांगेन असं तुह्मी समजूं नका ! पण हल्लींच्या तुमच्या स्वार्थाविरुद्ध, लौकिकाविरुद्ध, अब्रूविरुद्ध किंवा धर्माविरुद्ध असं जर कांहीं केवळ माझ्यासाठीं ह्मणून मी तुह्माला करायला सांगितलं तर तें तुह्मी कराल काय ? तोंडानं नुसती हवी तशी बडबड करणं सोपं आहे ! ”

यावेळीं माझ्या मनांत असलेला विचार शिरीन अगदीं स्पष्टरीतीनें मला व्यक्त करून सांगत होती. पण तिचं बोलणं मला आवडलं नाहीं ! शिरीनसारख्या लावण्यलतिकेच्या प्रेमाचें सुख यथेच्छ उपभोगतां यावें हा एकच प्रबळ विचार माझ्या मनांत संचारत होता; व त्याच हेतूनें मी तिचें पाहिजे तें ह्मणणें कबूल करायला तयार झालों होतों. पण असें करण्यानें एखादी भलतीच जबाबदारी आपल्या शिरावर घ्यावी लागेल ही कल्पना माझ्या मनांत आली नाहीं. शिरीनच्या स्वतःच्या सुखासाठीं ती आपल्याला आणखीही कित्येक अवघड गोष्टी—कीं, ज्यांच्या योगानें पुढेंमागें आपल्याला आपल्या आईबापांचा, घरादाराचा संबंध सोडून आपल्या वाडवडिलांनीं संपदन केलेली अब्रू व नांवलौकिक आपल्या लाथेखालीं तुडविण्याचा प्रसंग येईल अशा गोष्टी— शिरीन आपल्याला करायला सांगेल ही कल्पना माझ्या स्वप्नांत देखील कधीं आली नाहीं ! ती इतकी बुद्धिवान्, इतकी चाणाक्ष असेलसें मला वाटलें नव्हतें ! तिनें मला केलेल्या त्या विलक्षण प्रश्नानें मी अगदीं गोंधळून गेलों ! आपल्या परीक्षेची हीच वेळ आहे असें वाटून मी त्या प्रश्नाचा विचार करीत बराच वेळ स्तब्ध राहिलों, व शिरीनसाठीं पाहिजे ती गोष्ट करावी लागली. धर्माला, आईबापांना, देशाला, नांवलौकिकाला रामराम ठोकावा लागला—तरी बेहेत्तर ! पण असलें अमोलिक स्त्रीरत्न हातीं आलें आहे तें भलत्याच गोष्टींच्या नादीं लागून सोडायचें नाहीं ! आईबाप हे कांहीं जन्मभर पुरणारे नाहींत; बरें धर्माबद्दल विचार केला तर कोणताही धर्म सारखाच ! परमेश्वर प्राप्तीकडे

जाणाऱ्या त्या निरनिराळ्या वाटा आहेत ! कोणत्याही वाटेनें गेलें तरी एकच ! बरें देश ? जेथें आपण राहूं, जेथें सुखानें आपल्याला राहतां येईल तो आपला देश ! अमक्या मनुष्याचा अमकाच देश अशी परमेश्वरानें थोडीच वाटणी केली आहे ! आणखी नांवलौकिक ? अं: ही वस्तू तर अगदींच ढिसूळ ! तिच्या नादीं कोणी लागावें ! ती तर देशकालपरिस्थितीनुरूप बदलणारी आहे ! संपन्न स्थितींतला मनुष्य कोणत्याही रीतीनें वागला तरी नांवलौकिक आपोआप त्याच्या मागें धाव घेत असतो. आज जीं माणसें नांवलौकिकाला चढलीं आहेत तींच पूर्वीं कधीं तरी पाहिजे तें कर्म करणारीं होतींच कीं नाहीं ! एखाद्या अट्टल चोरानें मोठी थोरली चोरी करून ती पचविली व तो गब्बर होऊन ऐटीनें वागूं लागला ह्मणजे त्याच्या नांवाला लागलेला डाग कालांतरानें आपोआप नाहींसा होऊन तो चोर नांवलौकिकाला चढल्याशिवाय रहात नाहीं ! पण कोणतेंही काम अगदीं बेमालुम मात्र केलें पाहिजे. सारांश, एकंदरीनें या सर्व गोष्टी पाहिजे त्या माणसाला सहज करितां येण्यासारख्या आहेत. पण शिरीनसारखी अप्सरा हवे तसे यत्न केले तरी मिळणार नाहीं ! तेव्हां ती ज्याअर्थीं आपल्या हातीं आली आहे त्याअर्थीं बाकींच्या शुष्क गोष्टींचा विचार करण्याचें आपल्यासारख्याला मुळींच कारण नाहीं ! येवढे थोरले मोठमोठे देव; पण त्यांनीं सुद्धां सुंदर स्त्रियांसाठीं पाहिजे तें करायला मागें पुढें पाहिलें नाहीं; मग आपली काय कथा ! आपण हवं तें केलें ह्मणून काय हरकत आहे ?

अशा प्रकारच्या आत्मघातकी विचारांचें माझ्या दुर्बल मनावर एकाएकीं विलक्षण वर्चस्व स्थापित झाल्यामुळें मी सर्वस्वी शिरीनच्या प्रेमाधीन होऊन तिला ह्मणालों, “ मी काय केलं ह्मणजे माझ्याबद्दलची तुझ्या मनांतली शंका फिटेल ? ”

शिरीनची चर्या आतां अगदीं प्रफुल्लित होऊन तिनें गालांतल्या गालांत हंसून लाजत लाजत उत्तर दिलें “ तुमच्या स्वार्थाला जसे तुह्मी जपत आहां तसेच माझ्या स्वार्थालाही तुह्मी जपला ह्मणजे झालं; याहून दुसरं माझं कांहीं ह्मणणं नाहीं ! ”

" म्हणजे ? तुझ्या या अशा संदिग्ध बोलण्यानं मीं काय समजावं ? यापेक्षां अधिक स्पष्टरीतीनं सांगशील तर बरं होईल. "

' आणखी स्पष्ट तें काय सांगायचं आहे त्यांत ! हें पहा, आईचं आणखी बाबाचं मन माझ्याबद्दल अगदीं विटून गेलं आहे. यापुढें ते आतां माझ्यावर पहिल्यासारखी माया करितील; आणखी माझं म्हणजे त्यापासून हित होईल याचं आतां नांवच नको ! आणखी इतकं हें सगळं व्हायला कारण काय तर तुमच्या ठिकाणीं जडलेल्या माझ्या प्रेमाचं वेड ! त्यादिवशीं रात्रीं तुमच्या नादीं लागून तुमची गरिबी आहे तेव्हां विलायतेंतून शिकून येण्यासाठीं म्हणून तुम्हाला आईच्या नकळत आपलीं हिऱ्यांचीं कंकणं द्यायचा जर मला मोह पडला नसता तर आज माझी अशी दशा होण्याचं कांहीं तरी कारण होतं कां ? बरं दुसरी गोष्ट अशी कीं, आईनं कांहीं कारणासाठीं म्हणून माझ्यापाशीं पांचशें रुपये ठेवायला दिले होतेन. ते रुपये दुसऱ्या दिवशीं तिच्या एका मैत्रिणीकडे नेऊन द्यायला तिनं मला सांगितलं होतंन; पण तुमच्या गरिबींत तुम्हालाच त्याचा अधिक उपयोग होईल असं माझ्या वेड्या मनानं ठरविलंन आणखी ते पांचशें रुपये तुमच्याकडे पोंचवायला म्हणून मी एका माणसापाशीं दिले. पण त्या माणसानं मधल्यामधेंच ते लांबविले असं मला दुसऱ्या दिवशीं कळलं ! आणखी आमच्या एका चोंबड्या मोलकरणीनं ही गोष्ट लागलीच आईला जाऊन सांगितलीन. तेव्हां असं झालं असतांना माझ्या स्वच्छंदीपणाचे —आणखी तो स्वच्छंदीपणा केवळ तुमच्या प्रेमासाठीं बरं !— दोन वेळां असले चमत्कारिक अनुभव आल्यावर आईनं आणि बाबांनीं माझ्या कुवारपणाच्या स्थितींत असल्या वाणेरड्या अपराधाकडे डोळेझांक तरी कशी आणखी किती दिवस करायची ! म्हटलं म्हणजे या साऱ्या दोषाचे धनी तुम्हीच आहां ! तुम्हींच मला असल्या वाईट मार्गाला लाविलंत ! नाहीं तर असल्या चोऱ्या करण्याचं आणखी निर्लज्जपणानं आईबापापाशीं खोटं खोटं कांहीं तरी सांगण्याचं धाडस माझ्याकडून कसं झालं असतं ? तेव्हां तुम्ही माझ्या जन्माचं मातेरं केलंत तर आतां मी सांगेन तसं तुम्हाला वागलं पाहिजे ! "

शिरीनची ही हकीकत ऐकून मला थोडावेळ वाईट वाटलें; पण या योगानें कां होईना, ती आपल्या अगदीं हातांत आली आहे असें ध्यानांत येतांच मला एकप्रकारचा आनंद झाला ! व तिला पुन्हा वचन देऊन मीं सांगितलं, " शिरीन, तूं ह्मणशील ती गोष्ट करायला मी आतां अगदीं एका पायावर तयार झालों आहे ! तूं हुकूम करण्याचाच काय तो अवकाश ! "

" अगबाई, असं असल्यावर मग आणखी तें काय पाहिजे ! आतां तुह्मी अगदीं माझ्या हातांत आलांत ! आतां सध्यां तुह्माला येवढंच सांगतें कीं, आज जशी तीं माझी कंकणं, आणखी पांचशें रुपये माझ्या-साठीं ह्मणून तुह्मीं आणिलेत—ते तर आतां उद्यां मी आईकडे पोंचतें करवितेच ह्मणा; पण—तसेच उद्याच्या उद्यां पाहिजे त्या युक्तीनं तुह्मी, फार नाहीं, पण एक दहा हजार रुपये घेऊन या ह्मणजे आपण लागलीच उद्यां रात्रीं येथून निघून लांबच्या अशा कुठल्या तरी गांवांत जाऊन राहूं ! आणखी तुह्मी नहमीं जवळ असलांत ह्मणजे मग आईची किंवा बाबांची मला मुळीं दिखील गरज नाहीं ! बसा ह्मणावं रडत ! पण हें काम उद्यांच्या उद्यां झालं तर उपयोग. तुमच्यापाशीं इतके पैसे नाहींत हें मला चांगलं ठाऊक आहे; पण तुमच्यासाठीं मी जशी दोनदां चोरी केली तशी तुह्मी आतां एकदाच माझ्यासाठीं ह्मणून—नुसती माझ्यासाठीं नाहीं; आपल्या दोघांच्यासाठीं—चांगली भली भक्कम चोरी करा—नव्हे तुम्हाला केलीच पाहिजे ! हवं असलं तर मी तुह्माला ठिकाण सुद्धां सांगतें. ज्या माणसाकडून तुह्मी आज पांचशें रुपये मागून आणलेत; त्याच्याच घरीं जाऊन उद्यां तुह्मी येवढं करून या. तुह्मी त्याच्या येथें येत जात असाल; पण तो किती श्रीमंत आहे हें तुह्माला माहीत नसेल ! अहो, दहा हजार रुपये म्हणजे नुसता त्याच्या कोपऱ्यांतला केर आहे असं समजा ! त्याच्या घरची सारी माहिती मीं गुप्तपणानं मिळविली आहे ! तुम्हीं दहा हजार रुपये आणिलेत—पण अगदीं कसे आणाल म्हणतां, कीं कुणाला म्हणून त्याची कधीं बातमी लागूं नये—आणखी तम्हाला पक्कं सांगते कीं, त्याच्या तर ही गोष्ट कधींच लक्षांत यायची नाहीं—म्हणजे मग तुमचा तो दरिद्रीपणा नको; आणखी माणसांना निर्द-यपणानं कांपायचा तो डाक्तरीचा धंदाही नको ! "

शिरीनच्या तोंडून बाहेर पडत असलेलीं ही भयंकर वाक्यें ऐकतांच मी भयभीत होऊन एकाएकीं माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले. " काण हे या स्त्रीचें भयंकर विचार ! माझ्यासारखा पुरुष देखील अशा विचारांनीं भिऊन जावा, आणखी त्याचे या अबलेला कांहीं देखील वाटूं नये हें केवढें आश्चर्य ! बरें पण हा कांहीं हिचा मुळचा स्वभाव खास नसला पाहिजे. कारणपरत्वें हिच्या स्वभावांत कांहीं तरी विलक्षण स्थित्यंतर पडल्यामुळेंच ही अशी बिथरल्यासारखी झाली असावी. तिनें सांगितलेल्या हकीकतीचा विचार केला ह्मणजे तिच्या स्थितींत असलेली कोणतीही स्त्री असंच नाहीं कां करायची ? प्रेमाच्या मोहांत सांपडून बिचारीच्या हातून चोरीसारखें घाणेरडें कर्म व्हावें ना ! हरहर ! आणखी तें कर्म तिनें कां केलें तर माझ्या प्रेमासाठीं ! माझ्या दरिद्री स्थितींत मला आश्रय मिळावा; तिच्या प्रेमाचें अनुपमेय सुख मला अनुभविता यावें ह्मणून ! शिवशिव ! कोण हें नीच कर्म मीं तिच्या हातून करविलें ! पण खरोखरी पाहिलें तर तिनें केलेली चोरी कांहीं माझ्यासाठीं नव्हती. त्या लबाड पिरोजनेंच तिला हें घाणेरडें कर्म करायला लावलेंन. मला स्वतःला कांहीं ( ती ह्मणते त्याप्रमाणें ) विलायतेला जाण्या येण्याच्या खर्चासाठीं तिच्या त्या कंकणांची गरज नव्हती; किंवा तिच्या त्या पांचशें रुपायावांचूनही पण माझें आडलें असल्याचें मीं तिला कधीं कळविलें नव्हतें. मग असें असतांना तिनें आपल्या दुष्कर्माचें पातक माझ्या माथीं लादून तिच्या आईबापांच्या रागाचा अनिष्ट परिणाम पर्यायानें मला भोगायला लावावें हें आश्चर्य नव्हे का ? बरें, पण मी तिचा खरा प्रियकर पिरोज नसून लबाडीनें तिला भुरळ घालून वश करण्यासाठीं पिरोजचें सोंग आणलें आहे हें तिला माहीत नाहीं; व खरा पिरोज लंगडा होऊन कोठें तरी एखाद्या इस्पितळांत पडून राहिल्यामुळें अलीकडे त्याची तिला वार्ताही नसावी; आणि आपला पाय आतां बरा झाला असल्याचें तिला नुकतेंच कळल्यामुळें हाच आपला पिरोज अशी तिची भावना झाली असली तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. शिवाय दुसरें असें कीं, तिची तीं कंकणें, जरी तिनें माझ्यासाठीं चोरून आणलीं नसलीं तरी

तीं तिनें मलाच दिलीं कीं नाहीं ? त्या पांचशें रुपड्यांचं असो म्हणा ! ते तर भलत्याच माणसानें उपटून नेले त्याला ती काय करणार ! आणखी तिच्या प्रेमाचा लाभ तरी अखेर मलाच झाला कीं नाहीं ! तेव्हां एकंदरीनें काय कीं, निरुपायानें तिच्या हातून घडलेल्या सर्व कर्मांची जबाबदारी माझ्यावांचून दुसऱ्या कोणावरही पडूं शकत नाहीं ! तेव्हां ज्याअर्थी बऱ्यावाईट परिणामाला न जुमानतां माझ्यासाठीं, माझ्या भावी सुखासाठीं तिनें येवढें साहस केलें त्याअर्थी तिनें सांगित-लेली गोष्ट करायला आपणही तयार झालेंच पाहिजे ! काय येऊन जाऊन दहा हजारच रुपये ना ! घ्यावे झालं शेटजींच्या घरांतूनच सध्यां हस्तगत करून ! तेवढ्यानेंच जर आपलं दोघांचें काम होत असलें तर काय हरकत आहे तसं करायला ! पाहूं मग पुढें मागें तसें कारणच पडलें तर मध्यंतरीं एकदां घरीं जाऊन बाबांच्या तिजोरी-तला दहाबारा हजाराचा ऐवज युक्तिप्रयुक्तीनें हाताखालीं घातला आणखी तो येथें आणून त्याचे काय येतील ते पैसे शेटजींच्या घरीं नेऊन टाकले म्हणजे मग काय धास्ती आहे ! हो, ठरलें, असंच करायचें ! पण सध्यां आज किंवा उद्यांच शेटजींच्या घरीं चोरी केली पाहिजे याची काय वाट ! आणखी चोरी उघडकीला आली तर आपल्याला शिक्षा भोगावी लागून वाडवडिलांच्या कीर्तीला कलंक लागेल याचा विचार ! एकदां तुरुंगांत पडल्यावर पैसेही नाहींत आणखी जिच्यासाठीं येवढें साहस करायचें त्या शिरीनलाही आपण मुकणार ! छे, ही भयंकर कल्पना नाहीं बोवा आपल्याला पसंत. ”

अशा नानाप्रकारच्या परस्परविरोधी कल्पनांच्या एकसारख्या बदलत राहणाऱ्या तरंगानीं त्यावेळीं माझें चित्त अगदीं भ्रमून गेलें होतें; व “ तूं म्हणतेस तें आपल्या हातून कांहीं बुवा होणार नाहीं ” असें मी शिरीनला सांगणार होतों; पण इतक्यांत एकाएकीं अविचारी मनोवृत्तीच्या उच्छृं-खलपणामुळें माझ्या तोंडांतून भलतेच शब्द निघून गेले ! “ प्यारी शिरीन ” आपल्या खिशांत असलेल्या नोटा काढून त्या व बगलेंत अस-लेली ती पेटी तिच्या हातांत देऊन मी म्हणालों, “ सध्यां हे दोन जिन्नस आणले आहेत हे घे; आणखी उद्यां यावेळेला मीं तुझ्या हुकुमाप्रमाणें

दहा हजार रुपये घेऊन येईन. अग, दहा हजार रुपड्यांची विशाद ती काय ! तुझ्या प्रेमासाठीं, तुझ्या सुखासाठीं मी पाहिजे तसलं साहस करायला आतां मागें पुढें पाहणार नाहीं. पण माझ्या ठिकाणीं जडलेलं तुझं प्रेम मात्र असंच टिकलं पाहिजे ह्मणजे माझ्या जन्माचं सार्थक झालं असं मी समजेन ! ”

असें ह्मणून मीं तिच्या हाताचें चुंबन घेतलें ! पण लागलीच, आपण हें भलतेंच बोलून गेलों असें मनांत येऊन मला पश्चात्ताप वाटूं लागला ! कंकणांच्या पेटीवरील अक्षराविषयींची शंका आतां माझ्या मनांत एकदम उद्भवून पेटी इतक्यांत आपण तिला उगीच दिली असें वाटलें, व तिला त्या अक्षराबद्दलची कांहीं माहिती असल्यास पहावी ह्मणून मीं तिला विचारलें “ शिरीन, या तुझ्या पेटीच्या वरच्या बाजूला आणखी आंतल्या अंगाला कांहीं इंग्रजी अक्षरें खोदलेलीं आहेत तीं तुला माहीत आहेत कां ? ”

“ ह्मणजे ! ” तिरस्कारसूचक आवाजानें ती उद्गारली, “ माझ्याच नांवाचीं तीं अक्षरें—एम, एस, ह्मणजे ‘ मिस शिरीन ’—असून तीं मला माहीत आहेत कां ह्मणून काय विचारतां ? मी कांहीं ही पेटी दुसऱ्या कोणाच्या घरून चोरून आणिली नाहीं. ही माझ्या बाबांनीं माझी हिऱ्यांचीं कंकणें ठेवण्यासाठीं ह्मणून मुद्दाम तयार करविलेली आहे. कां, तुझाला त्यांत इतकं आश्चर्य कसलं वाटलं ? ”

“ छे, ह्मणण्यासारखं आश्चर्य नाहीं कांहीं त्यांत ! पण मी तुला अशी विनंति करीतों कीं, ही पेटी आजच्या दिवस तूं माझ्याजवळच राहूं दे; कारण तिच्याबद्दल थोडीशी भानगड उत्पन्न झाली आहे; तेव्हां मी ह्मणतों कीं, थोडक्यासाठीं कशाला उगीच भलत्याच यातायातींत पडा ! त्या पेटीसंबंधानं आपल्यावर आज उद्यां केव्हांना केव्हां तरी कांहीं भयंकर अरिष्ट येणार अशी मला फार भीति वाटत आहे. ह्मणून तीं निदान आज तरी तूं नेऊं नको. ”

असें ह्मणून मी तिच्या हातामधून ती पेटी ( तिच्या मर्जीविरुद्ध ) घेऊं लागलों तोंच आमच्यापासून थोड्या अंतरावर कांहीं कुजबुजल्याचा आवाज माझ्या कांनीं आला ह्मणून तिकडे मी आपली दृष्टी वळवून पाहूं

लागलों व शिरीनच्या हातांतून ती पेटी आपल्या हातांत घेतली. तोंच माझ्या मागल्या बाजूनें एक इसम मोठ्या कर्कश आवाजानें ' अरे हरामखोरा, आतां पेटी घेऊन जातोस कुठें ! एक पाऊल टाकलेंस कीं, तुझी शंभर वर्षें भरलींच म्हणून समज ! ' असें ओरडून माझ्या अंगावर धावून आला !

---

# प्रसंग १२ वा.

त्या माणसानें उच्चारलेले हे भयंकर शब्द कानीं पडतांच मी एकाएकीं अगदीं गर्भगळीत होऊन गेलों ! माझें सर्व अवसान गळून गेलें; व शरीराला एकदम दरदरून घाम फुटला. भयानें हातपाय लट्लट् कापूं लागले. आपला कांहींएक अपराध नसतांना आपल्यावर चालून येणारा हा माणूस आहे तरी कोण हें मागें वळून पाहण्याचें देखील धैर्य माझ्यामध्यें उरलें नाहीं. मग असल्या त्या अडदांड, जंगली पशूवर चाल करून जाण्याचें नांव कशाला !

आतां तो भयंकर मनुष्य माझ्यापुढें येऊन उभा राहिला ! त्याला पाहतांच मला एकदम घेरी येऊन माझे डोळे मिटले; पण त्या जंगली माणसानें माझा हात धरितांच मी सावध झालों व त्याच्याकडे भीत भीत पाहूं लागलों ! त्याचें तें भीषण स्वरूप—त्याचा काळाकुट्ट काजळ फांसल्यासारखा चेहरा, ते धिप्पाड मजबूद उघडें बंब शरीर—माझ्या डोळ्यापुढें मधून मधून आलें म्हणजे अजूनही त्याची मला भीति वाटल्यावांचून रहात नाहीं ! त्याच्या उजव्या हातांत एक भली मोठी थोरली काठी होती; आणि तिच्या एका बाजूला भाल्याच्या टोंकासारखें कांहींतरी बसविल्यासारखें दिसत होतें. ती काठी त्यानें आपल्या डाव्या हातांत घेतली व उजव्या हातानें माझा हात धरिला.

हा एकंदर भयंकर प्रकार पाहून शिरीनही बरीच भयभीत होऊन गेली असावी असें दिसत होतें; तरी पण आश्चर्य असें कीं, ती आपल्या जागेवरून यत्किंचितही हलली नाहीं ! हा दांडगा मनुष्य बहुतकरून

पहिल्यानें शिरीनला मारहाण करील असें मला वाटत होतें; पण तसें त्यानें कांहींएक केलें नाहीं. तो आमच्याजवळ येतांच जसा कांहीं दोघांचा पूर्वीपासूनच कांहीं संकेत ठरला त्याप्रमाणें शिरीननें आपण होऊन आपल्या हातांतल्या पाचशें रुपयांच्या नोटा त्याच्या स्वाधीन केल्या. मला इतका घाबरलेला पाहून तिला दुःख होईल, आपल्यावर एवढें अरिष्ट आलेलें कळतांच स्त्रीजातीच्या स्वभावाला अनुसरून शिरीन मोठमोठ्यानें ओरडेल, निदान तेथून पळून जाण्याचा तरी यत्न करील असें मी समजत होतों. आणि त्याप्रमाणें घडलें असतें तर तिच्या सरक्षमानी अशी फजिती तरी झाली नसती ! पण तसें कांहीं एक झालें नाहीं !

त्या चोरानें माझा हात धरल्याबरोबर शिरीन वेड्यासारखी माझ्याकडे पहात एकसारखी मोठ्यानें हंसूं लागली ! " हं भलत्याच वेळीं अशी हंसतेस काय ! " असें तिला भासविण्याच्या हेतूनें मी तिच्याकडे डोळे वटारून पाहूं लागलों; व त्या माणसाची दृष्टी चुकवून शिरीनकडे पाहून तिनें पळून जावें यासाठीं मला तशा स्थितींत आपल्या एका हातानें व डोळ्यांनीं जेवढ्या खुणा करणें शक्य होतें तेवढ्या मीं तिला करून दाखविल्या ! पण त्यांचा कांहींच उपयोग झाला नाहीं ! तशा स्थितींत तिला मीं डोळ्यांनीं केलेल्या खुणा रात्रीची वेळ असल्यामुळें समजल्या नसाव्या असें मला वाटलें; पण माझ्या खुणा पाहून ती तर अधिकच हंसूं लागली ! हें पाहून मात्र मी अतीशय रागावलों ! पण माझ्या त्या रागाचें त्यावेळीं कांहीं चालण्यासारखें नव्हतें; कारण त्या माणसापुढें आपण जर कांहीं गडबड केली तर त्या काठीनें तो आपला कपाळमोक्ष केल्याशिवाय राहणार नाहीं असें वाटून मी तसाच निमूटपणानें काय काय नशीबीं असेल तें सहन केलेंच पाहिजे असें मनांत म्हणत उभा राहिलों !

यावेळीं मदिरेचा अंमल मला चांगलाच भासूं लागला होता; त्यामुळें मला नानाप्रकारचे भास होत होते; व तऱ्हतऱ्हेच्या कल्पनांनीं मन अगदीं भांबावून गेलें होतें ! आतां हा माणूस आपलें करणार तरी काय ? आपल्याला मारून हा जर शिरीनला घेऊन पळाला तर याचें काय घ्या ! आपल्याला मार खावा लागून शेवटीं शिरीनलाही तो

पळवून नेणार ! पण आपणच जर त्याच्याशीं मारामारी करून शिरी-नला सोडवून नेली तर ? छे, इतक्या मजबूद माणसापुढें आपल्या सारख्याचें काय चालणार ! पण पहावा थोडासा यत्न करून असें मनांत येऊन मी त्याच्या हाताला हिसका देण्याच्या बेतांत होतों; पण ही गोष्ट अगोदरच त्याच्या लक्षांत येऊन त्यानें माझा हात पहिल्या-पेक्षां अधिक जोरानें दाबून धरिला ! व आपली काठी जमीनीवर टाकून एका हातानें त्यानें माझें तोंड घट्ट दाबून धरिलें आणि माझ्या अंगावर मोठ्यानें ओरडून तो म्हणाला " खबरदार ओरडलास तर ! आतांच्या आता प्राणाला मुकशील ! " इतक्यांत त्याची चर्या एकाएकीं कावरी-बावरी होऊन गेल्यासारखी दिसूं लागली. हें पाहतांच मला मोठें आश्चर्य वाटलें, व किंचित् समाधानही झालें. वास्तविक पाहिलें तर त्या ठिकाणीं मी, शिरीन व तो जंगली मनुष्य या तिघांवांचून त्यावेळीं कोणीही नव्हतें. आमच्यापासून बऱ्याच अंतरावर दुसरीं कोणी माणसें असलीं तरी मला निदान तीं त्यावेळीं माहीत नव्हतीं. अशा स्थितींत आम्हां दोघांपेक्षां कितीतरी बलवान् व धाडसी असलेल्या त्या रानटी मनुष्याची चर्या ययभीत होण्याचें कांहीं कारण नव्हतें; आणि यामुळेंच मला त्या गोष्टीचा मोठा चमत्कार वाटला. याला कोणाची तरी चाहूल लागल्यामुळेंच हा असा कावराबावरा होऊन गेला असावा, व आतां कदाचित् तो येथून पळून गेला तर आपल्यावरील संकट अनायासेंच नाहींसें होईल. या कल्पनेनें मला किंचित् आनंद झाला होता. माझा हात सोडून तो मनुष्य आतां तीक्ष्ण दृष्टीनें आपल्या आसपास पाहूं लागला. तोंच आमच्या पुढल्या बाजूनें कोणी तरी तीन माणसें येत आहेत असें मला वाटलें. तीं माणसें मोठ्या झपाट्यानें आमच्याकडे येत होतीं. तीं लांब होतीं तोंपर्यंत त्यांच्याबद्दल कांहींच अनुमान करितां येईना; पण जवळ जवळ येतांच तीं कोण असावीं यासंबंधानें मला कल्पना येऊं लागली. ते तिघेही पुरुष होते व त्यांना मी कोठेतरी कोणत्याचवेळीं पाहिलें आहे असें मला वाटूं लागलें ! ते आमच्या जवळ येतांच शिरीन मोठमोठ्यानें हंसूं लागली. त्यापैकीं एकाला तर मी चांगलेंच ओळखिलें ! पण त्यांना पाहतांच शिरीन का हंसली हें मात्र मला समजलें नाहीं.

तिघांच्याही अंगावर साहेबी चालीचे पोषाख दिसत होते व त्यापैकीं जो मला ओळखीचा वाटत होता त्याची व माझी दृष्टादृष्ट होतांच भीतीनें माझे हातपाय एकाएकीं लटपटूं लागले. हीं तीन माणसें आमच्यापासून कांहीं अंतरावर होतीं तेव्हां आपल्याला त्यांचें सहाय्य मिळून आपण त्या जंगली माणसाच्या तावडींतून सुटूं अशी मला मोठी आशा वाटत होती! त्यांच्यापैकीं एक मनुष्य माझ्या माहितीचा होता यामुळें खरें झटलें तर माझें मन अधिकच निर्धास्त व्हावयाला पाहिजे होतें; पण तसें कांहींएक न होतां त्या ओळखीच्या मनुष्याला पाहतांच हा आपला शत्रू पिरोज तर नसेल ना! असें वाटून माझें मन उलट अधिक भिऊन गेलें. यापेक्षां त्या चोरानें आपल्याला मारलें असतें, लुटलें असतें तरी पत्करलें असतें; पण मध्येंच हें विघ्न आलें, आतां आपली काय अवस्था होईल ती होवो असें वाटून मी अधिकच भिऊं लागलों! त्या तिघांच्याही हातांत मोठमोठ्या काठ्या होत्या; व ते आतां आह्माला मारहाण केल्यावांचून कांहीं सोडीत नाहींत असें त्यांच्या चर्येवरून आतां मला स्पष्टपणें कळून चुकलें! पण या बाबतींत मीं केलेलें अनुमान चुकलें. कारण त्या तिघांपैकीं एकानेंही आह्माला बिलकुल इजा केली नाहीं ह्मणून त्यांच्या सहाय्यानें आपलें रक्षण होईल अशी आशा वाटून दीनपणानें मी त्यांना ह्मणालों, "सद्गृहस्थहो, आपला व आमचा परिचय नाहीं; व आपल्याला आह्मी कोणत्याही कामीं तसदी देणें इष्ट नाहीं हें खरें आहे. तरी आह्मी यावेळीं मोठ्या संकटांत सांपडलों आहों तेव्हां आपण जर कृपा करून आह्माला त्यांतून वाचवालं तर आमच्यावर आपले मोठे उपकार होतील."

त्या तिघा माणसांपैकीं एकाला मीं पुष्कळवेळां पाहिल्यासारखें मला वाटत होतें; पण ते आतां आमच्यापुढें उभे राहिले असल्यामुळें त्यांच्याकडे मीं बराच वेळ पाहिल्यानंतर दुसरे दोन गृहस्थही आपल्या कांहींतरी दृष्टीस पडले आहेत असें माझ्या लक्षांत आलें! त्यापैकीं जो माझ्या बऱ्याच परिचयाचा असल्याचें मला स्मरण होतें तो मनुष्य लागलीच त्या चोराजवळ गेला व बारीक आवाजानें कांहींतरी पुटपुटल्याचा मला भास झाला. तोंच पेटी व नोटा शिरीनजवळ टाकून तो जंगली मनुष्य तेथून

एकदम निघून गेला. हें पाहून मी फार विस्मित झालों ! माझ्या बोल-ण्याकडे त्यांनीं लक्ष्य दिलें नाहीं असें समजून मी पुन्हा त्यांना विनंती करणार होतों; पण तो रानटी मनुष्य निघून गेल्यामुळें आतां आपण निर्भय झालों असें मला वाटूं लागलें; आणि शिरीनजवळ पडलेली पेटी व नोटा मीं हातांत उचलून घेतल्या. आतां येथें एक क्षणभरही न थांबतां शिरीनला बरोबर घेऊन निघून जावें अशा विचारांत मी होतों; तों इतक्यांत शिरीन, शिरीनबाई, अहो पिरो-जशेट, धांवा हो धांवा ! असे मोठमोठ्यानें उच्चारलेले शब्द आमच्या कानीं आले ! हें ऐकतांच शिरीन एकाएकीं घाबरल्यासारखें करून कांपऱ्या आवाजानें ह्मणाली, " अगबाई ! हा माझ्या ल्यूसीचाच शब्द बरं ! आतां इथून पळून गेलेल्या मेल्या चोरानें तर नसेलना तिला गांठली ! कोणत्या संकटांत सापडली असेल बिचारी कोण जाणे. पि....रो...ज, चला आपण तिच्या मदतीला जाऊं ! "

आह्मांला ऐकूं आलेल्या आवाजावरून तो शब्द ल्यूसीचाच असावासें मलाही वाटलें. व ल्यूसीची दया येऊन लागलीच पेटी व नोटा मीं शिरीनच्या स्वाधीन केल्या, व ल्यूसीच्या रक्षणासाठीं जावें असें लाग-लीच ठरविलें; पण थोडा विचार करून पाहता शिरीनला रात्रीच्या वेळीं एकटी टाकून आपण जाणून बुजून चोराच्या तावडींत सांपडून आपला जीव विनाकारण धोक्यांत घालणें हें मला बरें वाटेना ह्मणून— ल्यूसीच्या आरोळ्या वरचेवर ऐकूं येत होत्या तरी तिकडे लक्ष्य न देतां— मीं ती कल्पना मनांतून घालविली; आणि आतां आपण येथून निघून जाऊं असें शिरीनला सांगणार तोंच " आह्मी दोघें इतक्यांत तिकडून जाऊन येतों तोंपर्यंत माझी पेटी आणि नोटा इथेंच पडल्या आहेत त्या नीट जपून ठेवा नाहीं तर दुसरेंच कोणी तरी चोर येऊन त्या घेऊन जाईल " असें ह्मणून शिरीन त्या तिसऱ्या मनुष्याचा—जो मांझ्यां विशेष ओळखीचा वाटत होता व ज्याला पाहतांच मी घाबरून गेलों होतों त्या मनुष्याचा—हात धरून मोठ्या लगबगीनें तेथून निघून गेली ! हें पाहतांच मी तर अगदीं थक्क झालों ! हा चमत्कार आहे तरी काय असें मनांत येऊन मी वेड्यासारखा इकडे तिकडे पाहूं लागलों ! व

अधिकच घाबरून जाऊन मोठ्या बुचकळ्यांत पडलों ! साहेबी थाटाचा पेहराव केलेले हे इसम कोण असावे; व यावेळीं त्या माझ्या विशेष ओळखीच्या वाटणाऱ्या मनुष्याचा हात धरून शिरीन कां निघून गेली, हें काय गौडबंगाल आहे हें मला समजेना ! अशा स्थितींत शिरीनला त्या परक्या माणसाबरोबर जाऊं देणें धोक्याचें आहे असें वाटून मी पेटी व नोटा न घेतां त्यांच्या मागोमाग पांचपन्नास पावलें गेलों आणि शिरीनला हांका मारून आर्जवीस्वरानें तिला ह्मणालों " शिरीन, तुझ्यासाठीं मी पाहिजे तें करितों; पण कसेंही करून यावेळीं तूं परत ये ! असल्या रात्रीं भलतीकडे जाऊन तुझा जीव विनाकारण धोक्यांत कां बरें घालतेस ? "

माझ्या ह्मणण्याप्रमाणें परत न येतां तिनें उत्तर केलें, " माझी तुह्मी मुळींच काळजी करूं नका. मी थोड्याच वेळांत माझ्या ल्यूसीला चोरांच्या हांतून सोडवून आणितें; पण माझ्या त्या नोटा, कंकणांची पेटी आणखी तुमची व माझी पहिल्यानें गांठ पडली त्यावेळीं मी आपल्या गळ्यातून काढून तुह्माला दिलेली ती माझी मोत्याची माळ मात्र नीट संभाळून ठेवा हो ! त्या जर जिनसा माझ्या मला मिळाल्या नाहींत तर उद्याच आपल्या दोघांवर मोठा कठीण प्रसंग येईल. आणखी नकतेच वचन दिल्याप्रमाणें उद्यां तुह्मी जरी मला दहा हजार रुपये आणून दिलेत तरी त्यांचा फारसा उपयोग होणार नाहीं. तेव्हां तुह्मी आतां वेड्यासारखे माझ्या मागें न येतां त्या माझ्या पांचशेंच्या नोटा आणि ती माझी कंकणांची पेटी नीट जपून ठेवा. मी ही आतां आलेच पहा ! "

" पण शिरीन, " तिला दिलेल्या वचनाची आठवण होऊन मी बराच गोंधळून गेलों व ह्मणालों, " परक्या गृहस्थांच्या समक्ष बोलणं कांहीं चांगलं नाहीं; पण माझ्याच्यानं आतां कांहीं रहावत नाहीं ह्मणून मी निरुपायानं तुला सांगतों कीं, उद्यां दहा हजार रुपये आणून देण्याचं काम माझ्या हातून होणं कठीण आहे. याशिवाय तूं ह्मणशील तें करायला मी तयार आहे; पण या गोष्टीबद्दल मात्र तूं कसंही करून मला क्षमा कर. आपल्यावर येऊं पाहणाऱ्या प्रसंगांतून बिनधोकपणें निभावण्याची मी एक चांगली युक्ति काढली आहे, ती तूं जर आतांच्या आतां इकडे

आलीस तर मी तुला लागलीच सांगेन. तुझ्याबरोबर असलेले गृहस्थ तुझ्या ल्यूसीला चोराच्या हातून सोडविण्याला समर्थ आहेत, पाहिजे तर त्यांच्या मदतीला मी जातों; पण अविचारानें तूं आपला जीव संकटांत घालूं नको. नाहीं तर नोटा व पेटी घेऊन मी तुझ्याबरोबर येतों; पण मी येईपर्यंत मात्र तूं पुढें जाऊं नको."

"शिरीन," तिच्याबरोबर असलेला गृहस्थ तिला ह्मणाला "हा कुठला भित्रा मनुष्य, आज तूं आपल्या बरोबर आणला आहेस? या ठिकाणीं रोज शेंकडों माणसें हवा खायला येतात आणखी तीं रात्रीं अपरात्रीं देखील इथें हिंडतात. अशा ठिकाणीं चोरांची किंवा दुसरी कसली भीती कधीं कोणाला देखील वाटत नाहीं. ल्यूसीला थंडी-बिंडी वाजत असेल नाहीं तर घेरी आली असेल; पण आपल्यावर मोठं थोरलं कांहीं तरी संकट आलं आहे असं वाटून हा भित्रा मनुष्य तुला विनाकारण भिवावितो आहे याला काय ह्मणावं!"

हें त्याचें बोलणें मला चमत्कारिक वाटलें; कारण, आह्मांला लुटण्यासाठीं आलेला चोर नुकताच त्या बाजूनें गेला होता व त्यानेंच ल्यूसीला अडविलें असलें पाहिजे अशी मला खात्री वाटत होती. पण तो गृहस्थ व शिरीन आतां माझ्यापासून बऱ्याच अंतरावर गेलीं असल्यामुळें पुढें त्यांचें बोलणें काय झालें हें मला ऐकूं आलें नाहीं!

शिरीननें बजावल्याप्रमाणें पेटी व नोटा न घेतां हळूंच शिरीनच्या मागोमाग जावें तर कदाचित् तिच्या ह्मणण्याप्रमाणें त्या वस्तू नाहींशा झाल्या आणि ती रागावली तर? बरें, तो गृहस्थ ओळखीचा वाटत असला तरी त्याच्याबरोबर शिरीनला जाऊं देणं देखील कांहीं शहाणपणाचें नव्हे! माझ्यासारखाच तो कोणी लबाड मनुष्य असला तर शिरीनला हाकेचा भेदरीनें हाकेच्या युक्तिप्रयुक्तीनें—तिच्यासाठीं आपण हवें तें साहस करायला तयार होऊनही शेवटीं मधल्यामध्यें तोच तिला पळवून न्यायचा! असें झालें ह्मणजे इकडे मोठ्या मिनतवारीनें नरशंकरशेटजीपासून मागून आणिलेले पांचशें रुपये व कहानजीशेटजींनीं केलेल्या वर्णनाशीं हुबेहूब जुळणारी पण जी आपल्या मालकीची असल्याबद्दल शिरीननें मला वरचेवर बजावलें होतें अशी ती मौल्यवान

कंकणांची पेटी आपल्या हातीं आली असतांना कोणाच्या तरी हातीं लागायची; आणि येवढें कारस्थान करून देखील शिरीन ही त्या मनुष्यानें (आणखी तो आपला शत्रू पिरोजच नसेल असें तरी कशावरून?) पळवून नेल्याबद्दल दुःख करीत बसण्याचा प्रसंग यावयाचा! अशा मोठ्या फिकिरींत मी पडलों!

यावेळीं शिरीनपेक्षां तिनें केलेल्या आज्ञेलाच अधिक महत्व दिलें पाहिजे असें शेवटी ठरवून दुसरे दोघे इसम बसले होते त्या ठिकाणीं पडलेल्या नोटा व पेटी चटकन आपल्या हस्तगत करून लागलीच शिरीन गेली होती तिच्या मागोमाग जावयाचें अशा निश्चयानें मी मागें वळून पूर्वीच्या ठिकाणीं आलों. त्या ठिकाणीं दोन तीन बाकें होतीं व त्यांपैकीं एका बाकावर ते दोघे गृहस्थ आम्ही तेथून पलीकडे जात असतांना बसले होते हें मला माहीत होतें. पण आश्चर्य असें कीं, मी त्या जागीं जो परत येऊन पाहतों तों तेथें कोणीच दिसलें नाहीं. त्याचप्रमाणें तेथें असलेल्या नोटा व पेटीही पण कोठें आढळली नाहीं!! आतां मात्र मी अगदींच भांबावून गेलों. येथें बसलेले दोघे गृहस्थ कोण होते; शिरीनची व त्यांची ओळख कोठली; शिरीन व मी इतक्या गुप्तपणानें येथें आलों असून यावेळीं शिरीन अमक्याच ठिकाणीं आहे ही बातमी त्यांना लागली तरी कशी; व तेथें पडलेल्या वस्तू एकाएकीं नाहींशा झाल्या; आणि शिरीन किंवा तिच्याबरोबर गेलेला तो तिसरा इसम परत येण्यापूर्वीं ते दोघे गृहस्थ तेथून चालते झाले, या दोन्ही गोष्टींचा परस्परांशीं कांहीं संबंध आहे कीं काय याबद्दल माझा कांहींच तर्क चालेना! मनांत नानाविध कल्पना येऊं लागल्या. आसपासच्या बऱ्याच अंतरापर्यंत पुष्कळ शोधून पाहिलें; पण जिनसा कांहीं केल्या सांपडेनात! ते दोघे गृहस्थ कोठें तरी आजूबाजूला फिरत असतील; नाहींतर जवळ आसपासच्या एखाद्या ठिकाणीं जाऊन बसले असतील अशा कल्पनेनें मीं इकडे तिकडे हिंडून बारकाईनें शक्य तितका तपास केला; झाडांच्या सावलींत जाऊन पाहिलें; जागोजागीं मनुष्यांना बसण्यासाठीं केलेलीं ठिकाणें धुंडाळलीं; पण व्यर्थ! त्यावेळीं बरीच रात्र झालेली असल्यामुळें मला तेथें कोणी चिटपाखरूं देखील दिसलें नाहीं.

झाडांच्या निरनिराळ्या आकारावरून ठिकठिकाणीं मनुष्यांची आकृती दिसत असल्याचा मला मधून मधून भास होई. पण हा माझा केवळ भ्रम होता असें त्या त्या आकृती प्रत्यक्ष पाहिल्यानंतर मला कळून आलें ! आणखी लांब जाऊन त्यांचा शोध करावा असें एकदां मनांत आलें होतें; पण शिरीन लवकरच परत येणार आहे व ती आल्यावर आपण येथें नाहीं असें तिला आढळून आलें ह्मणजे आपण तिला फस-विलें असें होऊन तिला अतोनात दुःख होईल; त्याअर्थी आतां पाहिजे तें झालें तरी हरकत नाहीं पण ती परत येईपर्यंत येथून हलायचें ह्मणुन नाहीं असा दृढनिश्चय करून तेथल्या एका बाकावर मी स्वस्थ बसलों !

अशा स्थितींत मध्येंच--आसपास कोणाची तरी चाहूल झाल्याचा मला भास होत होता; ह्मणून आपल्या जागेवरून उठून मी इकडे तिकडे पाहूं लागलों तरी मला कोणीही दिसलें नाहीं. अशा रीतीनें बराच वेळ गेल्यानंतर आपल्यापासून कांहीं अंतरावर कोणी बोलत आहे; व शिरीन आणि तिच्या सोबतीसाठीं गेलेला मनुष्य बहुधा आतां परत येत असेल असें वाटलें; पण हा देखील माझा भ्रमच होता असें मला कळून आलें. तरी मनुष्याचा आवाज ऐकूं येणें कांहीं बंद झालें नव्हतें. मधून मधून वाऱ्याची झुळूक येत असल्यामुळें तें बोलणें अगदीं स्पष्टरीतीनें ऐकूं येत नव्हतें; तरी जे कांहीं शब्द स्पष्टपणानें माझ्या कानीं आले ते असे होते. “ तसल्या चोरांचें यावेळीं तर चांग-लेंच फावतें....या....मुंबईंत....बिलंदर चोरांनीं अलीकडे फार अनर्थ मांडला आहे....त्यांपैकीं कांहींजण सांपडले आहेत...पण....तुह्माला खात्री आहेना ?....आतांच्याआतांच त्यांना आपण पकडूं....पण...माझा भोळा...भाबडा, गांवढळ मित्र अगदीं निरपराधी असून...त्याच्या मूर्ख-पणानें....त्यांच्या....जाळ्यांत सांपडून...बिचारा....नागविला जात होता....आतां तुमची गांठ पडली नसती....आणखी....आपले....लोक....भागले नसते तर बिचाऱ्याची....दुर्दशा उडविली असती....असल्या नागाडयांनीं या...मुंबईत मोठ्या बेतानें वागावें लागतें. ”

इतके शब्द मला चांगले ऐकायला सांपडले. पुढें कांहीं वेळ कांहींच ऐकूं आलें नाहीं व पुन्हा वटोलंबंवों कहानमी शब्दांनीं सांगितलेला

हकीकतीपैकीं कांहीं भाग ऐकूं आला. यावरून शिरीन, ल्यूसी व तो गृहस्थ, नुकत्याच पळून गेलेल्या चोराबद्दल व पेटीबद्दल बोलत येत आहेत; व तो वृत्तांत शिरीन ल्यूसीला समजावून सांगत आहे; पेटीविषयीं माझ्या मनांत आलेली शंका मीं तिला अर्धवट कळविल्यावरून त्या बाबतींत तिच्या मनांत येत असलेल्या भलभलत्या कल्पना ती ल्यूसीपाशीं बोलून दाखवीत आहे असें मी अनुमान काढलें; व या पेटीच्या घोटाळ्यानें पुढेंमागें दुर्दैवानें आपल्यावर एखादा भयंकर प्रसंग ओढवला तर शिरीनची व आपली नसती विडंबना होऊन दोघांवरही मरणप्राय दुःख भोगीत बसण्याची पाळी येऊं नये यासाठीं शिरीन परत येतांच नोटा व पेटी तिच्या स्वाधीन करून लागलीच शिरीनला घेऊन चालतें व्हावयाचें असा विचार करीत तिची मी वाट पहात होतों. पेटी व नोटा नाहींशा झाल्या ही गोष्ट शिरीनच्या भेटीविषयीं आतुर होऊन गेलेल्या माझ्या मनांतून तेवढ्या वेळापुरती तरी कशी नाहींशी झाली असेल याचें मला आश्चर्य वाटतें ! असो.

शिरीनची कंकणांची पेटी व त्या नोटा अजून देखील मला सांपडल्या नव्हत्या. नाहीं म्हणायला, शिरीननें मला दिलेली मोत्याची माळा मात्र जी पहिल्या दिवसापासून मी आपल्या गळ्यांत घालून ठेविली होती ती अद्याप माझ्याचपाशीं आहे, व तेवढी तरी आतां शिरीननें आपल्यापाशीं मागितल्याबरोबर आपण देऊन टाकूं असें मी समजत होतों; पण गळ्याला हात लावून पाहतों तों ती माळ देखील आपल्याजवळ नाहीं असें मला आढळून आलें ! पेटी व नोटा नाहींशा झाल्याबद्दल अगोदरच मला फार वाईट वाटत होतें; आणखी तिची ती माळही आपल्यापाशीं नाहीं असें समजून येतांच मला फार दुःख झालें. शिरीन परत येतांच तिनें त्या तीन जिनसाबद्दल जर आपल्याला विचारलें तर तिला आतां काय उत्तर द्यावें या विवंचनेंत मी पडलों !

इतक्यांत एका गोष्टीची आठवण झाल्यासारखें मला वाटलें. तो रानटी मनुष्य शिरीन व मी बसलों होतों त्या जागीं येण्यापूर्वीं शिरीननें माझ्या गळ्यांत हात घातला होता; व माझ्या गळ्यांत असलेली तिची माळ तिच्या हाताला लागतांच ती एकाएकीं दचकल्यासारखें करून मला

ह्मणाली " खरंच पिरोज, ही माळदेखील माझ्या आईचीच आहे हो ! कंकणांच्या पेटीबरोबरच ही माळदेखील मी तुझ्यासाठीं चोरूनच आणिली आहे ! आणखी ती सुद्धां उद्यांच्या उद्यां मला आईपाशीं नेऊन दिली पाहिजे ! " हे तिचे शब्द ऐकतांच मी बराच गोंधळून गेलों; व ती माळ तिला देऊं नये असें मला वाटूं लागलें; पण ती वस्तु तिचीच असून ती ज्याअर्थी इतक्या प्रेमानें आपल्यापाशीं मागत आहे त्याअर्थी नाहीं ह्मणणें हें कांहीं चांगलें नाहीं असें वाटून ती घेण्याविषयीं मी तिला आपली संमती दिली; आणि तिनें आपल्याच हातानें ती चट्कन् काढून आपल्या गळ्यांत घातली.

तिच्या इच्छेप्रमाणें माळ तिला द्यावी कीं नाहीं याबद्दल माझ्या मनाचा त्यावेळीं जो घोंटाळा होऊन गेला होता त्याचें कारण कांहीं वेगळेंच होतें. त्यादिवशीं संध्याकाळीं हॅंगिंगगार्डनमध्यें शिरीनला भेटण्यासाठीं नंदशंकरशेटजींच्या घरून मी निघण्यापूर्वी त्यांच्याकडे आलेल्या कहानजीशेटजींच्या बोलण्याचें मला एकाएकीं स्मरण झालें. कंकणाबद्दल व पेटीबद्दल नंदशंकरशेटजीपाशीं त्यांनीं जें कांहीं सांगितलें होतें तें मीं चांगलें ऐकलें होतें, पण ते दोघे घरांतून बाहेर जातांना त्यांचें जें कांहीं बोलणें चाललें होतें त्याकडे शिरीनला भेटण्यासाठीं मी मनस्वी उतावीळ होऊन गेल्यामुळें माझें फारसें लक्ष नव्हतें; तरी कहानजीशेटजींच्या तोंडून " मोत्यांची माळ " असे शब्द निघालेले आपण ऐकले आहेत असें मला वाटलें. पण त्याचा संबंध ध्यानांत न आल्यामुळें मी त्यांचा विचार न करितां हॅंगिंगगार्डनकडे जाण्याची तयारी करण्यासाठीं चट्कन् माडीवर निघून गेलों ! मोत्याच्या माळेबद्दलची हकीकत यावेळीं एकाएकीं मला आठवली व शिरीननें ती माळ आपल्यापासून अगोदरच परत घेतली असूनही नोटा, पेटी व माळ नीट जपून ठेवण्याविषयीं तिनें कां सांगितलें याचें मला मोठें आश्चर्य वाटलें ! पण माळ तिच्याचपाशीं आहे ही गोष्ट ती जाण्याच्या गर्दीमध्यें कदाचित् विसरली असेल अशी कल्पना करून मीं त्या गोष्टीचा फारसा विचार केला नाहीं. पेटी व नोटा नाहींशी झाल्यामुळें यावेळीं माझ्या मनाला मोठी हुरहुर लागून राहिली होती; व

त्यासंबंधानें आतां काय करावें या विचारांत मी गर्क होऊन गेलों होतों. इतक्यांत मी ज्या बांकावर बसलों होतों त्याच्या जवळच पडलेल्या एका वस्तूकडे माझें लक्ष गेलें; ह्मणून तिच्याजवळ गेलों व पाहतों तों ती वस्तु शिरीनच्या कंकणांची, इतका वेळ सांपडत नसलेली पेटी होय असें मला आढळून आलें. पेटी पाहून समाधान झालें; आणि ती मी सहज उघडून पाहिली तों तिजमध्यें एक माळ, एक हिऱ्यांची अंगठी, दोन हिऱ्यांचीं कंकणें, आणि मी नंदशंकरशेटजीपासून पांचशें रुपायांच्या नोटा ज्यामध्यें गुंडाळून आणिल्या होत्या तो जाड कागद इतक्या वस्तु मला सांपडल्या. त्या पाहून माझ्या मनाची काळची बरीच नाहींशी झाली. आतां तेवढ्या नोटा सांपडल्या ह्मणजे झालें असें मी मनांत ह्मणालों व त्या सोधण्यासाठीं पुन्हा मी इकडे तिकडे पाहूं लागलों. तों आसपास बरीच आरडाओरड ऐकूं येऊन माझ्या भोंवतीं एकाएकीं दहा पंधरा माणसें गोळा झालीं व तीं आपल्यावर आतां तुटून पडणार असें वाटून मी अतीशय घाबरून गेलों !

---

## प्रसंग १३ वा.

माझ्या भोंवतीं जमलेल्या माणसांपैकीं दोघां इसमांच्या डोक्यावर मोठमोठीं दोन गाठोडीं होतीं. शिरीन, ल्यूसी, माणेकबाई, पिरोज, व पिराजी हीं मंडळीदेखील त्या घोळक्यांत दिसत होतीं—नव्हे त्यांच्यासाठीं बाकीचीं माणसें त्यावेळीं तेथें जमलीं होतीं—असें वस्तुस्थितीचा विचार करितांच माझ्या ध्यानांत आलें. त्या पांच माणसांच्या दंडाला काढण्या बांधिल्या होत्या व त्या हातांमध्यें धरून पांच मोठमोठ्या धिप्पाड माणसांनीं त्यांना मी होतों त्याठिकाणीं आणून उभे केलें ! हें काय कोडें आहे याचा मला मुळींच उमज पडेना !

शिरीन, ल्यूसी, माणेकबाई, पिरोज, व पिराजी, “ महाराज, आह्मां निरपराध्यांना कां बरं धरिलंत. आह्मी सहज इकडे फिरण्यासाठीं आलों असतांना एका चोरानं आह्माला गांठलं; व आमच्याशीं तो दांडगाई करूं

लागला; पण आमच्यापुढें त्याचं कांहीं चालत नाहीं असं पाहून तो पळून गेला " असें वारंवार मोठ्या दीनस्वरानें ह्मणत होते !

त्यांना धरून आणणारीं माणसें त्यांच्या विनवण्यांचा मुळींच विचार करीत नाहींत असें पाहून मला फार वाईट वाटलें. त्यांना पकडण्यामध्यें कांहीं तरी चूक झाली असावी असें माझ्या मनांत आलें ! पिरोजला धरलेला पाहून मात्र मला समाधान झालें; पण शिरीन आदिकरून बाकीच्या मंडळींची मला अतिशय दया आली. " ल्यूसी आल्याचें शिरीन माझ्यापाशीं बोलली होती; पण त्याचवेळीं माणेक, पिराजी व पिरोज तेथें कसे व कां आले हें मला समजलें नाहीं. त्यांची विचारपूस करण्याची कांहीं ती वेळ नव्हती ह्मणून मी त्या नादीं लागलों नाहीं. पण पिरोज खेरीज करून बाकीच्या मंडळींनीं या अकल्पित संकटांतून सोडाविण्याचा यत्न करावा असें त्या स्थितींत त्यांना पाहतांच माझ्या मनांत आलें.

आतां शिरीन, ल्यूसी, व माणेक एकाएकीं ओकसाबोकशी रडूं लागल्या ! हें पाहून माझें अंतःकरण इतकें द्रवलें कीं, माझ्याही डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या ! त्या तिघी स्त्रियांना सोडण्याविषयीं मी त्यांना धरून आणणारांची करुणा भाकणार तोंच त्यापैकीं एक गृहस्थ पकडलेल्या माणसांना दरडावून ह्मणाला " हरामखोरांनो, आह्मी तुह्माला चांगलें ओळखलें आहे. आज कित्येक दिवस आह्मी तुमच्या पाळतीवरच आहों ! आपलीं सोगें मघाशीं तिकडच्या झाडाआड उभें राहून तुह्मी बदलीत होतां तेव्हांपासून आह्मी तुमच्या पाठोपाठच येत आहों ! बोला आतां कहानजीशेटजींची पेटी, हिऱ्यांचीं कंकणें, आणखी मोत्यांची माळ कुठें ठेविली आहेत ती ! "

हें त्याचें बोलणें ऐकून मी तर अतिशयच विस्मित होऊन गेलों ! हें एकंदर वर्तमान काय आहे याचा मला मुळींच उमज पडेना, ! शिरीनला, ल्यूसीला व माणेकला चकीनें चोर समजून त्या गृहस्थांनीं विनाकारण त्यांच्यावर हें संकट आणलें आहे असें मला अजूनही वाटत होतें; आणि त्या तिघींच्या वतीनें मी कांहीं बोलणार तोंच त्या मंडळींच्या मागून एक गृहस्थ येत होता तो ह्मणाला " येवढ्यानें भागत नाहीं; पाचशें रुपयांच्या नोटा व एक हिऱ्याची आंगठीदेखील यांच्याचपाशीं आहे. "

या गृहस्थाचा आवाज ओळखीचा वाटल्यावरून मी न्याहाळून पाहूं लागलों तों मनुभाई माझ्यापुढें येऊन उभा राहिला ! व " कां भगवानदास, भेटली कां एकदांची तुझी शिरीन ! " असें मला लाजवण्याच्या हेतूनें ह्मणाला. " भलत्याच भानगडींत तूं सांपडला आहेस असें परवांपासून मी तुला सांगत होतों, तरी तूं मला कांहीं पत्ता लागूं दिला नाहींस; पण ही सर्व हकीकत मीं माझ्या मित्राला आज सकाळीं कळविली. ते पहा, ते माझ्या परिचयाचे गृहस्थ तेथें उभे आहेत. गुन्ह्याचा तपास लावून त्यासंबंधीं पुढील सर्व व्यवस्था करण्याचें काम सरकारनें त्यांच्याकडे दिलें आहे. तेव्हां कांहीं एक चोरून न ठेवितां तूं आपली खरी-खरी सर्व हकीकत त्यांना सांग. निरनिराळीं सोंगें घेऊन नादीं लावणारे व शेवटीं तुझी दुर्दशा करूं पाहणारे हे भामटे किती अट्टल आहेत याची तुला कल्पनाही नाहीं. तीं मोठमोठीं दोन गाठोडीं आणिलीं आहेत त्यामध्यें या चोरांचे तऱ्हतऱ्हेचे कित्येक वेष आहेत. कांहीं वेळापूर्वी त्यांचे आपसांत बोलणें चाललें होतें व आह्मी त्यांच्यापासून जवळच होतों त्यामुळें आह्माला तें चांगलें ऐकूं आलें. आज या ठिकाणीं कांहीं तरी दगा होणार आहे हें काल संध्याकाळीं मी तुझ्याबरोबर येथें आलों तेव्हांपासूनच ओळखून ठेविलें होतें; आणि ती बातमी आज सकाळीं मीं आपल्या मित्राला कळविली. कहानजीशेटजींच्या जिनसासंबंधाची चवकशी अगोदरच सुरू झालेली होती; व आज संध्याकाळपासून आह्मी चोरांच्या पाळतीवरच आहों. "

मनुभाईनें सांगितलेल्या हकीकतीवर माझा विश्वास बसेना. या कामीं कांहीं तरी मोठी चूक झाली असावी असें अजून देखील मला वाटत होतें ! तिघी स्त्रिया—निदान एकटी शिरीन तरी—अगदीं निरपराधी आहे असें शेवटीं ठरलें जावें यासाठीं कांहीं तरी युक्ति योजण्याच्या विचारांत मी अगदीं गढून गेलों होतों; व त्या भरांतच मी ह्मणालों " या प्रकरणांत कांहीं तरी घोंटाळा झाला असला पाहिजे आणि त्याचें प्रायश्चित्त निरपराधी माणसांना विनाकारण भोगावें लागणार आहे ! "

" आपण ह्मणतां तें अगदीं अक्षरशः खरें आहे " त्या स्त्रियांपैकीं एकजण—मला वाटतें शिरीनच—ह्मणाली. हें ऐकतांच चोरीचा तपास

लावण्यासाठीं मनुभाईनें आपल्याबरोबर आणलेले कोतवालसाहेब—मनुभाईचा मित्र—मला ह्मणाले " जरा गप्प राहिलां तर हे चोर कितपत निरपराधी आहेत हें थोडक्यांत तुम्हांला पहायला सांपडेल. "

" कायरे ए, ते चोरून आणलेले जिन्नस कोठें आहेत बोला लवकर ? " चोरांना दरडावून कोतवालसाहेब ह्मणाले.

पिरोजच्या डाव्या करंगळींत एक हिऱ्याची अंगठी, व माणेकच्या हातांत हिऱ्यांचीं कंकणें दिसत होतीं ती पाहून कोतवालसाहेबानीं त्यांना विचारलें " ही अंगठीं आणखी तीं कंकणें तुह्मी कोठून चोरून आणिलीत ? "

" नाहीं महाराज, चोरून कशाची आणली ! " माणेकबाईनें धिटाईनें उत्तर दिलें " हीं तर माझ्या आईनें मला दिलीं आहेत ! " आणखी पिरोज मध्येंच मोठ्या आढ्यतेनें ह्मणाला, " ही अंगठी तर माझी स्वतःची, ती स्वतः मिळविलेल्या पैशानें विकत घेतली आहे ! "

" असस काय ! " तिरस्कार व्यक्त करणाऱ्या आवाजानें कोतवालसाहेब उद्गरले. " बरं, ते जिन्नस जरासे इकडे द्या पाहूं. ते नीट तपासल्यावेरें ज्याचे त्याला देण्यांत येतील. " असें ह्मणून कोतवालसाबाहेनीं दोन्ही जिनसा त्यांच्यापासून घेतल्या; आणि अंगठी माझ्यापुढें करून त्यांनीं मला विचारलें " ही अंगठी तुमच्या पाहण्यांत आलेली आहे काय ? "

" होय साहेब, " अंगठीकडे मीं न्याहळून पाहिलें; व तीं बोटांत घालून पाहिल्यावर ह्मणलों, " ही तर माझीच आहे अशी मला खात्री वाटते. "

" छे, महाराज " पिरोज मध्येंच ह्मणाला, " या चांदण्यांत ती त्यांना कशी ओळखणार ! बरोबर हिच्यासारख्या अंगठ्या पुष्कळ असतील; आणखी या गृहस्थांची असली एखादी अंगठी असली ह्मणून हीच त्यांची आहे असें कशावरून ? चांदण्यांत चांगलें दिसत नाहीं त्यामुळें यांना अंगठीबद्दल भ्रम पडला असला पाहिजे ! "

पिरोजचें हें ह्मणणें मला अगदीं लबाडीचें वाटलें; कारण तीच अंगठी माझी स्वतःची असल्याबद्दल मला मुळींच शंका नव्हती. दोन तीन दिवसांपूर्वीं बंदरावर शिरीनला मीं दिलेली तीच अंगठी होती; आणि तेव्हांपासून शिरीननें ती आपल्या करंगळींत घालून ठेविली होती; पण आपल्या

पासून ती उपटण्याची पिरोजनें दुष्टपणानें युक्ति केली आहे अशी मला शंका येऊन अंगठीबद्दलची सर्व हकीकत कांहींएक लाज न धरितां कोतवालसाहेबांना स्पष्टपणें सांगून टाकावी असें माझ्या मनांत आलें. पण अंगठी माझीच आहे अशाविषयीं कोतवालसाहेबांना खात्री वाटल्यावरून पिरोजला ते ह्मणाले " हं; तुझं ह्मणणं अगदीं खरं आहे ! चांदण्यामुळें अंगठीबद्दल या गृहस्थाला जसा भ्रम पडला आहे तसाच तुलाही भ्रम झाल्यामुळें ही अंगठी वास्तविक या गृहस्थाची असून तिच्यावर तूं आपला हक्क सांगून ती उपटण्याचा विचार केला आहेस ! किती तरी बेटं हें चांदणं लबाड आहे हो ! निरनिराळे वेष घेऊन तुमच्यासारखे अट्टल चोर या गृहस्थासारख्या गावंढळ माणसांना भुलवून नागविण्याचा यत्न करीत असतांना तुह्मी भयंकर भामटे आहां ही गोष्ट हें लबाड चांदणं गोरगरिबांना कळूं देखील देत नाहीं ! "

" साहेब, " मी आतां लाजलज्जा एका बाजूला ठेवून पिरोजचा सूड उगविण्याच्या उद्देशानें कोतवालसाहेबांना ह्मणालों, " ही अंगठी माझी स्वतःची असून ती दोन तीन दिवसांपूर्वी आह्मी आपोलोबंदरावर गेलों असतांना या शिरीनबाईपाशीं दिली होती ! "

शिरीन अंगठीसंबंधानें मी सांगितलेल्या हकीकतीचें समर्थन करील; ह्मणजे पिरोजची लबाडी सहजच उघडकीला येईल अशी मला बळकट आशा वाटत होती. पण शिरीन माझ्यावतीनें कांहींएक बोलली नाहीं.

" वा: " कोतवालसाहेब शिरीनला उद्देशून ह्मणाले, " तुझ्या या पारशीणीच्या वेषाला शिरीन हें गोड नांव कसं छान शोभतं ! आणखी या दोघां चोरांनीं कोणतीं नांवें घेतलीं आहेत ? तुह्माला भिवविण्यासाठीं भयंकर मुखवटा घालून, हातांत एक मोठी थोरली काठी घेऊन आलेला पाजी माणस हाच नव्हे कां ? आतां हा साहेबीण बनला आहे काय ? " ल्यूसीकडे बोट दाखवून कोतवालसाहेब ह्मणाले. " खंडू दाखीवरे यांना त्या दोन्ही गाठोड्यातले ते या चोरांचे निरनिराळे वेष ! " आपल्या एका नोकराला कोतवालसाहेबांनीं हुकूम केला. हें ऐकतांच खंडूनें दोन्हीं गाठोडीं माझ्यापुढें आणून तीं मला सोडून दाखविलीं. त्यांत असलेले निरनिराळ्या प्रकारचे कपडे, व तऱ्हतऱ्हेच्या इतर कित्येक जिनसा पाहून तर मी अगदीं थक्क होऊन गेलों !

" बरं पण आतां कहानजीशेटजींची ती पेटी, त्यांमध्यें ठेवलेलीं हिऱ्यांचीं कंकणें आणखी मोत्यांची माळ कोठें आहे सांगा पाहूं लवकर. त्यांच्या येथें तीन दिवस गडी ह्मणून तूंच राहिला होतास ना ? " ल्यूसीजवळ जाऊन त्यांनीं तिला प्रश्न केला.

" नंदशंकरशेटजींपासून पांचशें रुपयांच्या नोटा मागून आणून तुझी या तुमच्या शिरीनला दिल्यात त्या कुठें आहेत बरं ? " कोतवालसाहेबांनीं मला विचारलें.

त्यांचा हा प्रश्न ऐकून मी अतीशय लज्जित झालों. शिरीन ही एक स्त्रीवेषधारी भयंकर चोर असेल या गोष्टीवर अजून माझा विश्वास बसेना ! मला वाटे या अनाथ स्त्रियांवर हा भलताच आरोप करण्यांत येत आहे ! तेव्हां त्यांच्या निरपराधीपणाबद्दल आपण कोतवालसाहेबांची खात्री केली पाहिजे; पण इतक्यांत कोतवालसाहेबांनीं नुकत्याच विचारलेल्या प्रश्नाला शिरीननें स्वतःच उत्तर दिलें " महाराज, हिऱ्यांचीं कंकणें आणि मोत्यांची माळ माझी असून ती या चोरानें ( माझ्याकडे बोट दाखवून ) माझ्याजवळून हिसकावून घेतली व इकडे हा चोर पळून आला आहे ! ती पहा आपण ह्मणतां तसली पेटी त्याच्याजवळ आहे ! तीच कहानजींची पेटी असली पाहिजे ! अरे लुच्चा ! आह्माला लुटून-च्यालुटून आणखी आमच्यावरच कुभांड घेतोस नाहीं ! पण साहेबांना सारं कांहीं कळलं आहे; आतां कुठें पळून जातोस पाहूं ! "

तिच्या—नव्हे त्या स्त्रीवेषधारी भामट्याच्या—तोंडांतून निघालेले हे शब्द कानीं पडतांच एकाएकीं माझ्या तळपायाची आग मस्तकाला गेली ! त्याची गांठ पडल्यापासून आतांपर्यंत घडलेला सर्व वृत्तांत माझ्या ध्यानांत येऊन त्याच्या नादानें शेवटीं मी कसा दुःखांत पडलों असतों हें मला चांगलें समजलें. आपल्याला या संकटांतून वाचविण्याचें सर्व श्रेय मनुभाईकडे व त्याचे स्नेही कोतवालसाहेब यांच्याकडे आहे याबद्दल माझी खात्री झाली आणि सर्व हकीकत कोतवालसाहेबांना कळवून त्या चोरांचा तेथल्यातेथें झाडा घेण्याविषयीं मी विनंति केली. त्याप्रमाणें त्यांनीं केल्यावर सर्व जिनसा लागलीच सांपडल्या. कहानजी शेटजींची पेटी, एक खोटी माळ व तसल्याच प्रकारची एक अंगठी आणि नोटांना गुंडाळलेला नंदशंकरशेटजींच्या

नांवचा जाड कागद माझ्या हातीं येईल अशा रीतीनें ठेवून शेवटीं चोरीचा मुद्देमाल माझ्यापाशींच सांपडावा या हेतूनें चोरांनीं लढविलेली युक्ति कोतवालसाहेबांच्या ध्यानांत आली.

यानंतर कोतवालसाहेबांनीं आम्हां सर्व मंडळींना एका चवकीवर नेलें. तेथें सर्वांच्या जबान्या घेऊन मला व मनुभाईला त्यांनीं जावयास आज्ञा दिली; आणि त्या पांची चोरांना मुद्देमालासह चवकीवर बसवून घेतलें.

दुसरें दिवशीं आपल्या जिनसा ओळखण्यासाठीं कहानजीशेटजींना, व नोटांच्या नंबरांचें टिपण घेऊन मला व नंदशंकरशेटजींना त्यांनीं बोलाविलें. पेटी, हिऱ्यांचीं कंकणें, मोत्यांची माळ, व पांचशें रुपायांच्या नोटा आणि हिऱ्याची अंगठी या जिनसांच्या मालकीबद्दलचा खात्रीलायक पुरावा आम्हांकडून मिळाल्यानंतर पांची चोरांवर कोतवालसाहेबांनीं रितीप्रमाणें खटला केला; व त्याचा निकाल होऊन चोरांना कडक शिक्षा देण्यांत आली.

ही हकीकत ऐकून सर्वांना मोठें आश्चर्य वाटलें. नंदशंकरशेटजीनीं व मनभाईनें मला वेळोंवेळीं केलेल्या उपदेशाचें महत्व आतां माझ्या चांगलें ध्यानांत आलें. मनुभाईनें व कोतवालसाहेबांनीं वेळेवर सहाय्य केलें नसतें तर आज आपली कशी दुर्दशा उडाली असती हें आतां मला पूर्णपणें कळलें; व इतःपर भलत्यासलत्या नादीं लागायचें नाहीं असा मीं दृढ निश्चय केला. संकटांतून माझी मुक्तता करण्याच्या कामीं मला सहाय्य करणाऱ्या सद्गृहस्थांचे मीं मनापासून धन्यवाद गाइले; आणि सर्वांचा निरोप घेऊन मी आपल्या गांवीं गेलों. असो.

मुंबई शहरांत चालू असलेल्या नानाविध व्यवहारांमध्यें अननुभवी, व किंचित् अविचारी अशीं माणसें सहज गुरफटलीं जातात हें सर्वांना माहीत आहेच. इतरांप्रमाणें मला देखील ही गोष्ट चांगली ठाऊक होती. यासंबंधानें नंदशंकरशेटजीनीं व मनुभाईनें मला पुष्कळ उपयुक्त सूचना केलेल्या होत्या; तरी स्वतःच्या शहाणपणाची घमेंड, व तारुण्याची रग अंगांत असल्यामुळें मी समजून उमजून अविचाराला—दुसऱ्याच्या तरुण स्त्रीचा अभिलाष धरून तिला वश करण्याच्या अत्यंत निंद्य कल्पनेला - बळी पडून स्वतःचा नाश करून घेण्याला कसा प्रवृत्त झालों होतों हें प्रांजलपणानें आपल्याला सांगितलें आहे. खेडेगांवांतून अथवा लहानसहान शहरांतून प्रथमच मुंबईमध्यें येणाऱ्या प्रत्येक

मनुष्यावर असाच प्रसंग येईल असें माझें म्हणणें नाहीं. माझ्यासारखीं कित्येक नवखीं खेडवळ माणसें कदाचित् दुसऱ्याही कांहीं गोष्टींच्या नादीं लागून फसत असतील.

तरुण स्त्रियांच्या नादीं, तर पैशाच्या अभिलाषाला भुलून कोणी आपल्या नाशाला प्रवृत्त होतील; तरी पण सर्व प्रकारच्या मोहक विषयांचें पर्यवसान स्त्रिया, अथवा पैसा, या दोन गोष्टींमध्येंच बहुधा होत असतें असें म्हटलें तरी चालेल. कारण, हे दोन्ही विषय मनुष्यप्राण्याला स्वभावतःच अत्यंत प्रिय आहेत. आणि त्यांच्या ठिकाणीं प्रत्येक मनुष्याची कमजास्त प्रमाणानें आसक्ति ही असावयाचीच. ही त्याची आसक्ति त्याच्या नाशाला कारणीभूत होत असते. हें तत्व नेहमीं ध्यानांत वागवून नीच माणसें आपले व्यवहार करीत असतात. "यांत तुम्ही नवीन तें काय सांगितलेंत, हीं तत्वें सर्वांना माहीत आहेत" असें आपण म्हणाल; व आपलें म्हणणेंही कांहीं खोटें नाहीं. मला प्रत्यक्ष आलेल्या अनुभवावरून म्हणजे एखादा नवीन असा मोठा सिद्धान्त काढून तो आपल्याला सांगत आहे असें मी मुळींच समजत नाहीं. आपल्या सर्वांच्या परिचयाच्या अशा रोजच्या व्यवहारांतल्याच या गोष्टी आहेत; पण त्यामध्येंच माणसें रोज कशीं फसलीं जातात हें वरचेवर आपल्या निदर्शनाला येत चाललें म्हणजे आपण अधिक सावधगिरीनें वागूं लागतों. फॅन्सीफेट पहावयाला गेल्यामुळें आपण या लबाडांत सांपडलों असें वाटून मी फेटला 'मयाची माया' असें नांव दिलें. पण आपले रोजचे व्यवहार सूक्ष्म दृष्टीनें पाहिले म्हणजे हें सर्व जगच मुळीं मायेचा बाजार आहे असें वाटूं लागतें ! या मायावी बाजारांत मायावी--आपण होऊन दुसऱ्यावर उपकार करीत आहों असें भासविणाऱ्या--माणसांनीं मांडलेल्या मोहक वस्तूंना आपण विवेकशून्यतेनें भुलून आपल्या हातानें आपण आपला नाश करून घेत असतों. तेव्हां मी आतांपर्यंत आपल्यापुढें सादर केलेला माझा विलक्षण अनुभव लक्षांत घेऊन प्रत्येक मनुष्यानें या मायेच्या स्वरूपाचें आविष्करण करावें व आपला जीवनक्रम विचारानें चालवावा येवढ्याच हेतूनें ही गोष्ट मीं लिहिली आहे. आपण माझा हेतू सफल केला तर माझ्या श्रमाचें चीज होईल अशी इच्छा प्रदर्शित करून मी आपली रजा घेतों.

समाप्त